TIGHT BINDING

UNIVERSAL LIBRARY
OU_192535
UNIVERSAL LIBRARY

# मनाचे संकल्प

## (लघुनिबंधसंग्रह)

लेखक :

प्रा. म. ना. अदवंत

१९५० ]　　　　[ किं. २-८-०

स्कूल व कॉलेज बुकस्टॉल, कोल्हापूर.

प्रकाशक :

श्री. दा. ना. मोघे, बी. ए.

कोल्हापूर.

Checked 1969

[ पुढील आवृत्तीचे सर्व हक्क सौ. लीला अद्वंत यांच्या स्वाधीन ]

Checked 1965

मुद्रक :

श्री. प्र. ज. पाध्ये,

स्वाधीन मुद्रणालय,

१०१७ सदाशिव, पुणे २

माझ्या

प्रिय

पत्नीस—

# — प्रस्तावना —

'लघुनिबंध' हा वाङ्मयप्रकार मराठींत गेल्या वीस वर्षांत खूपच लोकप्रिय झाला आहे. त्याची लोकप्रियता वाचकांपेक्षां लेखकांतच अधिक आहे अशी शंका मात्र मला कधीं येते. तथापि वाईट लघुकथा आणि वाईट लघुनिबंध यांतूनच निवड करायची झाली, तर वाचक लघुनिबंधाचीच निवड करतील, असें वाटतें. कारण लघुनिबंधांतून, गेला बाजार, आपल्यासारख्याच एका जिज्ञासु माणसाचें मनमोकळें बोलणें ऐकण्याचा तरी लाभ होतो; पण लघुकथा बिघडली तर त्यांतून हातीं कांहींच लागत नाहीं! अधिकाधिक लेखक, आजकाल, या प्रकाराचा आश्रय करीत आहेत, याचें कारण कदाचित हेंच असूं शकेल. तथापि वाचक, गरजूपणामुळें, लघुनिबंधाच्या काय, कीं लघुकथांच्या काय, बाबतींत थोडे दिलदार झाले, तरी तेवढ्यावरून हे वाङ्मयप्रकार सोपे आहेत, किंवा सैल आहेत, अशी कल्पना लेखकांनीं करून घेणें धोक्याचें ठरेल. 'जितके लघुनिबंधलेखक तितके लघुनिबंधाचे प्रकार संभवतात' असें इंग्लिश टीकाकार म्हणतात. आणि व्यक्तिवैशिष्ट्य हा जर लघुनिबंधाचा प्राण असेल, तर वरील मत खरें मानलें पाहिजे. पण 'कोणीहि' 'कांहिंही' लिहिलें, तरी त्याला लघुनिबंधाच्या दालनांत नक्की जागा आहे, असा मात्र याचा अर्थ नव्हे! हा प्रकार 'लवचिक' आहे; पण म्हणून 'ढिला आहे' असें मात्र नव्हे.

पण हा गैरसमज टाळायचा असेल, तर वाचकांपेक्षां लेखकांनीं अधिक सावध असले पाहिजे; आणि लेखकांहूनहि प्रातिनिधिक संग्रह संपादणाऱ्या संपादकांनीं सावध असलें पाहिजे. दुःखाची गोष्ट ही, कीं आजकाल निघत असलेल्या प्रातिनिधिक निबंधसंग्रहांत ही सावधानता दिसत नाहीं, व म्हणूनच लघुनिबंध म्हणजे 'काय' हें सांगण्याहूनहि,

लघुनिबंध म्हणजे 'काय नव्हे,' हें सांगणें जरूर होऊन बसलें आहे! लघुनिबंध, लघुकथा, शब्दचित्र, व्यक्तिचित्र, गद्यकाव्य या सर्व लघु आणि स्फुट गद्यप्रकारांची गल्लत कशी चालू आहे, याचा निर्देश मीं नागपूरकडील एका लघुकथालेखिकेच्या पुस्तकाला प्रस्तावना लिहितांना कांहीं वर्षांपूर्वी केला होता. एका विद्वान् संपादकांनीं निवडलेल्या गद्यवेच्यांत स्वतःचीच एक वाचनीय लघुकथा, 'लघुनिबंध' म्हणून निवडल्याचा उल्लेख मला तेथें करावा लागला होता! पण त्याहूनहि एक ठळक आणि शोचनीय उदाहरण अलीकडेच माझ्या पाहाण्यांत आलें. तें म्हणजे 'वासन्तिका' या प्रातिनिधिक संग्रहांत निवडलेल्या 'तृणाची थोरवी' या लघुनिबंधाचें! हा संग्रह खांडेकरांसारख्या रसिक व मार्मिक संपादकांनीं संपादिलेला असल्यानें व तो अपक्व विद्यार्थ्यांच्या हातीं अध्ययनार्थ दिला जात असल्यानें, तर या 'गल्लती'चा निर्देश करणें अपरिहार्यच झालें आहे. साने गुरुजी-कृत 'तृणाची थोरवी' हें एक प्रकारचें गद्यकाव्य आहे असें म्हणतां येईल. निदान तो लघुनिबंध खासच नव्हे. आणि त्यालाहि लघुनिबंध म्हणायचें झाल्यास, लघुनिबंध या लेखनप्रकाराच्या चतुःसीमा ठरवीत बसण्याचें कारणच उरणार नाहीं!

लघुनिबंधाप्रमाणेंच लघुनिबंधासंबंधींची चर्चाहि मराठी वाङ्मयांत वाढत्याप्रमाणावर आहे. या चर्चेचा निष्कर्ष थोडक्यांत सांगायचा झाला, तर हे नवे निबंध लघु, ललित, आत्मनिष्ठ आणि अनौपचारिक असतात, असा सांगतां येईल. चांगल्या लघुनिबंधाकरितां प्रो. फडके यांच्या लिखाणाकडे वळावें लागेल, तसेंच चांगल्या निबंधचर्चेकरितांहि त्यांच्याच लिखाणाकडे वळावें लागेल; तथापि प्रो. फडके यांनीं वेगवेगळ्या प्रसंगांनीं केलेल्या सुंदर चर्चेंत एका गैरसमजुतीला जागा राहिली आहे. दीर्घ आणि गंभीर निबंध जाऊन त्यांची जागा लघुनिबंधांनीं घेतली आहे, असें फडके यांनीं एकाहून अधिक ठिकाणीं म्हटलें आहे. इतकेंच नव्हे तर पांडित्यावर लालित्यानें अलीकडे झपाट्यानें आक्रमण केलें आहे, असेंहि त्यांनीं म्हटलें

आहे. या त्यांच्या विधानांनीं वाङ्मयांतील वस्तुस्थितीसंबंधीं विपरीत ग्रह होण्याचा संभव आहे. चिपळूणकर, टिळक, आगरकर यांची पद्धति लुप्त होऊन आज तिची जागा लघु ऊर्फ ललित निबंधानें घेतली आहे, असा फडके यांच्या विवेचनावरून एखाद्या अपक्व वाचकाचा ग्रह झाल्यास नवल नाहीं ! पण वस्तुस्थिति तशी नाहीं. आजहि गंभीर निबंध टिळक, आगरकरांच्या काळाइतकेच लिहिले जातात. आज देखील वृत्तपत्रांच्या अग्रलेखांत एकवचनी प्रथम पुरुषाचा उपयोग—एखादे गांधी सोडल्यास—कोणी करीत नाहींत. गंभीर आणि प्रतिपादनप्रधान निबंध 'जाऊन' ललित, अनौपचारिक निबंध आला अशी वस्तुस्थिति नाहीं. ललित, अनौपचारिक, निबंध 'आला' एवढीच वस्तुस्थिति आहे. मला एका गोष्टीची मात्र राहून राहून मौज वाटते : काव्याच्या प्रान्तांत पंडित कवींची बाजू घेऊन नव्या लघु आणि आत्मनिष्ठ काव्याचा उपहास करणारे फडके, गद्याच्या क्षेत्रांत, लघुनिबंध लिहिणें हें कमजोरपणाचें कां समजत नाहींत कोण जाणें ! काव्यांत भावगीताचें जें स्थान, तेंच गद्यांत लघुनिबंधाचें स्थान होय, हें सुप्रसिद्ध मत फडके यांना सांगायला हवें, असें नाहीं ! मग लघुनिबंध लिहिणें आधुनिकतेचें आणि लालित्याचें लक्षण; आणि लघुभावगीतें लिहिणें हें मात्र क्षीण प्रतिभेचें लक्षण, या फडक्यांच्या भूमिकेचा अर्थ कोणता ? किंबहुना जुन्या निबंधांत लालित्याचा अभाव असतो, आणि नव्या निबंधांत प्रतिपादनाला मज्जाव असतो, हें म्हणणेंहि तितकेंसें खरें नाहीं. मेकॉले आणि चिपळूणकर यांच्या झोकदार आणि पल्लेदार ( पण तर्कदुष्ट ) गद्याची भुरळ, आजहि महत्त्वाकांक्षी तरुणाच्या मनावर पडल्यावाचून राहाणार नाहीं. टिळकांच्या निबंधांतहि, आत्मनिष्ठा नसली तरी व्यक्तिमत्त्व खासच होतें. व या अर्थानें या दोघांचेहि निबंध केवळ शास्त्रीय नव्हते, तर वाङ्मयीन व ललित होते. उलट चेस्टरटन् सारख्याच्या 'ललित' निबंधांत प्रतिपादनच काय, पण पट्ट्याचे हात असतात ! आणि टिळकचिपळूणकरांच्या लालित्यासंबंधीं, आधुनिक नाजुक

वाचकानें एखादे वेळीं शंका प्रदर्शित केली, तरी शिवरामपंत परांजपे, अच्युतराव कोल्हटकर यांच्या लिखाणांतील लालित्य तरी त्यालाहि मान्य होईलच. तथापि आधुनिक लघुनिबंधाला फडके ज्या अर्थानें 'ललित' म्हणतात त्या अर्थानें परांजपेकोल्हटकरांचें लिखाणहि 'ललित' नव्हते.

या दृष्टीनें पाहतां, लघुत्व आणि लालित्य, यापेक्षां आत्मनिष्ठा आणि अनौपचारिकता हींच या नव्या निबंधाचीं खरीं वैशिष्ट्यें होत, आणि यामुळेंच तर मोठा घोटाळा होऊन बसला आहे! 'आत्मनिष्ठ' तर आपणांपैकीं प्रत्येकजणच आहे! आणि विशेष प्रसंग सोडल्यास, आपण तिन्ही त्रिकाळ अनौपचारिकच असतो! कोणाच्याहि बोलण्यांत प्रथम पुरुषाचें प्रमाण किती सढळ असतें हें ज्यानें त्यानें स्वानुभवानें पहावें (निरहंकार प्रवृत्तीबद्दल प्रसिद्ध, असे 'वैष्णवजन' देखील खालच्या आवाजांत, आपल्या विनीत आणि सालस वृत्तीसंबंधींच्या हकीकती मोठ्या हिकमतीनें ऐकवितात, असा अनुभव आहे! मग सामान्य स्वयंकेंद्रित माणसांची गोष्टच नको!) अनौपचारिकता तर आजच्या संकेतभंजक युगांत इतकी सवंग आहे, कीं आजकालच्या सन्मान्य पाहुण्यांना 'संकोचाचं कारण नाहीं?' असें जुन्या पद्धतीनें सांगण्याऐवजीं, 'इतकें अनौपचारिक होऊं नका बुवा!' असें सांगण्याची वेळ आहे. आणि याच अनौपचारिकतेच्या सोळाआणे पिकाची वाङ्मयांतील आवृत्ति म्हणजे लघुनिबंधाची अमर्याद वाढ ही होय!

'आत्मनिष्ठा' आणि 'अनौपचारिकता' तर खरीच; पण 'कुणाची' आत्मनिष्ठा? आणि 'कोणत्या दर्जाची' अनौपचारिकता? हे प्रश्न फार महत्त्वाचे आहेत. लघुकथा आणि लघुनिबंध यांच्या तंत्रांत अनौपचारिकतेला वाव आहे, या मताचा—अथवा वार्तेचा—कित्येक तरुण लेखकांच्या मनावर थोडा अनिष्ट परिणाम झालेला दिसतो. सायकलीवर सावरून बसतां येण्यापूर्वींच, ते हात सोडून बसण्याचा प्रयोग करूं लाग-

तात ! हॅम्लेटच्या वेडांतहि कांहीं संगती होती, त्याप्रमाणें लघुनिबंधाच्या अनौपचारिकतेंत आणि स्वैरतेंतहि कांहीं शास्त्र, संयम व कला असणें जरूर आहे. संकोचानें वागत असतां शिष्टाचार पाळणें सोपें असतें; पण संकोच सोडायचा, आणि शिष्टाचार मात्र सोडायचा नाहीं, याला मात्र खराखुरा घरंदाजपणा लागतो !

आणि आत्मनिष्ठाच काय पण अहंकार देखील लघुनिबंधलेखकाला पुष्कळदां पोषक ठरतो, असें मी म्हणेन. पण 'कुणाचा अहंकार' हा प्रश्न फार महत्त्वाचा आहे. यूरोपीय लघुनिबंधाचा जनक मॉन्टेन् म्हणतो 'मी स्वतःचींच चित्रें काढीत असतो.' ('It is myself I portray') कादंबरीकार थॅकरेनें म्हटलें आहे :—"या नम्र निबंधवजा लिखाणात मी स्वयंकेंद्रित होण्याची मुभा घेतलेली आहे." संशोधनशाळा-तील रुक्ष पंडित कांहींहि म्हणोत, पण अहंकार, आत्मप्रेम, आत्मनिष्ठा हेंच आधुनिक युगाचें वैशिष्ट्य आहे. चेस्टरटन्, शॉ, रसेल्, फार काय वेळ-प्रसंगीं आइन्स्टाइनसारखे शास्त्रज्ञांचे मुकुटमणीहि या नव्या युगांत छोट्या छोट्या प्रथम पुरुषीं लिखाणात, विश्वव्यापी विचार सुगम, आकर्षक आणि व्यक्तिगत करून दाखवितात !

लघुनिबंधाला बौद्धिकतेचें अगर तार्किकतेचें वावडें आहे असें नाहीं. पण येथें केवळ बौद्धिकतेनें भागत नाहीं. गंभीर निबंधांत तर्कशुद्धतेची आणि शिष्टसंप्रदायाची, एकसारखी जाणीव ठेवावी लागते; इतकेंच नव्हे तर ती जाणीव आहे हें सारखें दाखवावें लागतें, तर लघुनिबंधांत बुद्धिमान मनुष्य आपल्या बुद्धिवैभवाची जणूं बेबंद खैरात करावयास बसलेला असतो ! आणि या मुक्तद्वार वातावरणांत मनावरील बंधनें ढिलीं झाल्यामुळें, बुद्धि-बरोबरच तो आपल्या वृत्तीचीही खैरात करूं लागतो. अर्थात् अशा लिखा-णाचें प्रमुख आकर्षण त्यांतील 'विषया' पेक्षां तो विषय हाताळणारी 'व्यक्ति' होणें अपरिहार्यच असते.

लघुनिबंध केवळ बुद्धिमत्तेमुळें आकर्षक होत नाहींत; बुद्धिमत्तेला भाषा-शैलीची जोड असली, तरी तेवढ्यानेंहि भागत नाहीं;—ज्याला स्वतःच्या व्यक्तिमत्त्वांत आवडीनिवडींत, लहरींत, आग्रहांत, पूर्वग्रहांतही!—गोडी वाटते, असा बुद्धिमान् व चिंतनशील मनुष्यच चांगले लघुनिबंध लिहू शकेल. पण त्याचेहि लघुनिबंध तंत्रदृष्ट्या शंभर नंबरी वठण्यास, तो विशिष्ट दिलखुलास अशा वृत्तींत—mood मध्यें—यावा लागतो. कारण लघुनिबंध म्हणजे असाधारण बुद्धिचापल्य आणि आकर्षक व्यक्तिमत्व असलेल्या मनुष्यानें विशिष्ट वृत्तींत येऊन केलेला कल्पनांचा खेळ असतो; किंबहुना कल्पनांशीं खेळ खेळत दाखविलेलें जुन्या विषयाचें नवें रूप असतें. अर्थात् ज्या लिखाणाला अथवा लेखकाला दृष्टिकोनच नाहीं; आणि असलाच तर तो शिळापाका आहे, त्यानें केलेल्या असंबद्ध कोट्या आणि सवंग अर्थान्तरन्यास म्हणजे मात्र लघुनिबंध नव्हे!

मराठींत चांगले लघुनिबंध थोडे नाहींत; पण चांगले लघुनिबंधकार थोडे आहेत. जे, 'लघुनिबंधकार' म्हणून प्रसिद्ध नाहींत अशांनीं, एका प्रसन्न क्षणीं लिहिलेले कित्येक चमकदार निबंध मासिकांतून निवडून काढतां येतील; तर 'लघुनिबंधकार' म्हणून नाणावलेल्या व्यक्तींनीं लिहिलेले निकृष्ट आणि कंटाळवाणे निबंधही हवे तेवढे दाखवितां येतील. प्रातिनिधिक संग्रह काढणाऱ्या आमच्या संपादकांची वृत्ति अद्याप गुणांपेक्षां संख्येला महत्त्व देण्याचीच असल्यानें, मराठींत जे थोडे सुंदर लघुनिबंध आहेत, त्यांतीलही बहुतेक निबंधांकडे संपादकांची दृष्टि अद्याप वळलेली नाहीं. पण इतक्या अनवस्थाप्रसंगांतहि, प्रो. फडके यांच्या प्रथम स्थानाबद्दल फारसा मतभेद होईलसें वाटत नाहीं. अर्थात् फडक्यांचे लघुनिबंध एका विशिष्ट जातीचे आहेत. पण फडक्यांच्याच मैदानांत, फडक्यांशींच दोन हात करणारा निबंधकार दाखवायचाच झाला, तर चिपळूण येथील प्रसिद्ध साहित्यिक कै. वि. ल. बर्वे यांचेंच नांव घ्यावें लागेल. रंगेल व्यक्तिमत्वाचें सहेतुक दर्शन घडवीत असतां, जवळजवळ काव्यमयतेपर्यंत गेल्यासारखें

करणें, हें फडक्यांच्या कित्येक उत्कृष्ट लघुनिबंधांचें वैशिष्ट्य म्हणून सांगता येईल. निबंधांत त्यांनीं दाखविलेलें रचनाचातुर्य—अथवा तंत्र निर्व्याज नसून 'सव्याज' (!) ऊर्फ 'सोफिस्टिकेटेड' असतें. बर्व्यांची वृत्ति फडक्यांच्या इतकीच रंगेल, पण अधिक काव्यमय होती. पण त्यांची कला फडक्यांच्या इतकी 'सव्याज' नसल्यानें, मराठी वाङ्मयांतील आजच्या ढोबळ प्रतवारींत त्यांची आठवण फडक्यांच्या बरोबरीनें होतांना आढळत नाहीं.

रंगेल आणि रसिक वृत्तीची मजल काव्यमयतेपर्यंत जाण्यास, तिजवर उदात्ततेचा सुवर्णकिरण चमकून जावा लागतो. 'इतरेजन' जीवनांतील ज्या आनंदाला मुकतात, तो केवळ विलासवृत्तीच्या जोरावर मिळवतां येईल, ही समजूत फडक्यांच्या लिखाणांत दिसून येते. पण श्रद्धा, सात्त्विकता, सौजन्य, गांभीर्य, उदात्तता यांचे दीप अंतःसृष्टींत पाजळत असतील, तरच बाह्य सृष्टीचें संपूर्ण सौन्दर्य प्रतीत होईल, असें मला वाटतें. फडक्यांची मजल वनभोजनापलीकडे जात नाहीं; पण श्रेष्ठतर निबंधकार वाचकांना वनभोजनाला म्हणून बोलावून महायात्रेची आणि महाप्रसादाची 'झलक' दाखवून मोकळे होतात!

काव्यमयतेप्रमाणेंच बौद्धिकतेंतहि, फडके बुध्द्याच अलीकडच्या टप्प्यावर थांबून समाधान मानतात. फडक्यांचा एक संपूर्ण निबंध मिळून, नवा आणि सूक्ष्म दृष्टिकोण देऊं शकतो. परंतु प्रत्येक वाक्यांत अनपेक्षिततेचा धक्का देण्याला ते तयार नाहींत. 'भात काळवून घांस भरविण्याचें' तंत्र फडक्यांसारख्या बुद्धिमान् लेखकांनेंच सुमारें पंचवीस वर्षांपूर्वी मुक्र केल्यामुळें, पडल्या पडल्या वाचतां न येईल तो लघुनिबंधच नव्हे—किंबहुना तें वाङ्मयच नव्हे अशी वाचकांनीं समजूत करून घेतली आहे! आजकालचें पुष्कळसे लघुनिबंध ठरीव सांचाचे आणि नीरस असतात हें खोटें नाहीं; पण त्याला कारण, ते जुन्या तार्किक वळणाचे असतात, हें मात्र नव्हे;

ते असतात नव्याच वळणाचे; ‘ प्रतिपादन ’ हें त्यांना प्रेरक ( Motif ) होत नसून, लेखकाचें व्यक्तिमत्त्वच त्यांची गति ( Dynamics ) ठरवीत असते. पण ज्यांचें व्यक्तिमत्त्वच बेताबाताचें, त्यांचें ‘ व्यक्तिगत ’ निबंधहि बेताबाताचें वठल्यास नवल काय ?

* * * *

माझे व्यवसायबंधु प्रो. म. ना. अदवंत, हे आपल्या ‘ मनाच्या संकल्पा ’ची भर मराठी लघुनिबंधसंभारांत घालीत आहेत. प्रो. अदवंत हे एक यशस्वी पदवीधर व प्राध्यापक असून, ललित व टीकात्मक लिखाणांच्या क्षेत्रांत त्यांचें नांव उदयोन्मुख म्हणून सुपरिचित आहे. त्यांच्या लघुकथांचा व एकांकिकांचा ‘ संजीवनी ’ हा संग्रह वाचकांच्या स्मरणांत असेल.

प्रो. अदवंत यांचे ‘ मनाचे संकल्प ’ हि, लघुनिबंधप्रेमी वाचकांना प्रिय होतील असा मला भरंवसा आहे. मराठी लघुनिबंधाच्या क्षेत्रांत आज फडक्यांचें घराणें प्राधान्येंकरून चालू आहे. प्रो. अदवंत हे याच घराण्याचे ‘ शागीर्द ’ आहेत असें म्हटल्यास, त्यांच्या या संग्रहाची एक प्रकारची प्रशंसा केल्यासारखेच होणार आहे. प्रो. अदवंत यांची भाषा साधी व प्रसन्न असून, लघुनिबंधाला लागणारा मनमोकळेपणाहि त्यांच्या ठायीं भरपूर दिसून येतो. ‘ मनाचे संकल्प, ’ ‘ अपेशी कोट ’ ‘ संसारांतील रम्य झरे ’ यासारख्या निबंधांत त्यांनीं वाचकांना ‘ मित्र ’ अगर ‘ कुटुंबीय ’ समजून मनमोकळेपणानें सुखदुःखांची ‘ गुफ्तगू ’ केल्याचें आढळेल. अनुभवातुर तरुण साहित्यिकानें तन्मयतेनें घेतलेले व विश्वासानें सांगितलेले, अनुभव हें या निबंधांचें स्वरूप म्हणून सांगतां येईल. त्यांतच स्मृतींत दरवळणाऱ्या विद्यार्थिदशेचे पडसाद, आणि जीवनांत नवीनच प्रवेश करणाऱ्या मधुरसंसारसुखाचें संगीत यांचेंहि भरपूर मिश्रण आहे. थोडक्यांत म्हणजे विद्यार्थिदशा संपल्यावर आणि संसारसुखाला प्रारंभ झाल्यावर

बोलक्या झालेल्या अनुभवातुर मनाचे हे विश्रब्धालाप आहेत. पण ज्या लघुनिबंधावरून प्रो. अदवंत यांच्या व्यक्तिमत्त्वांत लघुनिबंधकाराचीं बीजें आहेत असें मला विशेषत्वानें वाटलें, त्यांतील प्रमुख निबंध म्हणजे 'पत्राची पेटी' हा होय. पत्राच्या पेटीसारख्या सर्वपरिचित सर्वसामान्य आणि 'सवंग' वस्तूवरून प्रा. अदवंत यांनीं आपणांपैकीं प्रत्येकाच्या मनांत लपलेल्या अद्‌भुतत्त्वासंबंधींच्या प्रेमाचें, सुंदर व भेदक दर्शन घडविलें आहे. अद्‌भुतत्त्वासंबंधीं प्रेम असल्यास नवल नाहीं; पण आपण सर्व भाविकपणें अद्‌भुततेच्या प्रत्यक्ष आगमनाची वाट पहात असतो, हें त्याहूनहि अद्‌भुत नव्हे का? मानवी स्वभावांतील या मनोरंजक वर्मावर प्रो. अदवंत यांनीं खेळकरपणें नेमकें बोट ठेवलें आहे. या निबंधाच्या उत्तरार्धांत उघड उघड तात्त्विक चर्चा आली आहे, ती नसती तर निबंध याहूनहि सुंदर झाला असता.

या निबंधासारखाच दुसरा निबंध 'नको असलेलीं पत्रें' हा होय. या निबंधांतहि प्रो. अदवंत यांनीं प्रत्येकाच्या नित्याच्या अनुभवाची गोष्ट मोठ्या जिव्हाळ्यानें रंगविली आहे. किरकोळ अपेक्षाभंग हा लघुनिबंधाचा खास प्रांत आहे असें म्हणतात. 'दारुण दैवदुर्विलास' अथवा Tragic Irony असें ज्या अनुभवाला म्हणतां येईल, तो लघुनिबंधांत सामावतां येणार नाहीं. याचें कारण त्या निबंधाचें लघुत्व हें नसून, त्याचें वातावरण हें होय. प्रो. अदवंत यांनीं पत्रवाहकाच्या वाटेकडे लागणाऱ्या आपल्या अकारण आतुर नजरेपासून सुरवात करून, तिचा विचित्र विरस करणाऱ्या अनेकविध मासलेवाईक पत्रांपर्यंतच्या सर्वपरिचित अनुभवांतून मजेनें फेरफटका केला आहे. या निबंधाचा शेवटहि लघुनिबंधाच्या घडणीला साजेसा करण्यास लेखक विसरलेले नाहींत. तथापि या निबंधांतील एक गोष्ट मात्र मला थोडी चमत्कारिक वाटली. गांवाला जातांना आपली लेकुरवाळी मेव्हणी अगर काळ्या बाजारांतील साखरेची करंडी घेऊन जाण्याची विनंती करणारीं पत्रें, प्रो.

अदवंत यांच्याप्रमाणें वाचकांनाहि संत्रस्त हास्याचा अनुभव घडवीत असतील! परंतु या बारीकसारीक त्रासांच्या मालिकेंत प्रिय व्यक्तींच्या निधनवार्तेची पत्रेंहि अंतर्भूत केलेली पाहून मला थोडें चमत्कारिक वाटलें. मोकळ्या आणि सुसह्य वातावरणांतून या लघुनिबंधानें विषण्ण आणि गंभीर वातावरणांत चुकून पाऊल टाकल्यासारखें वाटतें. आणखी एक उल्लेखनीय निबंध म्हणजे 'भिडस्त माणसाची ढाल' हा होय. साध्यासुध्या व्यवहारांत सडेतोड पसंती नापसंती व्यक्त करणारे 'महात्मे' वगळून, बाकीच्या नुसत्या आमच्यासारख्या माणसांना व्यवहारांत सबबींचा आधार हरघडी कसा घ्यावा लागतो, याचें सुंदर वर्णन प्रो. अदवंत यांनीं आपल्या सलगीच्या अनुभवकथनाच्या पद्धतीनें केलें आहे. आपल्या प्रिय माणसांनाहि—विशेषत: स्वपत्नीला!—सबबींच्या गूळखोबऱ्यानें नित्य कसें संतुष्ट ठेवावें लागतें, याचें त्यांनीं केलेलें वर्णन वाचकांना स्वानुभवाचें वाटेल. इंग्रजींत 'white lie' (ऊर्फ निरुपद्रवी असत्य!) म्हणून ज्याला म्हणतात, त्याची व्यवहारांत किती जरूरी असते, हें लेखकानें सुंदरपणें दाखविलें आहे.

निबंधाच्या शेवटीं शेवटीं सबबी सांगण्यामुळें होणाऱ्या अनिष्ट परिणामांची लेखकानें केलेली मीमांसा मार्मिक असली, तरी निबंधाच्या वातावरणाशीं थोडी विसंवादी वाटते. अर्थात् तें तात्त्विक विवेचन लेखकानें पुढील विवेचनाशीं मोठ्या खुबीनें सांधून घेतलें आहे.

जीवनांतील सौख्य, त्रास आणि हास्यकारक विसंगती, घरगुती अनुभवांच्या रूपानें सांगणें, हें प्रो. अदवंत यांच्या लघुनिबंधाचें स्वरूप होय. हा विषय आणि ही कथनपद्धति आपणांपैकीं कोणाला प्रिय नाहीं! प्रो. अदवंत यांचे हे निबंध वाचकांचें रंजन करतील असा मला भरंवसा वाटतो याचें कारण हेंच होय.

प्रो. अद्वंत यांनीं हे निबंध वेगवेगळ्या काळीं आणि वेगवेगळ्या निमित्तानें लिहिले आहेत. या दृष्टीनें निबंधानिबंधांत थोडाफार फरक असणें साहजिक आहे. तथापि प्रो. अद्वंत यांची वृत्ति, या निबंधप्रकाराला जात्याच अनुकूळ असल्यानें त्यांनीं या प्रकारांत अधिकाधिक विहार करावा असें मजप्रमाणें त्यांचे वाचकहि म्हणतील यांत शंका नाहीं.

प्रो. अद्वंत यांच्या लघुनिबंधसंग्रहांतील मनमोकळ्या विचार-विलासामुळें आणि साध्या पण प्रसन्न शैलीमुळें, मजप्रमाणेंच वाचकांचाहि त्यांजवर लोभ जडेल, अशी आशा व्यक्त करून मी हा संग्रह वाचकांच्या हातीं देण्याला त्यांना मन:पूर्वक प्रोत्साहन देतों व हें प्रास्ताविक संपवितों.

२९।४।५०
तुकाराम आश्रम
टिळकवाडी, पुणें २

श्रीकृष्ण के. क्षीरसागर

# अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| प्रस्तावना—प्रा. श्री. के. क्षीरसागर | | .... | |
| ( १ ) मनाचे संकल्प | .... | .... | १ |
| ( २ ) अपेशी कोट | .... | .... | ८ |
| ( ३ ) स्वत:भोवती फिरणारी माणसे | | .... | २३ |
| ( ४ ) पत्राची पेटी | .... | .... | ३२ |
| ( ५ ) प्रवासांतील सोबती | .... | .... | ४२ |
| ( ६ ) इस्पितळाबाहेरील वेडे ! | .... | .... | ५८ |
| ( ७ ) संसारांतील रम्य झरे | .... | .... | ६८ |
| ( ८ ) नको असलेलीं पत्रें | .... | .... | ८१ |
| ( ९ ) भिडस्त माणसाची ढाल | .... | .... | ९१ |
| १० ) घासलेटच्या बारींत | .... | .... | १०३ |
| ( ११ ) कांहीं तरी जगावे गळं ! | .... | .... | १०८ |
| ( १२ ) तुमच्या मनाचे चोरकप्पे | .... | .... | ११९ |
| ( १३ ) पुराणांतील वांगी | .... | .... | १२६ |
| म. ना. चे मनोगत | .... | .... | |

# मनाचे संकल्प

संकल्प व सिद्धि यांच्यामध्ये नेहमीं परमेश्वराचा हात असतो असें म्हणतात. पण माझा अनुभव अगदी निराळा आहे. संकल्प आणि सिद्धि यांमध्यें परमेश्वराचा हात कांही असत नाही; पण आळसाचा डोंगर मात्र असतो. आणि हा डोंगर एवढा कठीण व उंच असतो कीं, संकल्पाच्या स्थानाहून निघालेला माणूस मध्येंच कुठेंतरी नामोहरम झाल्याशिवाय राहात नाही. अपवाद सोडून दिले तर माझ्यासारख्या सर्वसाधारण व्यक्तींना हे आळसाचे डोंगर ओलांडणें अतिशय कठीण जातें व संकल्प करण्यापलीकडे त्यांच्या हातून फारशी प्रगतीहि होत नाहीं.

हे सर्व विचार माझ्या मनांत येण्याचें कारण म्हणजे माझ्या टेबला-वर असणारा इब्सेनच्या नाटकांचा मोठा ग्रंथ. चार वर्षांपूर्वी मोठ्या उत्साहानें मीं तो विकत घेतला होता. व त्याचीं सर्व नाटकें एकदां समग्र वाचूनहि काढलीं होतीं. त्याच वेळीं त्याच्या नाट्यवाङ्मयावर रसग्रहणात्मक लेखमाला लिहावी असा संकल्प मनांत करून टाकला होता; आणि म्हणू-नच दर दिपवाळीच्या व उन्हाळयाच्या सुट्टीच्या सुरवातीला माझ्या त्या संकल्पाची मला चांगली आठवण राहावी म्हणून मी तें पुस्तक टेबलावर समोर ठेवत असें. पण तो ग्रंथराज पाहिल्यावर ‘ आज नको आतां— उद्यां नक्की सुरवात करूं ’ असा हवाला मनाला देत देत सुट्टी संपली कीं फिरून तें पुस्तक मी कपाटांत ठेवून देई. मात्र दुसऱ्या सुट्टीच्या सुरवातीला पुन्हां तें कपाटांतून निघून टेबलावर येऊन बसण्यास चुकत नसे. आजच मीं तें कपाटांतून काढून टेबलावर ठेवलें आहे. ‘ घोस्ट्स्’मधील ऑस्वल्ड, ‘ अॅन् एनिमी ऑफ् दि पीपल’मधील डॉ. स्टॉकमन्, ‘ डॉल्स हाऊस’ मधील नोरा, ‘ दि मास्टर बिल्डर’मधील हाल्वर्ड इत्यादि कितीतरी अविस्मरणीय व्यक्तिदर्शनाचे नमुने माझ्या डोळयांसमोर उभे राहत

आहेत. पण दर सुट्टीप्रमाणे याहि वेळीं तें पुस्तक तसेंच कपाटांत जाणार याचीहि मला खात्री आहे.

कॉलेजांत असताना तेथील रम्य वातावरणांत दर क्षणाला नवेनवे संकल्प करायचा मी! १ जुलैपासून अभ्यास नियमितपणें करण्याचा संकल्प तर दर वर्षी मी करीत आलों व दर वर्षी तितक्याच नियमितपणें मी मोडत आलों. संकल्पाला नव्याच्या नऊ दिवसांचे वारेसुद्धा कधीं लागले नाही. जानेवारीत खडबडून जागें व्हायचें व खूप हातपाय हालवून व धडपड करून कसाबसा परतीराला जाण्याचा प्रयत्न करायचा हा माझा ठराविक शिरस्ता!

माझ्या संकल्पामध्येसुद्धा एक प्रकारचें वैशिष्ट्य आहे. 'आजपासून' हा शब्द माझ्या निश्चयांना माहीतच नाही. बहुतेक निश्चय केल्यापासून पांचव्या किंवा सहाव्या दिवसापासून त्याची अंमलबजावणी सुरू करायची असते. 'सहसा विदधीत न क्रियाम्' हें तत्व निश्चयाच्या बाबतींत तरी माझ्या मनाला पूर्णपणें पटलें असल्याचें दिसतें. पण येवढें मात्र खरें, की निश्चय केल्यापासून मधले चारपांच दिवस अगदी छान जातात. आपण आणखी पांचसहा दिवसांनीं आपल्या संकल्पाप्रमाणे वागण्यास सुरवात करणार आहोंत, त्यानंतरचा आपला कार्यक्रम यंत्राप्रमाणे सुरळीत चालेल ही कल्पनाच मनाला अतिशय आनंद देते. पण ज्या दिवसाची वाट पाहात आनंदानें पांचसहा दिवस घालवलेले असतात तो दिवस आला की हालाला सुरवात होते. आतापर्यंत अनिर्बंधित रीतीनें वेळ घालविण्याची संवय झाल्यानें एकदम शरीरावर व मनावर पडलेलें नियमितपणाचें दडपण दोघांनाही असह्य होतें. आळसाला चटावलेलें मन सारखें या विशिष्ट निर्बंधांविषयीं कुरकूर करीत असतें. उत्साहाच्या भरांत त्या बिचाऱ्या मनाचा आवाज कुणालाच ऐकू येत नाही. पण हळूहळू मनाची गुणगुण प्रबळ होऊ लागते. आणि त्याला परिस्थितीचें साहाय्य मिळालें की

मग मनाचा जय होतो. 'आज आपण ठरविल्याप्रमाणे नाही वागलों तर?... आजचाच दिवस! काय हरकत आहे? असा विचार मनांत आला की आपण केलेल्या निश्चयाचा हळूहळू खून होत आहे याची मी खूणगांठ मनाशी बांधून ठेवतों. अपेक्षेप्रमाणे हे 'आजचे'च दिवस फार उगवतात व शेवटीं अपवाद नियम होतो व नियमाला अपवादाच्या रूपानें राहावें लागतें.

व्यायामाच्या संकल्पापुढे तर मीं हात टेकले आहेत. किंबहुना व्यायामाच्या संकपल्पानें माझ्यापुढे हात टेकले आहेत असेंच म्हणणें जास्त सयुक्तिक होईल. मीं हे संकल्प कितीदा केले व कितीदा मोडले याची खानेसुमारी करणेंसुद्धा मला कठीण जाईल. एकदा तर चिडून मी दुकानांत जाऊन ताड्कन् सात रुपयांचे डबेल्स घेऊन आलों. कल्पना ही, की निदान पैसे खर्च झाले या लाजेखातर तरी मी त्याचा उपयोग करीन. साबणाच्या पाण्याच्या फुग्यांप्रमाणे दोनतीन दिवस या संकल्पाला मोहक स्वरूप आलेंहि; पण तीन दिवसांतच फुगा पार फुटला आणि पेपरवेट्स् म्हणून मी डंबेल्सचा उपयोग करू लागलों!

पहाटें उठून फिरायला जाण्याच्या बाबतींत तर कांही विचारायलाच नको! मीं तर तो निश्चय चुकून मनांत आणायचेंदेखील सोडून दिलें आहे. पहाटें हवा सुंदर असते, निसर्ग रमणीय असतो, वातावरण स्फूर्तिदायक असतें वगैरे साऱ्या गोष्टी एकदम कबूल. पण या रमणीय गोष्टी माझ्या-करिता नाहीत हें मीं मनाशी पक्कें ठरवून ठेवलें आहे. नाही म्हणायला चुकून एकदा केव्हां पहाटें फिरायला गेलों होतों आणि तेंही माझा एक मित्र एखाद्या ग्रहासारखा पहाटें उठून माझ्या राशीलाच बसला म्हणून! कुठून त्या दिवशीं त्याला इतकी स्फूर्ति आली होती देव जाणे! रात्रीं पाऊस पडल्यामुळे चिखल खूप झाला होता, हवेंत गारवा खूप होता, आकाशांत काळे ढग भेडसावीत होते नी या वीराला 'जगापासून दूरदूर' जाण्याची स्फूर्ति आली होती! बरें, जगापासून दूर जायचे तर एकट्यानें

तरी जावें! कुणीं हरकत घेतली असती? पण छे! मित्रप्रेम या वेळेलाच उफाळून आलें नाहीं तर तो मित्र कसला? खूप लांब टेकडीवर नेलें त्यानें मला आणि एकदम मुसळधार पाऊस यायला सुरवात झाली. टेकडी आम्ही कशा स्थितींत उतरलों, कशा स्थितींत घरीं आलों याचें वर्णन यापुढें करायलाच हवें का? त्यामुळें 'मॉर्निंग वॉक' म्हटला की अद्याप माझ्या छातींत धडकी भरते!

संकल्प व सिद्धि यांच्यामध्यें आळसाचा डोंगर उभा असतो याचा सगळ्यांत मोठा अनुभव कुठें आला असेल तर लेखनाच्या बाबतींत! पुष्कळ वेळेला चांगल्याचांगल्या कल्पना डोक्यांत येतात. बरींवाईट कथानकें डोक्यांत घोळत असतात आणि अशा कल्पना किंवा कथानकें सुचलीं म्हणजे मी निश्चय करतों की आतां लिहायला सुरवात करायचीच! अर्थात् संकल्प सोडण्याचा कार्यभाग तत्परतेनें होतो; पण पुढें आलेल्या पानावर कांहीच येत नाही. अेकदां तर अेका कादंबरीचें कथानक सबंध दोन दिवस माझ्या मनांत घोळत होतें. अर्थात मनांत घोळण्यापलीकडे त्याची प्रगति कधींच होऊ शकली नाही. त्यामुळें महाराष्ट्ररसिकाला माझ्या आळसाला धन्यवाद द्यावेसें वाटल्यास नवल नाही. एरवीं माझ्या डोक्यांत येणाऱ्या साऱ्याच कल्पना व कथानकें मीं जर कागदावर उमटविलीं असतीं तर मराठी वाङ्मयांत काय हाहाःकार उडाला असता कोण जाणे!

यामुळें मित्रांनादेखील आश्वासनें देतांना मला फार जपून द्यावीं लागतात. एका मित्राला तो गावाला जाताना दर पंधरा दिवसांनीं पत्र लिहिण्याचें आश्वासन मीं दिलें होतें. या गोष्टीला आज पंधरा महिने होऊन गेले! त्याचीं मला जवळजवळ सातआठ पत्रें आलीं आहेत तरी मी अजून त्याला पत्र लिहितोंच आहे! त्या माझ्या मित्राचा पोस्टखात्यावरचा विश्वास तरी एव्हाना उडाला असेल किंवा माझा पंधरवडा हा सर्वसामान्य मानवकोटींतला पंधरवडा नाही अशी मनाची समजूत करून तरी तो स्वस्थ बसला असेल!

मला तर आतां असें वाटूं लागलें आहे, की आयुष्यांत एकच संकल्प मीं पाळला असेल आणि तो म्हणजे केलेले संकल्प नियमानें मोडण्याचा! त्यामुळें माझें जीवन म्हणजे संकल्प व सिद्धी यांचा पाटशिवणीचा खेळच झाला आहे. या पाटशिवणीच्या खेळामध्यें संकल्पाची व सिद्धीची मात्र केव्हांच गाठ पडत नाही. एखादे वेळीं होतें काय, की संकल्प केला नसतांनासुद्धा सिद्धीच अचानकपणें प्राप्त होते. कांहीतरी खरडायला म्हणून कागद पुढें घेऊन बसावें आणि एकामागून एक भराभर कल्पना सुचून एक लघुकथा तयार व्हावी असें किती वेळां तरी झालें आहे. मुद्दाम लघुकथा लिहिण्याचा बेत करून बसलों की "आज माधवराव आफीसामधून आले ते जरा रागांतच!" किंवा "सुशीलेच्या जीवनांतील अपूर्व दिवस होता तो— निदान तिला तरी तो तसा वाटला." या पहिल्या वाक्यापलीकडे गाडी कधीं जातच नसे! कालिदासाचीं नाटकें वाचण्याचा मीं जेव्हां संकल्प केला होता त्या वेळीं मी नांदीच्या पलीकडे कधींच गेलों नाही. पण एकदां सहज करमणूक म्हणून शाकुंतल वाचायला घेतलें तेव्हां तें तर वाचून संपवलेंच; पण 'मालविकाग्निमित्रम्' व 'विक्रमोर्वशीयम्' हीं दोन नाटकेंहि वाचून काढलीं. त्यापेक्षाहि लहानपणीं एक गंमत झालेली मला आठवते. शाळेची पळण्याची शर्यत मी पाहायला म्हणून गेलों व त्या शर्यतींत भाग घेऊन मी तिसरा नंबर मिळविला. फार लांब कशाला? मागच्याच वर्षी कसेंतरी एम्. ए. पास होण्याच्या उद्देशानें मीं संस्कृत प्रमुख भाषा होती ती बदलून मराठी प्रमुख भाषा घेतली. उद्देश हा की मराठीचा अभ्यास सोपा असतो; निदान उत्तीर्ण होण्याला अडचण पडूं नये. पण सुदैवानें संकल्प केला नसतांनाहि, माझा मराठीचा अभ्यास चांगला झाला आणि परिक्षेंत पहिला वर्ग मिळून शिवाय चिपळूणकर पारितोषिकहि मिळालें. हे सारे जीवनांतील अपघातच नव्हेत तर काय? आणि संकल्पाप्रमाणे वागून मिळविलेल्या सिद्धीपेक्षा या सिद्धींत खरोखरच कांही अपूर्व गोडी आहे हेंहि आपण कबूल केलें पाहिजे.

कारण संकल्पामुळे येणारी सिद्धि अपेक्षित असते व त्यामुळे त्यांतील नावीन्य बरेंचसें कमी झालेलें असतें. पण या अपघातांतील सिद्धि अनपेक्षित आणि म्हणून नावीन्यपूर्ण असते. पण दुर्दैवानें असे गोड अपघात मानवी जीवनांत फारच थोडे घडून येतात. लॉटरींत दहा लाखांचें बक्षिस मिळविणारा एकच असतो; बाकीचे हजारो दहा रुपये गेल्याबद्दल हळहळणारेच असतात.

माझे स्वत:चे निश्चय सिद्धीला कधींच जात नाहीत म्हणून मला कधींकधीं वाईट वाटतें. पण मी लगेच मनाचें समाधान करतों. मनुष्यानें निरनिराळ्या निश्चयाच्या बंधनांत स्वत:ला जखडून घेऊन सारें जीवन यांत्रिक करून टाकण्यांत काय अर्थ आहे? अगोदरच नोकरी किंवा जीवनार्थ इतर कराव्या लागणाऱ्या गोष्टींमुळे आपल्या जीवनांत बंधनें निर्माण झालीं आहेतच. त्यांत पुन्हां राहिलेल्या वेळेचें वेळापत्रक करून आपल्या मनाला व शरिराला जरादेखील मोकळेपणाचें सुख अनुभवूं न देणें म्हणजे निर्दयपणा नाही का? अर्थात् मला अशा रीतीनें नियमांच्या व निश्चयाच्या बंधनांनीं आपलें सारें जीवन मर्यादित करून टाकणाऱ्या माणसाबद्दल अत्यंत आदर वाटतो, त्याच्या मनोधैर्याचें कौतुक करावेंसें वाटतें, पण अशा माणसाबद्दल प्रेम, आपेलपणा वाटत नाही. घड्याळसुद्धां बिचारें पुढेंमागें होतें; पण अशा माणसाचे कार्यक्रम पुढेंमागें होत नाहीत. यशाचा ध्येयदीप गाठण्यासाठी ते जात असतात खरे; पण त्याचें सारें लक्ष त्या दीपावरच असतें आणि त्यामुळे त्यांच्याभोवतीं पसरलेली रम्य वनश्री, पक्ष्यांचें मधुर गायन, उष:कालचें रम्य स्वरूप या सगळ्यांना तो पारखा झालेला असतो.

शिवाय निश्चय करून त्यांच्या मोहक स्वरूपाकडे पाहात बसण्यांत व त्यांचें पार्थिव स्वरूप उघडकीला आलें कीं तें मोडण्यांत काय गंमत असते हें या लोकांना कुठलें कळणार? साबणाचे फुगे क्षणजीवि असतात; पण त्यांच्या मोहक स्वरूपाकडे आपण पाहात बसतोंच ना? इंद्रधनुष्य आका

शांत येतें, थोडाच वेळ टिकतें व लागलीच नाहीसें होतें; पण तेवढ्यांत कित्येकांचीं मनें तें आपल्या मोहकतेनें आकर्षून घेतें. उद्यां तें इंद्रधनुष्य कायमचें आकाशांत ठेवण्याची परमेश्वरानें व्यवस्था केली, तर मला वाटतें त्याच्याकडे कुणी ढुंकूनहि बघणार नाही! संकल्पाचें असेंच नाही तर काय? थोडा वेळ संकल्पाशीं खेळण्यांत, त्याचें मोहक स्वरूप बघण्यांत गंमत वाटते. पण संकल्प आपणाकरिता नसून आपण संकल्पाकरिता आहोंत अशी मनुष्यानें कल्पना करून घेतली की तो संकल्पाचा दास होतो.

आणि म्हणूनच माझे संकल्प टिकत नाहीत किंवा त्यांना सिद्धि प्राप्त होत नाही याबद्दल मला बिलकूल वाईट वाटत नाही. 'माझ्या आळशीपणाचें हें समर्थन आहे' या कल्पनेनें कांहीजण या विवेचनाला हसतील याची मला पूर्ण कल्पना आहे. हसोत बिचारे! पण म्हणून मी नवेनवे संकल्प करण्याचें व ते नियमानें मोडण्याचें कार्य थोडेंच बंद ठेवणार आहे? आणि हें कार्य चालू असतांनाच मधूनमधून जीवनांतील गोड अपघात फिरून कोणत्यातरी रम्य स्वरूपांत यावेत अशी मीं अपेक्षा केली तर ती चूक ठरेल का?

# अपेशी कोट

'शकुनापशकुनांवर माझा विश्वास नाही' असं मी अट्टाहासानं मनाला बजावीत होतों तरीदेखील आग्रहानं तें सारखं म्हणतच होतं, 'तें कांही नाही. तूं तो अपशकुनी कोट घातलास—अन् म्हणूनच तुझ्या साऱ्या कामाचा आज असा विचका उडाला. तरी मी सारखा बजावीत होतों— पटलं नाही तुला—'

त्याचं असं झालं होतं ऽ—

नगरला त्या दिवशीं माझं अत्यंत महत्वाचं काम होतं—साडेचारची गाडी साधणं शक्य नव्हतं—संध्याकाळच्या एक्सप्रेसनें निघून साडेचारची गाडी दौंडला पकडण्याचा एकच संभव माझ्या डोळ्यासमोर होता. अत्यंत घाईनें मी तयारी केली, कोट घालण्याकरितां खुंटाळ्याकडे वळलों. आणि खुंटाळ्याकडे दृष्टि जाताच मी एकदम चरकलों.

एकच निळा कोट खुंटाळ्यावर लटकत होता. बाकीचे सारे कोट परटाच्या भेटीला गेले होते.

आणि तो कोट अत्यंत अपेशी म्हणून मी आतांपर्यंत तो अंगावर फारसा कधींच चढवला नव्हता. आणि तो अपेशी ठरायला कारणंही तशीच झालीं होतीं. ज्या ज्या वेळेला मी तो कोट घातला त्या त्या वेळेला कांही ना कांही तरी विघ्न आणून त्या कोटानें अपेशीपणाची प्रचिती मला चांगलीच आणून दिली होती. ज्या दिवशीं शिंप्याकडून आल्यावर प्रथमच मी तो कोट घालून सायकलवरून बाहेर पडलों, त्या दिवशी उधळलेल्या म्हशीशी स्पर्धा करण्याच्या आवेशांत माझ्या सायकलनें त्या महिषीशी टक्कर दिली व एक महिना झोळींत हात अडकवून मला फिरायला लावलें. दुसऱ्या प्रसंगीं तो कोट घालून मी हिंडत असतां 'फाड्ऽ' असा विलक्षण आवाज करून माझ्या सायकलच्या मागच्या चाकानें दगा दिला. तिसऱ्या एका

प्रसंगीं एका चांगल्या सिनेमाला आम्ही गेलों असता माझ्या नंबरापर्यंत येऊन फॅमिली सर्कलचीं व चौदा आण्याचीं तिकिटें बंद झालीं व तिकिट विकणारा मला एक रुपया दोन आण्याचीं तिकिटें घेण्याचा आग्रह करू लागला. पण त्या त्याच्या आग्रहाला न जुमानता आम्हीं शेजारच्या थिएटरमध्ये एका भिकार चित्रपटाला गेलों व चित्रपट मध्येंच तुटला म्हणून चिडून अर्धा चित्रपट टाकून परत आलों. अशा कित्येक प्रसंगामुळे मीं असं ठरवलं होतं कीं हा कोटच अपेशी आहे. आणि म्हणून त्या कोटाकडे पहाण्याचें देखील सोडून दिलें होतें मीं !

——आणि तोच कोट डोळे फाडून खुंटाळ्यावरून डौलानें माझ्याकडे पहात होता.

क्षणभरच मी मनांत चरकलों. वाटलं, कोट न घालतां तसंच निघावं आज प्रवासाला. पण दुसऱ्या क्षणींच माझ्या या नेभळट विचारांचें मलाच हंसू आलें. मीं तो कोट खुंटाळ्यावरून काढला, अंगावर चढवला व बॅग घेऊन बाहेर पडलों.

" कोणता कोट घालताय लक्षांत आहे ना ? " दरवाज्यांत माझ्या पत्नीनें मला हटकलं. " हातपाय न मोडता सुरक्षित परत या घरीं. "

माझ्या कोटाच्या अपेशीपणाच्या विचित्र समजुतीवर हा टोला आहे हें मीं ओळखलें.

" घाबरू नकोस, " मीं हंसत म्हटलं, " निदान या खेपेस कुणा म्हशीशीं सलगी करणार नाही हें निश्चित. " आणि मी बाहेर सटकलों.

तिथून माझ्या हालाला सुरवात झाली.

जवळपास कुठें तरी टांगा मिळेल या हिशोबानें मी बाहेर पडलों होतों. पण लक्ष्मी रोडपर्यंत आलों तरी टांगा नाही. वाटेंतील दोन-तीन टांगा-स्टँडस् पार रिकामे ! मी आश्चर्यचकित झालों. आजच सगळे टांगे एकदम पासाला तर गेले नाहीत ना—अशीही शंका मला आली. आणि

मग एकदम आठवलें; सगळे टांगे आज संपावर गेले होते. आणि सकाळीं मीं ती बातमी वर्तमानपत्रांत वाचली होती. झालं ऽ! टांगा मिळण्याची तर आशाच खुंटली. गाडीला ३५ मिनिटें फक्त उरलीं होतीं—तीन मैल रस्ता ३५ मिनिटांत केवळ धांवूनच काटणें शक्य होतें. शेवटीं टांगा नाही तर निदान बस् तरी मिळेल या आशेनें मी बस्—स्टँडपाशी उभा राहिलों.

पण पुण्याच्या बसेस् वाट पहात असल्यावर कधीं वेळेवर येतील तर शपथ! नको असतील त्यावेळीं लागोपाठ तीन—तीन बसेस् रिकाम्या जातील. पण आज, दहा मिनिटें झालीं, एकाही बस्चा पत्ता नाही. शेवटीं एकदाची बस् येतांना दिसली, मी आंत उडी मारण्याच्या पावित्र्यांत उभा राहिलों—आणि माझ्यादेखत ती चक्क पुढे निघून गेली. 'जगा नहीं' हें कंडक्टरचें वाक्य मात्र माझ्या कानावर आदळलें. दुसरी बस् आली—तीही भरलेली! आतां मात्र मी निराश झालों—२५ मिनिटें उरलेलीं! बस् नाही—टांगा नाही. गाडी गांठणार कशी?

इतक्यांत पुण्यांत नवीनच सुरू झालेल्या वाहनाचा—सायकल रिक्शाचा—मालक रस्त्यानें जातां जातां थांबला.

"काय साहेब, स्टेशनवर जायचं का?" त्यानें माझ्या हातांतील बॅग पाहून पृच्छा केली.

"वीस मिनिटांत स्टेशनवर नेणार का?" मीं साशंक मनानें विचारलें.

"वीस? दहा मिनिटांत नेतों! मोटारपेक्षा फास्ट आहे गाडी!" त्यानें मला ग्वाही दिली. "पण रुपया पडेल साहेब."

साहेबाला हुजत घालायला सवड होती कुठं? त्यांनीं लगेच बॅग् आंत ठेवली व त्या रिक्शांत आसन ठोकलें.

आत्तांपर्यंत मी रिक्शांत कधींच बसलों नव्हतों. उलट रिक्शांत बसणाऱ्या माणसांची आम्ही टिंगल मात्र करीत असूं. त्यामुळे आज

रिक्शांत बसताना मला अगदीं चमत्कारिक वाटत होतें. सगळे लोक माझ्याकडे पाहून हसताहेत असा मला भास होऊं लागला. रिक्शा जोरांत मार्ग कापीत होती,—पण त्याहीपेक्षा जोरांत जाऊन लवकर एकदां तिनं मला स्टेशनवर सोडलं तर बरं असं मला वाटायला लागलं. वाटेंत कुणी ओळखीचं भेटू नये अशी मीं मनांतल्या मनांत प्रार्थना पण केली.

पण अशा वेळीं ओळखीचे लोक न भेटले तरच आश्चर्य! रस्त्यांतून रिक्शा चालली असता नेमके चार–पांच विद्यार्थी सामोरे आले. "अरे ते पहा अदवंत सर—" एकाचे कुणाचे तरी उद्गार माझ्या कानावर आले. मीं डोळे मिटून घतले.

रिक्शा पंधरा मिनिटांत स्टेशनवर आली. मीं मनगटावरील घड्याळाकडे पाहिलें. गाडी सुटायला अद्याप दहा मिनिटें अवकाश होता. मी धांवतच तिकिट ऑफिसकडे गेलों. खिशांतून दहाची नोट काढली व खिडकींतून ती आंत ढकलीत अर्धवट गेलेला श्वास परत मिळवीत म्हटलं, "एक नगर प्लीज!"

त्या आंतील गृहस्थानें शांतपणें माझ्या धांदलीकडे व माझ्या हातांतील नोटेकडे पाहिलें व उत्तर दिलें, "मिस्टर, मद्रास एक्स्प्रेस जाऊन दहा मिनिटं झालीं."

"ऑं!" मी दचकून 'आ' करत्वासमोरच्या घड्याळाकडे दृष्टि फेंकली. तों खरेंच! मद्रास एक्स्प्रेस जाऊन वर दहा मिनिटें लोटलीं होतीं. मीं मनगटावरील घड्याळाकडे पाहिलें. अन् त्यांत मद्रास एक्स्प्रेस सुटायला सात मिनिटें अवकाश होता. कधीं दगा न देणाऱ्या घड्याळानें आज दगा दिला होता. घड्याळ २० मिनिटें मागें राहिलें होतें!

मनांतल्या मनांत वक्तशीरपणाबद्दल एक्स्प्रेसला व दगा दिल्याबद्दल घड्याळाला लाखोली वाहात मी बस् स्टँडपाशीं आलों. रिक्शानें परत स्वतःची मिरवणूक काढण्याचा माझा विचार नव्हता. अपेक्षेप्रमाणे बस्–

स्टँडवर बस् एकही नव्हती. पण किती जरी वेळ थांबावं लागलं तरी बस्नेंच जायचं ही मीं दृढप्रतिज्ञा केली असल्यामुळंच कीं काय, दहा मिनिटांत एक बस् आली. ती होती कँपच्या रस्त्यानं जाणारी. तरी पण दोन पैसे जास्त गेल्याचं दुःख नाही, बस् तर मिळाली या समाधानांत मीं बसमध्यें पाऊल टाकलें. दहा मिनिटांनीं बस् निघाली.

आणि कँपमध्यें बस् आल्यावर मोटारचं पेट्रोल संपलं! झालं! गाडी तिथेंच खडी! उतारूंनीं पृच्छा केली कीं, 'हां साहेब—आत्तां येईलच पेट्रोल' हें कंडक्टरचें उत्तर तयार. अर्धा तास झाला—पाऊण तास झाला. दुसरी बस् येईना व पेट्रोलहि येईना. मग तो कुठें बर्मांत पेट्रोल आणायला गेला असल्यास न कळे. शेवटीं मी चिडलों,—बॅग उचलली व कंडक्टरच्या आग्रहाला न जुमानता चालूं लागलों. कँपपासून स. प. कॉलेजपर्यंत तीन मैल हातांत बॅग घेऊन चालत आलों. पायांनीं तक्रार करायला सुरुवात केली होती; घरीं गेल्यावर कॉटवर अंग टाकून झोंप काढायची या एकाच कल्पनेनें उत्तेजित होऊन पाय झपझप उचलत होतों. घरीं आलों आणि तिसरा धक्का बसला.

घराला गलेलठ्ठ कुलुप होतें.

मी गांवाला गेलों या प्रामाणिक समजुतीनें आमच्या सौभाग्यवतीनें घराला—कुठलें कुणाला टाऊक—पण भलें मोठें कुलुप लावून कुठें तरी प्रयाण केलें होतें.

हा अगदीं कळस झाला! निदान त्या वेळीं मला तसें वाटलें; पण खरा कळस अद्याप पुढेंच होता. लेमन घेण्यासाठीं मी 'लकीं'त गेलों—आणि तेंथें या सर्वांवर पूर्णविराम् देणारा धक्का मला बसला.

माझ्या खिशांतलि दहा रुपयांची नोट नाहीशी झाली होती.

ती कशी, कुठें व केव्हां गेली याचा पत्ता नव्हता; पण कोटाच्या कोणत्याच खिशांत नव्हती त्या अर्थीं ती गेली हें निश्चित होतें.

त्यामुळे ज्या वेळीं एका तासानें मी परत आलों त्या वेळीं रागानें मीं तो कोट कोपऱ्यांत फेंकून दिला असल्यास नवल नाही.

कारण शकुन व अपशकुन हे सारे झूट आहेत अशी कितीही मी माझ्या मनाची खात्री करून देत असलों तरी 'आज हा सारा विचका झाला याला कारण हा अपशकुनी कोट' अशी माझं मन मला सारखं ग्वाही देतच होतं!

आणि माणसाच्या मनाची गंमतच मुळीं ही आहे. एकाद्या गोष्टींत अपजय वांट्याला आला तर आपणाला दोष देण्यापेक्षा इतर परिस्थितीवर दोषाचें खापर मनुष्य नेहमीं फोडत असतो. परिक्षेंत अपयश आलें तर तो नंबरच वाईट होता–ग्रहच प्रतिकूल होते–अशा रीतीनें समर्थन करणारे विद्यार्थी असतातच ना कांहीं! त्या बाबतींत विरुद्ध पक्षाचा गडी बाद करण्यासाठीं 'म्हसोबा' करणाऱ्या लहान मुलांनाच कशाला नांवं ठेवायला पाहिजेत?

शिवाय असं पहा–एकादी विशिष्ट गोष्ट आणि अपयश यांचा सारखा सारखा–काकतालीय न्यायानें कां होईना–पण संबंध येत गेला की मनुष्याचं मन नकळतच त्या गोष्टीविषयीं प्रतिकूल बनत जातं! एक विशिष्ट कोट घालून मनुष्य एकाद्या कार्याला गेला व चार वेळां सतत तें कार्य कांहीं कारणामुळे फिसकटलें तर पांचव्या वेळेला कार्याला जाण्यापूर्वी तो कोट घालताना तो विचारच करील.

माझा एक मित्र आहे. सध्या वधूपरिक्षेच्या मोहिमेवर आहे तो. मित्र म्हणून कित्येक वेळां तो मला बरोबर घेत असतो. पण योगायोग असा कीं ज्या ज्या मुली आम्ही उभयतां पहात असूं त्या हटकून काळ्या व कुरूप असत. शेवटीं तो चिडला. एके दिवशीं तो मला म्हणाला, "आतां तुला पुन्हां वधूपरिक्षेच्या वेळीं बरोबर नेणार नाही. तूं आलास की मुली काळ्या निघतात." आणि गंमत म्हणजे पुढल्याच वेळीं ज्या वेळीं तो एकटाच

वधूपरिक्षेला गेला त्या वेळीं मुलगी सुस्वरूप निघाली. त्यामुळे तर माझ्या-विषयीं त्याचा पक्काच ग्रह झाला आहे. इतका की ती सुस्वरूप मुलगी-देखील मला दाखवायचें तो टाळतो आहे.

पण त्यालाच कशाला हंसायला पाहिजे? माझ्याच जीवनाकडे मीं जर पाहिलें तर त्यांत कितीतरी जिनसांवर मीं 'यशोदायी' व 'अपशी' असे अलिखित शिक्के मारून ठेवलेले दिसून येतील. माझा त्याच्यावर विश्वास आहे असं नाही.—तरी पण एकादी अपेशी वस्तु घेऊन मला जर एकादें कार्य करायला सांगितलें तर मी त्याला कबूल होणार नाही. माझी मानसिक दुर्बलता असेल ही—पण ती आहे खरी.

मी एफ्. वाय्. ला असताना एक ब्लॅकबर्ड फाउंटन पेन घेतलें होतें. एफ्. वाय्.पासून बी. टी. पर्यंतचे सारे पेपर्स मीं त्या पेननें लिहिले होते व सर्व परिक्षांत मला चांगलें यश मिळालें होतें. त्यामुळे ते अगदी नादुरुस्त झालें होतें, त्यांतून शाई बाहेर येत होती, तरी मीं तें शकुनी पेन म्हणून जपून ठेवलें होतें. मागील वर्षी एम्. ए. करिता मुंबईला जाण्याची वेळ जसजशी जवळ जवळ आली तसतशी मला माझ्या त्या पेनची आठवण होऊं लागली. वास्तविक माझ्याजवळ आतां पारकरचें सुंदर पेन होतें; पण त्यानें पेपर्स लिहिण्याची माझ्या मनाची तयारी होईना. ज्या पेननें मला आत्तां-पर्यंत यश मिळवून दिलें तेंच पेन मला पाहिजे होतें. पण दुर्दैवानें तें कुठेंच सापडेना. सामान हलविण्याच्या गडबडींत तें कुठेंतरी हरवून गेलें होतें. पेन हरवून गेल्याचें कळतांच मी चांगलाच गडबडलों, पत्नीवर खूप संता-पलों. तिला म्हटलें देखील, "माझं शकुनी पेन तूं हरवलंस—आतां मी एम्. ए. मधें नापास झालों तर तूं जबाबदार राहशील." तिनं जरा हंसत म्हटलं, "अहो, पण पारकर पेन शकुनी नाही कशावरून? माझं पेन आहे तें. कधीं दगा देणार नाही."—जरा नाखुषीनें मीं पार्करनें पेपर्स लिहिले.—आणि आतां तें माझं सर्वांत आवडतं व शकुनी पेन होऊन बसलं आहे.

या शकुनाच्या कल्पनेमुळे कित्येक वेळां मी हास्यास्पदसुद्धा झालों असेन. पांच वर्षांपूर्वी मी एक सर्जचा कोट केला होता. तो कोट अत्यंत यशस्वी अशी माझी समजूत आहे. आणि त्यामुळे अपुरा झाला तरी तो टाकून देण्याचं अद्याप माझ्या मनात येत नाही. त्याहीपेक्षा पुढची गंमत म्हणजे एम्. ए. च्या परिक्षेच्या वेळची. एप्रिलअखेरची वेळ व मुंबईसारखें स्थळ! उकाडा किती विलक्षण असेल याची कुणालाही कल्पना येईल. त्यांत परिक्षेकरितां ज्या हॉलमध्यें आम्हांला बसायचें होते त्या हॉलमध्यें वारा यायला जागा नव्हती. आंत आल्याबरोबर प्रत्येकानें अंगांतील कोट काढून मागील खुर्चीवर ठेवला; पण सर्जच्या कोटाच्या भाराखालीं मी घामानें निथळून जात होतों तरी मी कोट अंगातून बिलकूल काढला नाही. शकुनी कोट होता तो—तो काढला असता तर त्या कोटाबरोबर यशही बाहेर पळालें असतें अशी मला शंका आली की काय कोण जाणे? पण ११ ते ६ पर्यंत तो सर्जचा डगला अंगावर चढवून मॉ पेपर लिहीत होतों.—आंतील शर्ट घामानें पार भिजला होता; पण मला त्याची पर्वा नव्हती. काटाचा तट शरीराभोवतीं उभारून आंतील यश मीं जणूं कांहीं कोंडून धरलें होतें.

यशस्वीपणाच्या छापाबरोबर अपेशीपणाचा छाप बसलेल्या कितीतरी गोष्टी माझ्या संग्रहीं आहेत. 'संग्रहीं आहेत' असं म्हणण्याचं कारण इतकंच की त्या माझ्याजवळ पडून राहिल्या आहेत. त्या वापरण्याचें चुकूनसुद्धां माझ्या मनांत येत नाही. दोन वर्षांपूर्वी आमच्या सौभाग्यवतीच्या आग्रहावरून मीं सँडल्स खरेदी केल्या होत्या. मोठ्या ऐटीनें त्या दिवशीं सँडल्स घालून निघालों. चालण्याच्या भरात रस्त्यावरील खाचखळग्याकडे माझें लक्ष गेलें नाही,—आणि एका खड्डयांत माझा पाय ठराविक कोनापेक्षा निराळ्या कोनानें पडल्यानें तो चांगलाच मुडपला. आणि आठ दिवस त्या सँडल्स घालणेंच काय, पण चालणेंही मला अशक्य झालें. दुसऱ्या एका प्रसंगीं त्या सँडल्स घालून मी शाळेंत गेलों—आणि सँडल्सच्या नवेपणामुळे जिन्या-

वरून पाय घसरून मी क्षणभर सभोंवतालच्या विद्यार्थ्यांच्या कुतूहलाचा विषय होऊन बसलों. तिसऱ्या एका प्रसंगीं त्या सँडल्स घालून आम्ही एका बोलपटाला गेलो. बोलपटाला खूपच गर्दी होती. तिकिटें काढण्याकरितां मी त्या भाऊगर्दीत शिरलों आणि माझा अक्षरशः 'भाऊसाहेब' झाला. तिकिटें तर मिळालीं नाहीतच, पण लोकांनीं पायावर पाय दिले गेलेला, गर्दीने अर्धवट चेंदामेंदा झालेला व चष्म्याची एक काडी तुटलेला असा वीर मात्र क्षणभराने बाहेर पडला. मग सांगा,—त्या सँडल्सनां मीं अपेशी कां म्हणू नये?

बॅडमिंग्टनच्या रॅकेटचं रहस्य तर मला अद्याप उलगडलं नाही. मी एक अतिशय भारी अशी रॅकेट विकत घेतली. मी बॅडमिंग्टन चांगल्यापैकीं खेळतों असं मी बिलकूल समजत नाही, पण ज्यावेळीं मी त्या रॅकेटनें खेळतों त्या त्या वेळीं नक्की मला गेम मिळते. आणि गंमत म्हणजे त्याच खेळाडूंशीं दुसरी कोणतीही मोडकी रॅकेट जरी घेऊन खेळलों तरी त्या खेळाडूंना सहज गेम दिलेली आहे. पुष्कळांना स्वतःच्या संवयीच्या रॅकेट-शिवाय इतर रॅकेटनें खेळणे नीट जमत नाही. पण माझ्या रॅकेटच्या बाब-तींत सर्वच उलट आहे. यांतील काय रहस्य आहे देव जाणे. कदाचित् माझे व रॅकेटचे ग्रह जन्माच्या वेळीं—अर्थात् रॅकेटच्या जन्माच्या वेळीं—विरुद्ध पडले कीं काय कोण जाणे!

पण माझ्या या शकुनापशकुनाच्या कल्पना त्याहीपलीकडे गेल्या आहेत. निरनिराळ्या वस्तूंविषयीं माझे ग्रह अनुकूल व प्रतिकूल झाले आहेतच; पण त्याही पुढची गोष्ट म्हणजे वारांविषयीं माझ्या मनानें असेच कांही विक्षिप्त ग्रह करून घेतले आहेत. गुरुवार हा माझा घातवार असं मला एका ज्योतिषानें सांगितल्यापासून तर गुरुवारची मला अतिशय भीति वाटायला लागली आहे. वास्तविक ती भीति खरी ठरण्यासारखं गुरुवारीं विशेष कांहीच झाल्यासारखं मला वाटत नाही. उलट मी ज्याला शुभ

समजतों अशा सोमवारींच कितीतरी अप्रिय गोष्टी घडून आल्या आहेत. सोमवार चांगला वार म्हणून एकादी महत्वाची गोष्ट त्या दिवशीं करायला घ्यावी व त्यांत त्या दिवशीं हटकून अपेश यावं आणि सहजासहजीं ती गोष्ट गुरुवारीं साध्य व्हावी असं कितीदा तरी झालं असेल; तरी पण माझ्या मनाचा गुरुवाराविषयीं झालेला विचित्र ग्रह कांही केल्या निघत नाही. नाही म्हणायला गुरुवारीं मिळालेले दोनतीन अपयश मात्र नजरेसमोर उभे राहतात. मी शाळेंत असताना आमच्या वर्गाचा दुसऱ्या एका वर्गाशीं खो–खोचा सामना गुरुवारीं होता. त्या सामन्यांत माझ्या वर्गाच्या संघाचा मी कर्णधार होतों आणि माझ्या संघानें त्या वेळेला दणदणीत मार खाल्ल्याचें मला अजून आठवतें. दुसऱ्या एका प्रसंगीं शाळेंत वक्तृत्वाच्या चढाओढींत भाग घेतला असताना व्यासपीठावर ऐनवेळीं माझी वळलली बोबडी मला चांगलीच आठवते–आणि तोसुद्धा गुरुवारच होता. तिसऱ्या एका प्रसंगीं गुरुवारीं मला एका नोकरीकरितां इंटरव्ह्यूला बोलावलं होतें. त्या इंटरव्ह्यूमध्यें मी साफ 'पडलों'! या साऱ्या वास्तविक क्षुल्लक गोष्टी. पण त्या सुताचें भूत करून गुरुवार माझ्या मनाने घातवार ठरवला. त्यामुळे गुरुवारीं कोणत्याच गोष्टीची सुरुवात करण्यास माझा धीर होत नाही. न कर्त्याचा वार माझ्या बाबतींत तरी गुरुवार होऊन बसला आहे.

'साष्टांग नमस्कारां'तील सिद्धेश्वराला नवाच्या आंकड्याच्या वेडाबद्दल हंसणाऱ्या मला तेरा या आंकड्याविषयीं विलक्षण आपुलकी वाटू लागली आहे हें सांगितलें तर पुष्कळांना हंसू येईल. तेरा हा आंकडा इंग्रजांमध्यें अशुभ समजतात. पण मी इंग्रज नसल्यामुळेच की काय माझ्या बाबतींत तो अत्यंत शुभदायी ठरला आहे. तेरा तारखेला माझ्या जीवनाची सहचरी मीं प्रथम पाहिली. माझ्या एम्. ए. च्या नंबरामध्यें तेरा हा नंबर प्रामुख्यानें होता–इतकेंच नव्हे तर युनिव्हर्सिटी हॉलमध्यें परिक्षेच्या वेळीं सुरुवातीपासूनच्या तेराव्या टेबलावर मी बसलों होतों. परिक्षेंत पहिला वर्ग

मिळाल्याची कुणकुण लागली तीसुद्धा तेरा तारखेस व निकाल जाहीर झाला तोसुद्धा २६ तारखेस. मला आठवतंय–मी 'सकाळ' चं कोड सहज पाठवलं होतं आणि त्याला पहिलं बक्षीस मिळालं तेंहि तेरा तारखेस! या तेराचा व माझा काय विलक्षण संबंध आहे कोण जाणे. पण आवडत्या व्यक्तींच्या भेटी, अनपेक्षित पत्रं, अनपेक्षित लाभ हें पुष्कळ वेळां तेरा तारखेला झाल्याचं मला नक्की आठवतंय! विचित्र योगायोग हेंच खरं! आणि त्यामुळे कोणत्याही नवीन कार्याची सुरवात करताना मी तेरा तारखेला सुरवात करण्याची दक्षता घेतों. यश मिळतेंच असें नाहीं, पण समाधान तरी नक्की मिळतें. आणि तें का थोडें आहे?

आत्तांपर्यंत मला वाटत होतं कीं या शकुनापशकुनीपणाच्या कल्पना माझ्याच मनांत मुख्यत्वेंकरून आहेत; पण माझ्या सभोवतालच्या मित्रमंडळींतही या कल्पना बीजरूपानें कां होईना, पण वास करीत आहेत हा शोध मला नुकताच लागला व त्यामुळे आपण एकटेच वेडे नाहीं या कल्पनेनें मला जरा समाधान वाटलें. एकदा आमचा क्रिकेटचा सामना मोठ्या रंगांत आला होता. आमच्या शाळेचे गडी मोठ्या तडफेनें व विश्वासानें खेळत होते. इतक्यांत माझ्या शेजारचे शिक्षकमित्र मला म्हणाले, "झालंऽ! ×× मास्तर आले ना? झाला विचका आता खेळाचा!" मी जरा आश्चर्यानेंच माझ्या त्या मित्राकडे व त्या येणाऱ्या शिक्षकांकडे पाहिलें. आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्याच वेळीं शंभराच्या जवळ आलेल्या आमच्या खेळाडूची साफ दांडी उडाली आणि मग पुढें नुसती हजेरी सुरू झाली. 'आम्ही खेळतों आहोंत बरं का!' अशी प्रतिपक्षाला जाणीव देण्याकरितांच जणूं कांही खेळाडू पिचवर यायचे, एक–दोन चेंडू अडवायचे व प्रतिपक्षाच्या हातीं सोपा झेल देऊन गंभीर मुद्रेनें टाळ्यांच्या गजरांत–अर्थात् प्रतिपक्षाच्या–परतायचे. माझा मित्र म्हणाला, "पाहिलास ना यांचा पराक्रम? सात आठ–सामन्यांच्या वेळीं मुद्दाम मी पहातों आहें. हे आले कीं गडी भराभर बाद व्हायला सुरवात होते. कुणी तरी

सांगायला पाहिजे यांना कीं, सामन्याला येत नका जाऊं म्हणून!" अर्थात् त्यावेळीं मी तें हंसण्यावारीं घालवलें. वास्तविक या शिक्षकाच्या येण्याचा व गडी बाद होण्याचा अर्थाअर्थी कांही संबंध?–पण घसरगुंडी व्हायला व तो शिक्षक येण्याला प्रत्येक वेळीं गांठ पडल्यानें माझ्या मित्राच्या मनानें त्या दोहोंचा संबंध जोडला होता, आणि घसरगुंडीचे सर्व खापर प्रामाणिकपणें त्या शिक्षकाच्या मस्तकावर फोडलें होतें. त्या बिचाऱ्या शिक्षकाला आपल्या त्या सामर्थ्याची कल्पना नव्हती म्हणून बरें! नाही तर त्यानें चक्क सुपरिंटेंडेंटला सांगितलें असतें, "तुम्हाला आजच्या सामन्यांत विजय हवा असेल तर मुकाट्यानें मला सामन्याला न येण्याबद्दल मोबदला द्या–नाही तर प्रतिपक्षाकडून मी याच्या दुप्पट पैसे सामन्याला येण्याबद्दल मिळवूं शकेन." बाकी माझा मित्र सुपरिंटेंडेंट असता तर मॅचच्या दिवसांत अकरा ते सहा स्पेशल क्लासेस बोलावून त्यांची सर्व व्यवस्था यांच्या गळ्यांत घालायला त्यानें कमी केलें नसतें.

दुसऱ्या माझ्या एका ओळखीच्या घरीं कॉट्स् अजिबात नव्हत्या. चांगला श्रीमंत होता तो–घरीं इतर फर्निचरही व्यवस्थित होतं–पण कॉट् मात्र औषधालासुद्धा दिसत नव्हती. मी त्या गृहस्थाला याचें कारण विचारलें. तेव्हां तो म्हणाला, "आमच्या घराण्यांत कॉट मानवतच नाही. ज्या ज्या वेळीं आम्ही कॉट विकत घेतली त्या त्या वेळीं आमच्या घराण्यांत कुणाचा ना कुणाचा तरी अनपेक्षित मृत्यू झाला आहे. त्यामुळे आम्ही कॉटच विकत घ्यायची नाही असं ठरवलं आहे."

माझ्या ओळखीचा एक व्यापारी आहे. व्यापारांत त्यानं अतिशय पैसा मिळवला आहे. डेक्कन जिमखान्यावर त्यानं एक सुंदर बंगला पण बांधला आहे. पण तो स्वत: राहतो शुक्रवारांतील अरुंद बोळांतील अंधाऱ्या घरांत! किती जणांनीं त्याला त्याच्या जिमखान्यावरील हवशीर बंगल्यांत रहायला जायला सांगितलें असेल. पण त्याचें आपलें एक उत्तर! "या

घरांत मी लक्ष्मी मिळवली—हें घर मी सोडणार नाही:—हें माझं शकुनी घर आहे." जणूं कांही ता बंगल्यांत राहायला गल्याबरोबर त्याची लक्ष्मी मागील दारानें पळून जाणार होती!

माझ्या एका लेखकमित्राची गोष्ट त्याहीपेक्षा गंमतीची आहे. त्या लेखकाजवळ एक अखंड पट्टाचा पाट आहे. तो पाट खाली धरून त्यानें आपल्या लिखाणाला सुरवात केली व वाङ्मयाच्या दालनांत पहिलें पाऊल टाकलें. आतां तो नामवंत लेखक म्हणून ओळखला जातो व त्याला त्याच्या लिखाणावर पैसाही चांगला मिळाला आहे. त्याच्या घरांत एक—दोन सुंदर टेबलेंही आहेत. पण तो अद्याप लिहिण्याच्या वेळीं तो पाट सोडायला तयार नाही. त्याचा तो यशोदायी पाट आहे. तो म्हणतो, "या पाटानें मला वाङ्मयांत कीर्ति मिळवून दिली—आणि याच पाटाच्या सहाय्यानें मी पुढें पुढें जाणार आहे. ही माझी यशोमंदिरावर चढवण्याची पायरी आहे." यावर कोण काय उत्तर देणार?

नाही तरी ही प्रवृति थोड्याफार प्रमाणांत असतेच प्रत्येकाच्या मनांत! नवीन चित्रपटाच्या शूटिंगला सुरवात करताना किंवा तो प्रथम थिएटरमध्यें प्रकाशित करताना चांगला मुहूर्त पहाण्यांत येतो याच कारण तरी दुसरं काय? नवीन पातळाची घडी उलगडताना बायकांना चांगला दिवस पहावा लागतो—मुलाला प्रथम शाळेंत घालताना चांगला मुहूर्त हुड-कावा लागतो—इतकेंच काय तर दोन जीव संसाराच्या गाड्याला जुपताना पवित्र दिवसच ठरविण्यांत येतो; या साऱ्या गोष्टींच्या मुळाशीं दुसरी कसली प्रवृत्ति असणार? मला वाटतं माणसाचं मन थोडं भित्र असतं. या गोष्टींवर त्याचा विश्वास नसतो, पण मनांतील आंतला आवाज त्याला सांगत असतो: 'करीनास या गोष्टी? केल्यापासून फायदा नसला तरी तोटा होत नाही ना? उगीच अपेशाला वाव कशाला?' आणि हा मनांतला आंतला आवाज म्हणजेच अशा श्रद्धेचा नाजुक धागा! देवावर श्रद्धा नसलेला माणूस धर्म-विरोधी गोष्टी करावयास कचरत असतो याचें तरी तेंच कारण आहे.

माझा एक मित्र आहे. त्याची भुतावर बिलकुल श्रद्धा नाही, पण त्याला कुणी स्मशानांत जायला सांगितले तर मात्र तो तयार होत नाही. याचें कारण उघड आहे. त्याच्या मनाची जरी भूत नसल्याची खात्री असली तरी त्याच्या मनाचा आंतील आवाज त्याला हळूच विचारीत असतो, 'तें खरें—पण समजा भूत असलेंच तर— उगीच 'चान्स' घ्या कशाला?' हीच अवस्था थोड्याफार प्रमाणांत प्रत्येकाची असते. एकाद्या गोष्टीनं फार वेळ अपयश दिल तर नकळतच त्या वस्तूविषयीं त्याचा वाईट ग्रह बनत जातो. मानसशास्त्राप्रमाणे त्या वस्तूविषयीं त्याच्या मनांत एक प्रकारची भावना निर्माण होते. त्या भावनेला दडपण्याचा कितीही जरी त्यानें प्रयत्न केला तरी पुन्हां त्या वस्तूच्या उपयोगाच्या वेळीं ती उफाळून वर येते—आणि त्या वस्तूचा उपयोग करण्यापूर्वी त्याचं मन चरकतं. थोडक्यांत ती वस्तु 'अपेशी' असल्याबद्दलचा ग्रह त्याच्या मनामध्यें प्रत्येक अपयशाच्या वेळीं दृढ होत जातो.

आज विसाव्या विज्ञानयुगाच्या शतकांत मी या शकुनापशकुनाच्या कल्पना मांडताना पाहून बऱ्याच जणांना हंसू आल्याखेरीज राहणार नाही. पण या हंसणाऱ्या मंडळींनींही आपल्या मनाचें सूक्ष्म व प्रामाणिक पृथक्करण केलें तर या कल्पना अत्यंत बीजरूपानें कां होईना—पण त्यांना आपल्या मनांत दडलेल्या दिसून येतील. अर्थात् उघडपणें हे कुणीच कबूल करणार नाही. ज्या विज्ञानयुगांत कार्यकारणभावानें सगळ्या गोष्टींची उपपत्ति लावण्यांत येते त्या युगांत आज केवळ काकतालीय न्यायानें घडणाऱ्या गोष्टींबद्दल आपण विश्वास बाळगतों असें कोण कबूल करील? पण त्यांच्या मनाच्या आंतील कोपऱ्यांत अशा कांही गोष्टींची यादी नक्की येऊ लागेल कीं ज्या गोष्टींमुळे त्यांना सारखं यश किंवा अपयश मिळालं असेल. एकाद्या क्रिकेटपटूला आपली एकादी यशोदायिनी बॅट् डोळ्यासमोर दिसू लागेल कीं ज्या बॅटीनं खेळलें असतां तो कधींच शंभराच्या आंत आला नाही. एकाद्याला आपला टाय डोळ्यासमोर दिसू लागेल कीं जो टाय

घालून मोठमोठ्या कामाकरितां गेला असतां त्याचं काम नक्की यशस्वी झालं आहे. एकाद्या गवयाला 'ज्या तंबोऱ्यानें आपण गाण्याच्या बैठकी झुलवल्या' असा एकादा तंबोरा दिसायला लागेल. माझ्यासारख्या एकाद्या हतभागी माणसाला प्रत्येक वेळीं तोंडघशीं पाडणारा एकादा कोट दिसू लागेल. कित्येक स्त्रियाना आपले अलंकार दिसूं लागतील कीं ज्या अलंकारांनीं त्यांनीं आपल्या पतीचें मन प्रथम भारून टाकलें असेल. किंबहुना या कल्पना कित्येक वेळां याहीपुढें गेलेल्या आपल्याला दिसतात. घरांत नवीन सून आल्याबरोबर चांगल्या गोष्टी घडून आल्या तर तिला गुणाची लक्ष्मी म्हणून संबोधण्यांत येतं आणि ती आल्यावर—कुणाच्याही चुकीमुळें का होईना—पण दुर्दैवाचा फेरा घराण्यावर आलाच तर पांढऱ्या पायाची अवदसा म्हणून तिची संभावना होते. अपत्याच्या बाबतींतही तें अपत्य गुणी का अपेशी हें त्याच्या जन्मानंतरची परिस्थिति ठरवत असते. —आणि तरीही लोक म्हणतात कीं आमचा शकुनापशकुनाच्या कल्पनेवर विश्वास नाही—म्हणून.

याचं खरं कारण असं आहे—या साऱ्या गोष्टी काकतालीय न्यायानें घडून येतात.— त्यांचा परस्पराशीं वास्तविक कांही संबंध नाही हें बुद्धीला पटतें. पण पुष्कळ गोष्टी अशा असतात कीं ज्या बुद्धीला पटूनही भावनेला पटत नाहीत. त्यापैकींच या गोष्टी नाहीत तर काय? माझा तो अपेशी कोट घालण्याचा व गाडी चुकण्याचा कांहीतरी कार्यकारणभाव आहे थोडाच? त्या अपेशी कोटाऐवजीं मी तो जांभळा शकुनी कोट घातला असता तर त्या स्टेशन मास्तरानें माझ्याकरितां एक्स्प्रेस थोडीच थांबवून धरली असती? किंवा टांगेवाल्यांनीं आपला संप मोडून माझ्याकरितां टांगा थोडाच स्टँडवर हजर ठेवला असता? हें सारं बुद्धीला पटतं—पण भावनेला पटत नाही.

आणि म्हणून, 'तो अपेशी कोट घालून गेलों म्हणून माझ्या साऱ्या कामाचा विचका झाला' ही माझ्या मनाची समजूत बुद्धीनें कितीही समाधान केलें तरी नाहीशी होत नाही.

——

# स्वतःभोंवती फिरणारी माणसें

आमच्या मित्रमंडळीपैकीं बी. ए. च्या परिक्षेंत पहिला वर्ग मिळा-लेला एकजण उच्च शिक्षणासाठीं इंग्लंडला चालला होता. त्याला त्या उच्च शिक्षणासाठीं कोणतीतरी शिष्यवृत्ति पण मिळाली होती. तेव्हां आम्हां मित्रवर्गातर्फे त्याला निरोप देण्याचा एक छोटा कार्यक्रम झाला. त्या वेळीं औचित्य म्हणून तीच शिष्यवृत्ति घेऊन विलायतेला जाऊन आलेल्या एका प्राध्यापकाची अध्यक्षस्थानीं निवड केली होती. हे प्राध्यापकमहाशय आमच्या मित्राचीं स्तुतिस्तोत्रें गाण्यास उठले. त्यांनीं भाषणाला सुरवात केली आणि त्यांचें सबंध भाषण ऐकूनसुद्धा तें भाषण आमच्या मित्राच्या स्तुतिपर आहे की आत्मगुणवर्णनपर आहे याचा आम्हाला पत्ता लागेना. भाषणाच्या ओघांत त्यांनीं आपण × × भाषेचे बी. ए. चे परीक्षक अस-ल्याचें सत्य श्रोत्यांच्या निदर्शनास आणलें. आपणहि एके काळीं अशीच शिष्यवृत्ति मिळून विलायतेला गेलों असल्याची गोष्ट त्यांनीं श्रोत्यांच्या गळीं उतरवली. तेथील एका विद्वान प्राध्यापकाला आपण आपल्या बुद्धिमत्तेनें कसें दिपवून सोडलें हेंहि त्यांनीं सहज जातांजातां सांगितलें. याशिवाय वक्तृत्वसभेमध्यें गाजवलेली सभा, 'इंडियन' म्हणून अपमानानें उल्लेख-णाऱ्या एका इंग्लिश युवकाला दिलेलें तेजस्वी उत्तर—अशांसारख्या कितीतरी गोष्टी त्यांनीं आम्हांला ऐकविल्या. त्या साऱ्या गोष्टी ऐकतांना आम्हाला वाटूं लागलें, हे श्रोत्यांना आमच्या मित्राचा परिचय करून देत आहेत की आपला स्वतःचा!

कांही लोकांना वेळींअवेळीं आत्मप्रौढी मिरविण्याची भारीच संवय असते. त्यांचें सारें जग जणू कांही त्यांच्यांतच साठवलेलें असते! ते कोण-त्याहि विषयावर कुणाशींहि बोलायला सुरवात करीत, शेवटीं त्यांच्या बोल-ण्याचा ओघ आपाआपच स्वतःकडे वळायचा. ते तुम्हांला निरनिराळी

माहिती सांगतील, हरतऱ्हेच्या घडामोडी सांगतील; पण त्या सर्वांत तुम्हांला त्या माहितीपेक्षा किंवा त्या घडामोडींपेक्षा त्यांचें स्वतःचें व्यक्तित्वच भडक स्वरूपांत रंगवलेलें दिसून येईल. एखाद्या कॉलेजची माहिती पुरविताना त्यांतील प्राध्यापकवर्ग, त्यांतील सोयी किंवा अभ्यास वगैरे गोष्टींच्या माहितीपेक्षा आपण त्या कॉलेजात असताना कोणकोणते पराक्रम केले, क्रिकेटच्या अंतिम सामन्यांत 'हॅटट्रिक' कशी केली, नाटकांत नायकाचें काम करून सर्व मुलांमुलींच्या— विशेषतः मुलींच्या कौतुकाचा विषय कसें झालों, याच माहितीची सांगोपांग चर्चा तुम्हांला त्यांच्या भाषणांत प्रामुख्यानें आढळेल. कावीळ झालेल्या माणसाला जसे पदार्थ पिवळे दिसतात, तसे अशा व्यक्तींना सगळे विषय आपल्या अपूर्व व्यक्तिमत्वानें झाकळून गेल्यासारखे वाटतात. आणि त्यामुळे मधल्या खांबाभोवतीं गरगर फिरणाऱ्या जत्रेंतल्या लाकडी घोड्याप्रमाणे त्यांचे विचार, सारे संभाषण, 'मी' या मध्यबिंदूभोवतीं गरगरां फिरत असतें.

माझ्या ओळखीचे एक शिक्षक होते. अतिशय हुषार होते. पदवीपरिक्षेंत त्यांनीं उत्कृष्ट यश संपादन केलें होतें व शिकवण्यांत वाकबगार असल्यानें शाळेंत सहावीसातवीचें कामहि त्यांच्याकडे होतें. या सगळ्या गोष्टी चांगल्या होत्या. पण एखादे वेळीं जर तुम्ही त्यांच्याबरोबर फिरायला गेलां तर पांच मिनिटांच्या संभाषणानंतरच तुम्हांला वाटायला लागलें असतें, "बापरे! आपण ज्याच्याबरोबर फिरायला जात आहोत, किंबहुना ज्याच्याबरोबर फिरायला जाण्याचें आपणाला भाग्य लाभलें आहे, त्या गृहस्थाची योग्यता केवढी मोठी आहे! आपण किती क्षुद्र त्या मानानें!" आपल्या बोलण्यानें नाना तऱ्हेनें ते आपली योग्यता तुमच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न करतील. मात्र प्रत्येक वेळीं प्रत्यक्षपणेंच ते स्वतःची स्तुति करतील असें नाही हं. ही तर त्यांच्या भाषणाची खरी गंमत आहे. आपल्याविषयीं प्रत्यक्ष स्तुतिपर तर फारसं बोलायचे नाही; तरीपण साऱ्या भाषणांत स्तुतीचा— अर्थात् आत्मस्तुतीचा— एक प्रकारचा अंतःप्रवाह वाहात राहील.

कित्येक वेळां ते बोलण्यामध्यें सातवीच्या वर्गाची माहिती सांगतील. तो वर्ग इतर शिक्षकांच्या तासाला किती गडबड करतो याचीहि माहिती पुरवतील. पण बोलण्याचा उद्देश मात्र हा, की असा वर्गसुद्धा मीं आपल्या ताब्यांत कसा ठेवला आहे पाहा! कित्येक वेळां ते दुसऱ्या शिक्षकाची निंदा करतील; पण ती स्वतःची योग्यता तुम्हांला जास्त पटविण्यासाठीं! शाळेंतील निरनिराळ्या चळवळींबद्दल माहिती सांगतील, पण तीहि स्वतः त्यांत किती प्रमुख भाग घेतला हें दाखविण्यासाठीं! बोलताबोलता ते तुमच्याविषयीं सहानुभूति दाखवतील, तुमच्यावर अन्याय होत असला तर त्याबद्दल निषेध प्रदर्शित करतील. पण हें सारें करताना त्यांच्या अभिनिवेशावरून कुणालाहि वाटेल, की त्यांना असेंच म्हणायचें आहे, "काय छोटे लोक आहांत तुम्ही! माझ्याकडे पाहा. माझ्यावर होतो आहे असा अन्याय?" बोलताबोलता ते म्हणतील, "छे बुवा! तुम्ही कसं करतां कोण जाणे! पण खालच्या इयत्ता शिकवणं आपल्याला जमतच नाही." पण मनांत हें वाक्य म्हणण्याचा हेतु मात्र असा, की "माझी योग्यताच मुळी वरचे वर्ग शिकवण्याची आहे. खालच्या वर्गांना शिकवावं तुम्हीं!" अशा तऱ्हेनें या व्यक्तीचीं सारीं भाषणें 'मी' या एका अक्षराभोंवतीं फिरत असतात. स्वतःभोंवतीं फिरूनफिरून अशा व्यक्तींना भोवळ कशी येत नाही कोण जाणे!

त्याचप्रमाणे दुसऱ्या एका शिक्षकाची गोष्ट मला आठवते आहे. ते गृहस्थ पूर्वी कधींतरी कुठेंतरी इंग्लिशचे प्राध्यापक होते व हल्लींहि कुठेंतरी प्राध्यापक म्हणून नेमले गेले आहेत म्हणे! हे गृहस्थ कवीहि होते छटाक छटाक! ही व्यक्ति म्हणजे खरोखर आत्मप्रौढीची एक चालतीबोलती पताकाच होती. सहज एखादे दिवशीं त्यांच्या घरीं जा, आपलें सारें चरित्र, त्यांतील 'उदात्त' प्रसंगांसह ते तुम्हांला ऐकवतील. आपण एका संस्थानच्या अधिपतींसमोर राजवाड्यांत एक तास अस्खलित भाषण केल्याची हकीकत पांच वेळां त्यांनीं मला ऐकवल्याचें मला पक्कें स्मरतें. त्यांच्याशीं

तुम्ही केव्हाहि बोला, आपली पूर्वीची अतिशय मोठी योग्यता व त्या मानानें हल्लीची इलाखीची स्थिति हें पुराण तुम्हांला ऐकायला मिळणार नाही असें होणारच नाही. आणि प्रसिद्धिलोलुपता तर इतकी, की नांव छापून आलें की त्यांना परब्रह्म मिळाल्यासारखें वाटायचें ! वर्तमानपत्रांत नांव येण्यासाठीं त्यांनी मंडळें काढलीं व तीं मोडलीं, व्याख्यानें दिलीं आणि त्यांचे रिपोर्टस् प्रसिद्धीकरिता स्वतः तयार केले. निरनिराळ्या समारंभांना व सभेला ठळकपणें हजर राहण्याची दक्षता घेतली. थोडक्यांत, प्रसिध्दी-करिता जें जें कांहीं करणें शक्य होतें तें सर्व केलें. त्यांची एक गंमतीची गोष्ट मला आठवते. एखाद्या साप्ताहिकाच्या अंकांत त्यांची कविता आली की शाळेंत येताना तो अंक काखोटीत मारून शाळेंत आणायचा, सर्वांना कविता दाखवायची, कुणीं आग्रह केला तर म्हणायचीसुद्धा ! तो अंक घेऊन सुपरिंटेंडेंट, असिस्टंट सुपरिंटेंडेंट या सर्वांना भेटी द्यायच्या व आपली कविता अंकांत आल्याची बातमी त्यांना कळवायची. सबंध दिवसभर त्यांना आपल्या कवितेव्यतिरिक्त दुसरा विषय सुचायचाच नाही ! बहुतेक अशा दिवशीं शक्य तों आम्ही त्यांना टाळण्याचा प्रयत्न करीत असूं ! आणि चुकुन कचाट्यांत सापडलों तर मग मात्र हालाला सीमा नाही ! त्या रुक्ष व नीरस कवितेंतील सौंदर्यस्थळें ते तुम्हांला दाखवतील; यमक, गण वगैरेविषयी माहिती पुरवतील; एखादी ओळ भाषासौंदर्याच्या दृष्टीनें किती सुंदर आहे हें तुम्हाला ती ओळ गाऊन ते पटवून देतील. थोडक्यांत म्हणजे पुढील तासाला थंड डोक्यानें तुम्हांला ते वर्गावर जाऊं देणार नाहीत.

कित्येकांचीं स्तुतिस्तोत्रें—ते आपल्या अधिकारीवर्गापैकीं असल्या-मुळे—तोंडावर उसनें हास्य आणून व चेहऱ्यावर लटकी उत्सुकता आणून ऐकावींच लागतात. माझ्या एका मित्रानें या बाबतींत मोठा मनोरंजक अनुभव सांगितला. त्याच्या शाळेंतील उपप्रमुख अशीच वेळीं-अवेळीं स्वतःचीं स्तुतिस्तोत्रें गाणारे होते. त्यांच्याकडे गेलांत म्हणजे 'मी', 'माझी विद्वत्ता', 'माझी कार्यक्षमता', 'माझें घराणें' यांवर

त्यांचें प्रवचन तुम्हाला हटकून ऐकावें लागायचेंच. आपल्या मुलांचें कौतुक तरी त्यांनीं किती करावें ? 'आमचा कृष्णा असा आहे' 'आमची कुसुम तशी आहे', 'आमच्या विनूला अमकी गोष्ट सहज कशी येते' यावर त्यांचें जें पुराण सुरू होईल तें–तुम्ही कितीहि जांभया दिल्या तरी–संपायचें म्हणून नाही ! आपल्या भाषणांत मोठमोठ्या व्यक्तींचीं नांवें सहज आणण्याची त्यांना हौस. आणि इतकेंहि करून त्यांच्या मोठेपणानें तुम्ही दडपून गेलां नाहीत, तर शेवटचें त्यांचें अमोघ अस्त्र म्हणजे स्वतःचें जीवनचरित्र ! माझ्या मित्राला चार निरनिराळ्या वेळीं त्यांचें हें जीवनचरित्र ऐकावें लागल्यामुळे त्याला तें अगदीं मुखोद्गत झालें आहे. त्या उपप्रमुखाची व माझी ओळख नसल्यानें त्यांच्या 'स्व' गंधित भाषणाचा लाभ मला अद्याप मिळाला नाही. पण ज्यांना तो लाभ मिळालेला आहे अशांचा अनुभव फारसा स्पृहणीय नसल्यामुळे मी त्यांचा फारसा हेवा करीत नाही.

दुसऱ्याची निंदा करून स्वतःची प्रतिष्ठा वाढवणारे लोकसुद्धा कांही कमी नसतात ! स्वतःजवळ स्तुति करण्यासारखें कांही नसलें की दुसऱ्याचे पाय ओढण्यांत या उपद्व्यापी लोकांना मोठें समाधान वाटतें. "तो अमकाअमका ना ? माहीत आहे त्याचा नाट्यशास्त्राचा काय अभ्यास आहे तो ! अहो वरवर पुस्तकं चाळून अन् पोपटपंची करून का नाट्यशास्त्र कळत असतं ?" किंवा "त्याचं नका कौतुक सांगू मला ! त्याला पहिलं बक्षीस कसं मिळालं माहीत आहे का तुम्हांला ?" किंवा "आम्हांला कुठं त्याच्यासारखी अधिकाऱ्यापुढं लाळ घोटतां येते ? नाहीतर आम्ही नसतों का आज त्याच्या हुद्द्यावर चढलों ?" अशांसारखीं वाक्यें आपणांला सारखीं ऐकूं येत असतात, याचें कारण तरी हेंच. आपणांजवळ कर्तबगारी दाखविण्याइतकें बुद्धीचें भांडवल नाही तर निदान बुद्धिसामर्थ्यानें किंवा कर्तबगारीनें पुढें चाललेल्या माणसाला मागें खेचलें म्हणजे आपल्या पातळीवर तो राहील हीच त्यांची कल्पना ! दुसऱ्या विद्वान् लोकांची निंदा केली की अप्रत्यक्षपणें आपण विद्वान् ठरूं असें कांहीना वाटत असतें

एक शिक्षक मला माहित आहेत. बी. टी. ला आल्या दिवसापासून त्यांचें चाललेलें असे, "तो अमका प्रोफेसर ना? अरे, माहीत आहे! धड चार वाक्यं बोलतां येत नाहीत." "तो प्रोफेसर– सारी नन्च्या पुस्तकाची समरी देतोय्. त्याला डाकं आहे का?" अरे त्या अमक्यातमक्याची अशी फॅफॅ उडाली म्हणतोस वर्गात!" आणि सर्व टवाळींतून एकच सूर, की मी यांच्यापेक्षां चांगले पाठ घेऊं शकतों; मला लेक्चरर नेमले तर मी त्यांच्यापेक्षा कितीतरी पटीनें सुंदर व्याख्यानें देईन. आणि त्याच्या आत्म-श्लाघेची व टवाळीची इतकी कीर्ति झाली होती, की त्याला 'छोटा प्रोफेसर' म्हणून सर्वजण संबोधायला लागले होते. त्याचे पाठ साधारणच होत; पण त्याची जाहिरात मात्र तो इतकी करायचा, की, लोकांना वाटावे, बी. टी. ला यावं व यांचे आदर्श पाठ पाहावेत! आणि पाठ घेऊन झाल्या-वर दुसरे टीका करण्याच्या आंत हाच मुळी आपल्या पाठाची स्तुति करी. स्वतःच्या पाटाच्या स्तुतीबरोबर दुसऱ्याच्या चांगल्या झालेल्या पाठावरहि तो हल्ला चढविण्यांत पटाईत होता. आणि यामुळें संबंध कॉलेजमध्यें ती व्यक्ति अद्वितीय जाहिरातीची पताका म्हणून गणली जात असे.

वाङमयाच्या प्रांतांत तर परस्पर स्तुतिपाठकांचीं मंडळेंच्या मंडळें उभीं असलेली आपणांला दिसतात. 'अ'नें उठावें अन् म्हणावें, "आज मराठी वाङ्मयांत ज्याच्याकडे आशेनें पाहातां येईल असा एकच लेखक आहे. आणि तो म्हणजे 'ब'!" 'ब'नें उठावें व म्हणावें, '–साऱ्या मराठी वाङ्मयांत 'अ'सारखा क्रांतिकारक कवि होऊन गेला नाही. ज्ञाने-श्वरानंतर खरं मानाचं स्थान यांनाच मिळायला पाहिजे!" आणि बिचारा वाचकवर्ग त्या एकमेव लेखकाकडे व त्या क्रांतिकारक कवीकडे गोंधळलेल्या नजरेनें पाहात त्यांच्या वाङमयांतून आशावादीपणाचीं किंवा क्रांतीचीं तत्त्वें हुडकण्याचा प्रयत्न करीत असतो! पुस्तकप्रकाशनाचा समारंभ किंवा एखाद्या पुस्तकावर जाहीर चर्चा यांत तरी स्तुतिपाठांशिवाय आपणाला

दुसरें काय ऐकायला मिळतें ? आणि या सत्कारसमारंभांनीं व अभिनंदनांनीं मराठी साहित्याला भंडावून सोडलें आहे. 'क' उठतो आणि 'ड' चा जाहीर सत्कार करतो. कशाकरिता ? तर म्हणे एका मुद्रक संस्थानिकाकडून त्याच्या पुस्तकाला पन्नास रुपयांची दणगी मिळाली आहे ! अर्थात् 'ड' ला याची परतफेड करणें भागच पडतें. इतर कांहींच कारण मिळालें नाही तर 'क' नें आपल्या सकस वाङ्मयनिर्मितीनें मराठी वाङ्मयांत अमोल भर घातली याबद्दल त्याचा एखाद्या खाजगी ठिकाणीं जाहीर सन्मान करण्यांत येतो.

लेखकांमध्यें 'आत्मनिष्ठा' असली पाहिजे म्हणे ! पण कांहीकांही लेखकांच्या बाबतींत माझ्या मित्रानें सांगितलेले अनुभव ऐकून मला तर असें वाटायला लागलें, की या लेखकांमध्यें फक्त आत्मनिष्ठाच उरली आहे. त्यांचें वाङ्मय म्हणजे वाणीनें बोलल गेलेले शब्द सत्यार्थीनें आत्मनिष्ठेनें भरलेले असतात असें म्हटलें तर फारशी अतिशयोक्ति होणार नाही. मला अद्याप एका लेखकाविषयीचा अनुभव आठवतो. शाळेच्या कामाकरिता मला प्रथमच त्यांच्याकडे जाण्याचा प्रसंग आला. माझा त्यांचा पूर्वीचा परिचय नव्हता. मीं त्यांचें वाङ्मयहि विशेषसें वाचलें नव्हतें. आणि मी ज्या कामाकरिता त्यांच्याकड गेलों होतो तें कामहि विशेष महत्वाचें नव्हतें. पण त्या गृहस्थानें माझा तब्बल तीन तास वेळ घेतला ! या तीन तासांच्या शेवटीं त्यांच्या वाङ्मयाची संपूर्ण माहिती तर मला झालीच; पण त्याच्या जीवनाच्या कानाकोपऱ्यातहि मीं फेरफटका मारून आलों. त्यांच्या वाङ्मयांतील सौंदर्यस्थळांचें अवलोकन केलें, त्यांच्या वाङ्मयापत्यांच्या जन्माचा इतिहास श्रवण केला. थोडक्यांत म्हणजे पुढेंमागें ते गृहस्थ साहित्यसमेलनाचे अध्यक्ष झालेच तर त्यांच्यावर 'व्यक्ति व वाङ्मय' हें पुस्तक लिहिण्याला मी पूर्ण अधिकारी झालों. आणि तेंही फक्त तीन तासांत—त्याच्या वाङ्मयाची एकहि ओळ न वाचतां !

कवीच्या तोंडून काव्य ऐकणें हें विशेष भाग्य आहे असें कुणीकुणी म्हणतात. माझ्या एका मित्राला हें पटत नाही. त्याचा एक मित्र कवि आहे. आणि त्यामुळे एखादी नवीन कल्पना स्फुरली किंवा नवीन कविता निर्माण झाली की तो तावडतोब आपल्या मित्राकडे धाव घ्यायचा. बिचारा मित्र! भिडस्त होता तो! काय करणार? टाळण्याचे सगळे उपाय अमलांत आणूनहि जेव्हां त्याचा उपयोग होईना तेव्हा 'आपला हा भोग आहे झालं' अशी मनाची समजूत करून घेऊन तो स्वस्थ बसला. आणि त्याला इतकें त्रासण्याला खरोखरच जबरदस्त कारणहि होतें. दिवसांतून दोनतीन तास 'मी व माझें काव्य' यावर त्या कविमित्राचे सतत विचार ऐकायचे, त्या कवितेंतील नसलेल्या सौंदर्यस्थळांची प्रशंसा करायची, ही त्याला एक मोठी शिक्षाच नव्हती तर काय? माझ्या मित्रानें कितीदा तरी त्याच्या काव्यावरून 'चालू महायुद्ध', 'महागाई' अशांसारख्या जागतिक विषयांवर जाण्याचा प्रयत्न केला असेल; पण तो यशस्वी होण्याऐवजी त्या विषयांवर केलेल्या कवितांचें समग्र रसग्रहण ऐकण्याचा मात्र त्याच्यावर प्रसंग ओढवला होता!

पण त्या कवीलाच कशाला दोष द्यायला पाहिजे? आपल्या सभोवतालीं जरा बारकाईनें आपण नजर वळवली, तर अशा कितीतरी आत्मनिष्ठ माणसांचे नमुने आपणांला दिसतील. "अहो, प्रत्यक्ष साहेबांनीं बोलावून सांगितलं, की गोपाळराव, तुम्ही आहांत म्हणून ऑफिस धड चाललं आहे. नाहीतर जिकडे तिकडे गाढवांचा गोंधळ माजला असता! आता बोला!" असें फुशारकीनें सांगणाऱ्या कारकुनांपासून तों मोठमोठी मानाची स्थानें विभूषित केलेल्या विद्वानांपर्यंत आपणांला अशा व्यक्तींचे चेहेरे दिसतील. त्यांतील कांही विद्वान् असतील. कांही विद्वान् आहोंत असें दाखविण्याचा अट्टाहास करणारे असतील, कांही स्वतःला युगप्रवर्तक लेखक समजणारे असतील, तर कांही आपणाला अतिशय मोठे शिक्षणतज्ञ म्हणवून

घेणारे असतील. जगच मुळीं विविधतेनें भरलें आहे. तेव्हां या आत्मनिष्ठेतसुद्धा विविधता आली असल्यास नवल तें काय ?

कां कुणाला ठाऊक, पण अशा व्यक्तींकडे पाहिलें की खांबाला दोरीनें बांधलेल्या व त्या खांबाभोवतीं गरगर फिरणाऱ्या बैलाची मला आठवण होते. बैल जरी वाटेल त्या दिशेनें फिरूं शकला तरी त्याला विशिष्ट मर्यादा ओलांडता येत नाही. त्याचें एक वर्तुळ आपोआप तयार झालेलें असतें. आत्मनिष्ठ माणसांचें असेंच असतें, नाही का ? ते कोणत्याहि विषयावर बोलूं लागले तरी ते आपल्या विशिष्ट वर्तुळाबाहेर पडूं शकत नाहीत. कोणत्याहि गोष्टीवर त्यांच्या 'स्वतः'चे किरण पडल्यामुळे त्याच प्रकाशांत त्यांना त्या गोष्टी दिसतील. आत्मप्रौढीचा रंगीत चष्मा डोळ्यांवर चढविल्यानें त्यांना प्रत्येक गोष्ट आत्मनिष्ठेच्या रंगानें रंगवलेली दिसली तर त्यांत नवल नाही. अर्थात् माणसानें स्वतःविषयी अभिमान बाळगावा; पण त्या अभिमानाला मर्यादा असते. त्या अभिमानानें मर्यादा सोडली की त्या अभिमानाचें रूपान्तर गर्वात होऊं लागतें; आपण मोठे आहोंत हें सगळ्यांना सांगण्याची त्याला इच्छा होऊं लागते. आणि त्याचा परिणाम म्हणजे चांगले चागले मित्रहि त्याला टाळूं लागतात. एखादी रेकॉर्ड चांगली असली तरी रात्रंदिवस आपण सारखी तीच वाजवूं लागलों तर त्याची आवड कितपत शिल्लक राहील ?

आणि शिवाय आपण मोठे आहोंत हें खरोखरच मोठ्या असणाऱ्या माणसाला जाहीर करावें लागत नाही. सिंह कांही प्रत्येक पशूला आपण पराक्रमी असल्याची ग्वाही देत नाही; किंवा कस्तुरीमृग आपणाजवळ कस्तुरी असल्याची बातमी येणाऱ्या-जाणाऱ्याला सांगत सुटत नाही. रत्न जरी प्रसंगीं उकिरड्यावर पडलें तरी त्याचें तेज कांही झाकून जात नाही.

मग खऱ्या गुणी माणसाला आत्मप्रौढीची आवश्यकता कां वाटावी ?

---

# पत्राची पेटी

मी घरीं आलों व दरवाजा उघडण्यापूर्वी नेहमीच्या संवयीप्रमाणे दरवाजाशेजारींच लावलेल्या पत्रांच्या पेटीकडे नजर टाकली.

अन् माझें मलाच हंसू आलें माझ्या त्या कृतीचें. कारण पोष्टमन मला रस्त्यांतच भेटला होता व त्यानें दिलेलें पत्र अजूनही माझ्या हातांत होतें, तरी पण पत्राच्या अपेक्षेनें माझी नजर त्या पत्रपेटिकडे गेलीच.

माझी नित्याचीच संवय होती ती!

माझ्या मित्रमंडळींनीं किती थट्टा केली असेल त्या संवयीची! एका मित्रानें तर म्हटलें देखील, "आमचे पंडितराव मध्यरात्रीं सहज खोलीच्या बाहेर आले तर आंत जाण्यापूर्वी ते नक्की पत्राच्या पेटीकडे पाहतील व आंत पत्र नसल्याची खात्री करून घेतील!"

आणि खरोखर माझ्या त्या मित्रांच्या विधानांत अतिशयोक्ति बिलकूल नव्हती. एकदां मी रात्रीं एक वाजता सिनेमाहून परत आलों असतां त्या पत्राच्या पेटींत पत्र नसल्याची खात्री करून गेल्याचें मला आठवतें. इतकेंच काय पण, पोष्टमननें टाकलेलें पत्र काढून अर्धा तास झाला असेल नसेल, तेवढयांत बाहेर जाताना पत्राच्या पेटीकडे आशाळभूत नजर टाकल्याचें कितीतरी प्रसंग माझ्या स्मरणांत आहेत.

यावरून माझा पत्रव्यवहार दांडगा असावा अशी कुणी कल्पना केली तर ती मात्र चुकीची ठरेल. किंबहुना पोष्टमनविरुद्ध माझी तीच तक्रार आहे. माझा पत्रव्यवहार दांडगा असावा असें मला वाटतें. पण महिन्यांतून एकादे वेळींच पोष्टमन त्या टपालपेटींत पत्र आणून टाकतो— आणि तें पत्रसुद्धां कसलं? तर 'आम्ही इकडे खुशाल आहोंत—तुझें तिकडे कसें काय चाललें आहे—चि. बंडू काल थोडासा कणकणत होता—

आज बरा आहे' अशासारखें मामुली खुशालीचें! 'पत्र पाठवीत नाहीस —पत्राचें उत्तर न देण्याइतका तू महाग झाला आहेस कीं काय?' इत्यादी ओरड तर अशा पत्रांतून नेहमींच असावयाची. तेव्हां इतका अफाट पत्र-व्यवहार असताना सारखी येता—जाता टपालपेटीकडे नजर कोणत्या अपे-क्षेनें टाकतों मी?

माझें मलाच या प्रश्नाचें उत्तर देता येत नाही. त्या टपालपेटीकडे पाहताना माझ्या कांहीतरी अपेक्षा असतात हें खास. पण त्या अपेक्षा कोणत्या स्वरूपाच्या असतात हेंच मला निश्चित सांगता येत नाही. मामुली खुशालीच्या पत्राच्या अपेक्षेनें मी टपालपेटीकडे नजर टाकीन हें अशक्य होतें. मला वाटतं, माझ्या मनांतील अद्भुतरम्यतेची आवडच याच्या मुळाशीं असावी. कांहीतरी अनपेक्षित वार्ता आणणारें—किंवा अनपेक्षित रीतीनें आपल्या जीवनाला कलाटणी देणारें पत्र आपणाला टपालपेटींत दिसेल अशी अंधुक आशा नेहमीं माझ्या मनांत वास करीत असते. त्या अनपे-क्षित वार्तेचें स्वरूप काय असल, किंवा आपल्या जीवनाला तें पत्र कशा रीतीनें अनपेक्षित कलाटणी देऊं शकेल याची मात्र मला थोडीही कल्पना नसते. समोर दाट धुकें असावें आणि त्या दाट धुक्याच्या पलीकडील न दिसणाऱ्या देखाव्याविषयीं अस्पष्ट तर्क करावेत अशी माझ्या मनाची कांही अंशीं स्थिती असते. वास्तविक ठराविक चाकोरींतून जाणाऱ्या आपल्या जीवनांत अनपेक्षित बातमी ती काय कळणार किंवा त्याला अनपेक्षित कला-टणी ती काय मिळणार? पण या बाबतींत रस्त्यावरील प्रत्येक कोपऱ्यावर वळताच आपणाला काहीतरी अद्भुतरम्य देखावा पहावयास मिळेल अशी कल्पना करून घेणाऱ्या माणसारखी झाली आहे माझ्या मनाची स्थिती! भविष्यकाळच्या प्रत्येक कोपऱ्यावर वळताना मी मोठ्या अपेक्षेनें कांहीतरी विशेष गोष्ट पहावयास किंवा ऐकावयास मिळेल अशी आशा करीत असतों,—पण प्रत्येक कोपऱ्यावर ठराविक जीवनाचें रुक्ष चित्र दिसून निरा-

शाच पदरीं येते. जीवनाला अनपेक्षित कलाटणी देणारे प्रसंग आयुष्यांत नसतात असें नाही–पण ते किती मोजके ? असे प्रसंग जीवनाच्या प्रत्येक वळणावर दिसण्याची आशा करणें म्हणजे लॉटरींत एकदां चुकून बक्षिस आल्यावर दर लॉटरीच्या निकालाच्या वेळीं अगदीं आशाळभूतपणें मनी-ऑर्डरची वाट पाहण्यासारखेच वेडपणाचें आहे, नाही का ?

नाही तरी ही अद्‌भुतरम्यतेची आवड प्रत्येक मानवी जीवनांत थोड्याफार तरी प्रमाणांत असतेच. मात्र त्या अद्‌भुतरम्यतेचें स्वरूप वयोमानाप्रमाणे बदलत असतें. लहानपणीं अल्लाउद्दीनच्या जादूच्या दिव्या-सारखा दिवा आपणाला मिळावा, सिंदबादप्रमाणे निरनिराळ्या ठिकाणीं सफरीला जावं किंवा बगदादच्या चोराप्रमाणे जादूची उडती चटई आप-णाला मिळावी असं कुणाला वाटलं नसेल ? 'अदृश्य मनुष्य' ही गोष्ट वाचल्यावर मी कितीतरी दिवस, अदृश्य झाल्यावर आपण काय करायचं याविषयींचीं रम्य चित्रं रेखाटत होतों. माझ्या शेजारींच राहणाऱ्या एका मित्राला 'ध्रूव' 'प्रल्हाद' इत्यादि बालभक्तांप्रमाणे आपणालाही देव भेटेल अशी खात्री वाटत होती व म्हणून तो दिवसांतून पांचसहा वेळां देवळांत जाऊन 'आपणाला लवकर दर्शन देण्याबद्दल' देवाची आळवणी करीत असे. त्या बिचाऱ्याला देव भेटला कीं नाही कोण जाणे. पण त्यानें मात्र दोनतीनदां मला, 'आज मला गाईच्या स्वरूपांत देव भेटला' 'आज मला पोपटाच्या स्वरूपांत देव भेटला' असं खात्रीपूर्वक सांगितलं ! 'ती गाय देवच होती कशावरून ?' या प्रश्नाचें उत्तर मात्र त्याला देता येत नसे. कदाचित् सर्वांभूतीं आत्मा वास करीत असल्यानें त्या गाईच्या आत्म्यांत त्याला चित्स्वरूप परमेश्वराची प्रचीती आली असल्यास न कळे ! लहान मुलांच्या अनुकरणशीलतेंतही हीच त्यांची अद्‌भुतरम्यतेची आवड दिसून येत नाही का ? त्यांना अनुकरण करावसं वाटतं तें साध्यासुध्या व्यक्तींचं नाही–तर इतिहासांतील मोटमोठ्या व्यक्तींचं ! कुणाला शिवाजी व्हावेसें वाटतें तर कुणाला तानाजी ! आपल्या सभोंवतालच्या त्याच त्याच

जीवनापेक्षां कांहीतरी निराळें जीवन आपण कंटावें —आपल्या आयुष्यांत मोठमोठे प्रसंग यावेत– जगाला आपण थक्क करून साडावें असें बालपणीं कुणाला वाटत नाही ? आणि त्यांची ती भूक अद्भुतरम्य व वीररसप्रधान वाङ्मय वाचून ते भागवतातही.

पण पुढें यौवनांत प्रवेश केल्यावर मात्र या अद्भुतरम्यतेच्या आवडीला जरा निराळें वळण लागतें. कॉलेजांत त्यांच्या जीवनांत निराळ्या मुग्ध भावना फुलू लागतात. आणि त्यामुळे त्यांची या काळांतील स्वप्नं बालपणांतील अतिअद्भुत वातावरणापेक्षां अधिक वास्तव वातावरणांत रंगलेलीं असतात. अशा स्वप्नांपैकीं शेंकडा ऐशीं स्वप्नें कॉलेजांतील सुन्दर तरुणीभोवतीं रेंगाळत असलीं तर आश्चर्य वाटण्याचें कांहीच कारण नाही. सुंदर तरुणीची योगायोगानें भेट–त्यांतून परिचय–परिचयांतून प्रेम व प्रेमांतून विवाह अशा प्रेमाच्या चढत्या पायऱ्या ओलांडून प्रत्येक तरुण जीवनाचें नंदनवन गाठण्याचा स्वप्नं उराशीं बाळगून असतो. आणि अशा कल्पनाचित्रांना कॉलेजचें वातावरणही बरचसें पोषक असतें. कॉलेजचें जीवन अगोदरच परीक्षा पास होण्यापलीकडे विशेषशी जबाबदारी अंगावर नसल्यानें स्वच्छंदी फुलपांखराप्रमाण असतें; त्यांत यौवनसुलभ भावननें त्याच्या हृदयांत नुकताच प्रवेश केलेला असतो. अशा स्थितींत कॉलेजांतील सुंदर तरुणीवर प्रेम न करणारा तरुण–निदान मनांतल्या मनांत प्रेम न करणारा तरुण–अगदीं विरळा ! असा एखादा तरुण असलाच तर त्याच्या मनांत न्यूनगंडामुळे किंवा इतर कोणत्यातरी कारणानें विकृती झाली असावी असें खुशाल समजावें. कॉलेजच्या वातावरणांत वाढलेल्या प्रेमवृक्षांना फारशीं फळें येत नाहीत हें खरें आहे–किंबहुना पुष्कळांच्या अंतःकरणांतील प्रेमाची परिस्फुटताही होत नाही. तरीपण त्या कल्पनाचित्रांत रमून जाणें व कल्पनेनं प्रेमपूर्तता झालेली पाहाणें व त्यांतच आनंद मानणें हा पुष्कळ तरुणांचा चाळा असतो. कल्पनेंत अनेक योगायोगांनीं त्याची व त्या सुंदर तरुणीची ओळख होत असतें; पण प्रत्यक्ष मात्र असे योगायोग फार घडून

आलेले दिसून येत नाहीत—आणि आलेच तर त्याची परिणति कल्पनेंतील चित्राप्रमाणे प्रेमांत होण्याचा संभव फारच कमी असतो. आणि त्यामुळे बहुशः या काळांतील तरुणांचीं कल्पनाचित्रं त्यांच्या मनांतच विरतात.

याशिवाय या प्रणयाच्या मुग्ध भावनेबरोबर ध्येयवादाची छटाही थोडीथोडी त्यांच्या मनांत येऊं लागते. देशासाठी कांहीतरी करण्याचे निश्चय याच काळांत केले जातात—परिक्षेंत पहिला वर्ग मिळविण्याच्या, परदेशाला उच्च शिक्षणासाठी जाण्याच्या, मोठी अधिकाराची नोकरी मिळविण्याच्या किंवा एखाद्या आवडत्या व्यवसायांत नावलौकिक मिळविण्याच्या आकांक्षा याच वयात बीजावस्थेंत असतात. सगळ्यांचींच स्वप्नं खरीं ठरतात असं थोडंच आहे? पण त्या स्वप्नांत रंगून त्यांत आनंद मानण्याची प्रवृत्ती कितीतरी जणांची असते.

हीं सर्व अद्‌भुतरम्यतेचीं प्रतिबिंबें आपणाला त्यांच्या वाङ्मयांत व कृतींतही थोड्याफार प्रमाणांत दिसून येतात. कॉलेजचीं मासिकं जर आपण चाळलीं तर सर्वांत अधिक प्रमाण प्रेमकथांचं व प्रेमकाव्याचं दिसून येतं याचं कारण तरी दुसरं काय? कॉलेज—तरुणाच्या हातीं नेहमीं प्रणयकथा सांपडाव्या याच्यामागें तरी दुसरं कोणतं कारण असणार? कल्पनांनीं रंगविलेलीं चित्रें प्रत्यक्ष सृष्टींत उतरलीं नाहीं म्हणजे अर्थात् त्याचे पडसाद त्यांच्या वाङ्मयांत उमटले तर त्यात नवल तें काय? आपली व आपण जिच्यावर प्रेम करतों त्या तरुणीची प्रत्यक्ष व्यवहारांत ओळख होत नाही ना? ठीक आहे! निदान कल्पनेनें लघुकथेंत तरी त्यांची भेट व्हावी—त्यांचं एकमेकांवर प्रेम जमावं—व त्यांचं वडिलांच्या विरोधाला न जुमानतां एकमेकांशीं लग्न व्हावं या कल्पनेनें प्रत्येक तरुण लघुकथा लिहावयास बसत असेल यांत शंका नाही. आणि यांतच त्याची अंशतः इच्छापूर्ती होत असते.

कॉलेजच्या रम्य व स्वप्नाळू वातावरणांतून व्यवहाराच्या रुक्ष व ठराविक चाकोरींतून जाणाऱ्या जीवनांत प्रवेश केला म्हणजे कल्पनारम्यतेला बराचसा आळा बसतो हें खरें आहे. पण त्यामुळे ही अद्भुतरम्यतेची आवड अजिबात नाहीशी होत असेल अशी कुणी कल्पना केल्यास ती चुकीची ठरेल. अद्भुतरम्यतेकडे पहाण्याचा त्यांचा दृष्टिकोण बदलतो असं फार तर आपणाला म्हणता येईल. कॉलेजच्या जीवनांत अद्भुतरम्य घटने-कडे ज्या अपेक्षेनें तरुण पहात असतो ती अपेक्षा आतां फार उरलेली नसते. जीवनाची सहचरी त्यानें निवडलेली असते व उदरनिर्वाहासाठी करा-वयाचा व्यवसायही त्यानें निश्चित केलेला असतो. आयुष्यांतील मुख्य बदल घडवून आणणाऱ्या या दोन घटना जीवनांत घडून आल्यानें त्याचा जीव-नाचा मार्ग अगदी सुधा झालेला असतो. अशा स्थितींत कोणत्या अद्भुत-रम्य घटनेची अपेक्षा तो करणार? मधलीं मधलीं क्वचित् येणारीं आयु-ष्यांतील वळणं सोडून दिल्यास जीवनाचा सारा प्रवास एका ठराविक मार्गानें चाललेला असतो. अशा स्थितींत अद्भुतरम्य घटनेची अपेक्षा करणें जरी चुकीचें असलें तरी ती अद्भुतरम्यतेची इच्छा नाहीशी होते असें म्हणणें चुकीचें ठरेल. ती त्याची आवड या ना त्या स्वरूपांत व्यक्त होत असते–किंबहुना त्यामुळेच जीवनांतील रुक्षता थोडीशी कमी होते. त्याचें असें पहा––

पुष्कळदां ठराविक कार्यक्रमाच्या साच्यांतून जात असता मनुष्य कंटा-ळतो; व तो कंटाळा घालविण्यासाठी तो सिनेमा, नाटकं पाहतो, कादंबऱ्या किंवा इतर ललित–वाङ्मय वाचतो, सफरी काढतो किंवा निरनिराळे खेळ खेळतो. हा त्याचा कंटाळा म्हणजे तरी काय? ठराविक गोष्टी ठराविक वेळेला व्हावयाच्याच–त्यांत कोणताही बदल घडून यावयाचा नाही असें एकदां माणसाला कळलें कीं त्या साऱ्या कार्यक्रमांत त्याला कांही नावीन्य वाटत नाही. एकाद्या यंत्राप्रमाणे त्याचें जीवन होऊं लागतें. अशा वेळीं त्याच त्याच गोष्टींविषयीं विचार करूनसुद्धा माणसाला कंटाळा येतो.

एकादे वेळीं तरी ठराविक गोष्टींपेक्षां कांहीतरी अनपेक्षित–मनाला धक्का देणारी–घटना घडावी असं त्याला वाटत असतं! ही घटना कोणत्या स्वरुपाची असावी याची त्यालाही निश्चित कल्पना नसते. पण कसली तरी गोड घटना असावी असं मात्र त्याला वाटत असतं! पण दुर्दैवानें सामान्य लोकांच्या जीवनांत अशा गोड घटना वारंवार थाड्याच येतात? दररोज कांही बढतीचा हुकुम येत नाही–परीक्षा पास झाल्याच्या तारा येत नाहीत–किंवा सुंदर तरुणींची ओळख होत नाही. बढतीच्या हुकुमाऐवजीं कामांत चूक झाल्याबद्दल वरिष्ठाची कानउघाडणी ऐकण्याचें दुर्भाग्यच पुष्कळांच्या कपाळीं असते. सुंदर तरुणीची ओळख होण्याऐवजी घरांतील 'तिची' कुरकूर ऐकण्याचा प्रसगच फार जणांवर येत असेल. तेव्हां जीवनांतील अद्‌भुतरम्यतेची ही उणीव भरून काढण्यासाठीच माणूस नाटक–सिनेमा व ललित–वाङ्मय यांचा आश्रय करात असल्यास नवल नाही. आपल्या जीवनांत ज्या गोष्टी घडून येत नाहीत त्या इतरांच्या जीवनांत आलेल्या पाहण्याच्या, व त्यांच्या जीवनाशीं क्षणभर समरस होऊन त्यांतील आनंद लुटण्याच्या इच्छेनें मनुष्य ललितकलेकडे वळतो व क्षणभर आपल्या जीवनांतील रुक्षता विसरूं शकतो. तेव्हां त्याच्या जीवनांतील अद्‌भुततेची आवड नाहीशी झाली असें कसें म्हणतां येईल?

वाचकांच्या अपक्षेला अनपेक्षित घटनेनें धक्का देऊन वाचकांचा अपेक्षाभंग करण्याचें व क्षणभर त्यांना चकित करण्याचें काम कुशल कादंबरीकार करत असतो. ज्या कादंबरींत घटना नाही––अपेक्षेला बसणारे धक्के नाहीत ती कादंबरी वाचकांच्या आदराला फारशी पात्र होत नाही असा आपला अनुभव आहे. जी गोष्ट कादंबरीची तीच एका अर्थी जीवनाची! ठराविक चाकोरींतून जाणारं जीवन कांही थोड्या लोकांना आवडत असेल. पण बहुजनांच्या जीवनासबंधीं कांहीतरी आशा–अपेक्षा असतात–जीवनांत कांहीतरी घडावं असं त्यांना वाटत असतं–अद्‌भुत घटनांची ते वाट पहात असतात–पण दुर्दैवानें बहुतेकांच्या कपाळीं निराशाच येते.

बाहेरच्या ऑफिसमध्यें समोर कामाचा गठ्ठा पुढें घेऊन बसलेले कितीतरी कारकून मधूनमधून 'साहेबा'च्या खोलीकडे नजर टाकत असतात व 'आपणाला कोणत्या ना कोणत्या रीतीनें त्या जागीं बसता आलें तर किती चांगलें होईल?' अशीं गोड स्वप्नेंही ते करत असतात. लॉटरीचें तिकीट काढल्यावर कितीतरी लोक मोठ्या अपेक्षेनें निकालाच्या दिवसाची वाट पहात असतात! लहान मुलगा ज्या अपेक्षेनें अल्लाउद्दीनचा दिवा मिळवण्याची वाट पहात असतो त्या अपेक्षेनें जरी नाही तरी थोड्याफार आशेनें मनुष्य आपल्या जीवनांत कांहीतरी घडून यावें अशी इच्छा करत असतो हें नाकबूल करतां येणार नाही.

किंबहुना ही आशाच त्यांच्या जीवनांत थोडाफार आनंद निर्माण करीत असते. आशा म्हणजे तरी काय? भावी सुखपूर्ण जीवनाची इच्छा! त्या आशेवर मनुष्य आल्या आपत्तीला तोंड देत असतो, पुढें वाढून ठेवलेल्या दुःखाचा वांटा मुकाट्यानें उचलीत असतो व गुलामगिरीचें जोखड निमुटपणें सहन करत असतो. या आशेंतच महत्वाकांक्षी माणसाला आपल्या महत्वाकांक्षा फलद्रूप झालेल्या दिसतात, दरिद्री माणसाला संपत्ती मिळाल्याची स्वप्नं पडतात व दुःखी माणसाला सुखाचें जीवन दिसू लागतें. ही आशा माणसाच्या जीवनांतून वजा केली कीं माणसाचें जीवन असह्य होईल. आज महायुद्धामुळे उद्भवणाऱ्या निरनिराळ्या अडचणीला व विलक्षण महर्गतेला लोक धैर्यानें तोंड देतात तें तरी दुसऱ्या कशाच्या जोरावर?

आणि या आशेंतच अद्भुतरम्यतेची छटा दडली आहे. माणसाच्या मनांतील अद्भुततेच्या आवडीचे प्रमाण त्याच्या वृत्तीप्रमाणें बदलेल हें खरें आहे. पण ती आवड त्यांच्या हृदयांत खोल कुठेंतरी असेल हें खास! आणि ती त्यांच्या नित्याच्या वर्तनांत कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपांत दिसून येते. माझ्या एका मित्राला दररोज घरीं आल्यावर प्रथम आपल्या

पत्नीला, 'माझ्याकडे कुणी येऊन गेलं का?' असें विचारण्याची संवय होती. वास्तविक त्याचा मित्रपरिवार फार मोठा नव्हता किंवा त्याच्याकडे सहज चहा पिण्याकरितां येणाऱ्या मित्रांपलीकडे कुणी फारसें येतजातही नसत. तरी पण तो प्रश्न, त्या प्रश्नाचें उत्तर माहीत असूनही पुन्हा पुन्हा विचारताना, माझ्या मित्राच्या मनांतील अद्भुतरम्यतेची आवडच व्यक्त होत नव्हती का? किंवा कुणाचेंही पत्र येणार नाही अशी खात्री असताना-देखील पत्राच्या पेटीकडे नजर टाकताना माझ्या मनांतील हीच अद्भुततेची आवड दिसून येत नाही का?

पण मी हें कुणाला सांगितलें तर पटायचें नाही. माझे सर्व मित्र मला हंसतील व म्हणतील, 'छट्! कुठली अद्भुतता अन् कुठलं काय! सारी कवि-कल्पना आहे तुझी! व्यवहारांत वागायचें म्हणजे अशा कवि-कल्पना मनांत बाळगून चालेल का?'

अन् त्यावर 'काय हो-मग अगदीं प्रामाणिकपणें सांगा-तुमच्या डोक्यांत लॉटरीचं दहा लाखांचं बक्षिस मिळावं असं कधीं आलं नाही? पोष्टांत मनीऑर्डरच्या रिसीट्स् लिहिताना पोष्टमास्टर जनरल होण्याची सुखस्वप्नं तुम्ही कधीं केलीं नाहीत? अन् मनीऑर्डर करायला एखादी सुंदर मुलगी आली तर 'या मुलीचा आपल्याबरोबर विवाह झाला तर किती छान होईल!' असा विचारही कधीं तुमच्या डोक्यांत शिरला नाही?' असं जर मीं त्यांना विचारलें तर ते खात्रीनें म्हणतील, 'छे छे! अशा कल्पना करायला आम्ही मूर्ख आहोंत कीं काय?'

पण घरीं जाताना, माझी खात्री आहे कीं, प्रत्येकाच्या डोक्यांत विचार येईल, 'खरंच, परवां आपण मोटारींत पाहिलेली मुलगी किती सुरेख होती! योगायोगानें तिचा न् माझा विवाह जुळून आला तर-!'

अन् हे विचार डोक्यांत येण्याचें जोंपर्यंत त्यांना थांबवता येत नाही तोंपर्यंत माझ्या पत्राच्या पेटीकडे वेळींअवेळीं पहाण्याच्या संवयीला हंसण्याचा त्यांना काय अधिकार आहे ?

आणि ते हंसले म्हणून मी माझी संवय सोडणार आहे थोडीच ?

कारण मला अजूनही वाटतें केव्हां ना केव्हां तरी माझ्या जीवनाला गोड कलाटणी देणारें पत्र मला त्यांत मिळणार आहे.

आणि तें पत्र कसें असेल याची कल्पना करण्यांत मला जो आनंद मिळतो तो काय कमी आहे ?

———

# प्रवासांतील सोबती

माझ्या अव्यवस्थितपणावर चिडून गेलों होतों मी! मला माझ्या एका मित्राचा पत्ता पाहिजे होता आणि सर्व पत्ते लिहून ठेवलेली माझी छोटी वही कुठेंतरी बेपत्ता झाली होती. ती सांपडावी म्हणून मीं जंगजंग पछाडले; टेबलावरील सारा 'जुना बाजार' इकडचा तिकडे करून टाकला; सारे ग्रंथराज फडफडवून पाहिले; पण छे! त्या वहीचा कांहीं पत्ता लागेना. स्मरणशक्तीवर भिस्त ठेवून पत्ता लिहावयाचा म्हटलें तर ती तरी धड असावयास पाहिजे ना? गडकऱ्यांच्या धुंडिराजांच्या शब्दांत 'कालची बाकी कालच जमा–आजला बाकी शून्य' ही आमच्या स्मरणशक्तीची अवस्था–आणि त्यांत पुन्हा त्याचा अपूर्णांक घरनंबर! म्हणजे स्मरणशक्तीचें पुरेंच दिवाळें! शेवटीं रागारागानें टेबलाखालील ट्रंक 'फरकन्' ओढली––

––आणि तिच्या मागें अर्धवट दुमडलेल्या अवस्थेंत माझी वही कोळ्याच्या जाळ्याचे नाजूक वस्त्र परिधान करून समाधानानें पडली होती. मीं ती उचलली–मित्राच्या पत्रावर पत्ता लिहिला व वहीचीं पानें सारखीं करूं लागलों. इतक्यात त्यांतील–'जिवाप्पा अण्णाप्पा कुंदगोळ, पोष्ट गदग, जि. धारवाड.' या पत्त्यानें माझें लक्ष वेधलें. क्षणभर मी त्या पत्त्याकडे आश्चर्यानें पहातच राहिलों. गदग गांवीं राहणाऱ्या या 'जिवाप्पा कुंदगोळचा' पत्ता माझ्या वहींत येण्याचें प्रयोजन काय हेंच मला समजेना. अक्षर माझेंच होतें हें खास, पण बेळगांवच्या पुढें मीं कधींच प्रवास केला नव्हता; किंबहुना कुंदगोळ हें नांव मीं कधींच ऐकल्याचें आठवत नव्हतें. मग हा पत्ता माझ्या परिचितांच्या पत्त्यांच्या वहींत कसा आला? कुंदगोळ नांवाची व्यक्ति मला बी. टी. च्या वेळीं किंवा इतर वेळीं कुठें भेटली होती कीं काय हें आठविण्यासाठी मी माझ्या साऱ्या कानडी मित्रांचे चेहरे डोळ्यासमोर आणून पाहिले. पण छे! 'कुंदगोळ' नांवाची एकही

व्यक्ति माझ्या परिचित मित्रांमध्यें मला आढळेना. विचार करून करून थकल्यावर शेवटीं न उलगडणारें कोडें, म्हणून मी तो विचार डोक्यांतून काढून टाकणार होतों.——

तेवढ्यांत सारी हकीगत एकदम आटवली. त्या वेळीं मी बेळगांवहून परत पुण्याला येत होतों. अगोदरच एम्. एस्. एम्. चा प्रवास व त्यांत पॅसेंजर ट्रेन—त्यामुळें कंटाळून गेल्यामुळे म्हणा किंवा चहा पिण्याची लहर आल्यामुळे म्हणा—मी फराळाच्या डब्यांत शिरलो. त्या ठिकाणी इडली, भाजी, चहा वगैरे पदार्थांवर भरपूर ताव मारून मी उठलों व नोकराच्या हातावर अधेली ठेवली.

त्यानें ती अधेली घेतली—निरखून पाहिली व मला 'साभार परत' केली. मीं आश्चर्यानें त्या अधेलीकडे पाहिलें—तो खरेंच! साफ बनावट होती ती अधली. दुसरें नाणें काढण्याकरितां मीं खिशांत हात घातला तों तो पार रिकामा. वरच्या खिशांत एखादी नोट असेल म्हणावें तर नोटा पैशाच्या पाकिटांत घालून बॅगमध्यें ठेवलेल्या व बॅग दुसऱ्या डब्यांत!

"हें पहा—माझे पैसे दुसऱ्या डब्यांत विसरले आहेत—" मी जरा गडबडून माझ्या कपाळावर आलेले घर्मबिंदु पुशीत त्याला सांगूं लागलों.

पण तो नोकर विलक्षण नजरेनेंच माझ्याकडे पहात होता. 'येन्रीऽऽ' अशी सुरवात करून त्यानें जो आपला वाक्प्रवाह कानडींत सुरू केला तो कांहीं विचारूं नका. गोकाकचा धबधबा दुसरा. एक अक्षर कळेना मला त्याचं!

"अरे भल्या माणसा—" मीं पुन्हा बोलण्याचा प्रयत्न केला.

पण मला बोलण्याची संधीच न देता त्या भल्या माणसानें आपल्या वाक्प्रवाहाचा दुसरा धबधबा सुरू केला. त्याला काय म्हणायचें हें मला कळेना आणि मला काय सांगायचें तें सांगण्याची तो मला संधी देईना. मी एक शब्द मराठींत बोललों कीं त्याचे दहा शब्द कानडींत सुरू होत. मोठा पेंचप्रसंगच पडला माझ्यापुढं!

इतक्यांत माझी इतका वेळ गंमत पहात बसलेला एक कानडी तरुण पुढें आला व त्याच्याशीं कांही तरी कानडी बोलू लागला. त्यावर त्यानें जास्तच मोठ्या आवाजांत व एम्. एस्. एम्. पेक्षां जास्तच वेगानें गाडी सोडली.

तेव्हां तो तरुण माझ्याकडे वळून म्हणाला, "तो म्हणतोय् की असं पुष्कळ लोक सोंग करतात व पैसे बुडवतात."

"अहो पण त्याला म्हणावं माझी टोपी ठेवून घे जामीन म्हणून! पैसे जर दुसऱ्या डब्यांत अडकले असले तर काय दांत पाडून द्यायचे याला?" मीं जरा त्राग्यानेंच म्हटलें.

"बरं जाऊं द्या! मी देतों पैसे तुमचे! सारा सहा आण्यांचा तर प्रश्न!" असें म्हणून त्यानें बिल् भागवलें व पुढील स्टेशनावर आम्ही दोघेही खालीं उतरलों.

कृतज्ञताबुद्धीनें मीं त्याला ओढतच आमच्या डब्यांत आणलें. मी बॅगमधून पैसे काढू लागलों. पण छे!

"अहो सहा आण्यांचा काय तो प्रश्न! तुमची न् माझी त्यामुळे ओळख झाली हा का कमी फायदा आहे? छे छे! मी घेणार नाही पैसे." त्यानें बॅग्चे झांकण परत लावीत म्हटलें.

आणि त्यानंतर आम्ही एकाच डब्यांत बसलों. तो कांही कामाकरितां मुंबईला निघाला होता. त्यामुळे पुण्यापर्यंत आम्ही खूपच गप्पा मारल्या.

तो गदगला राहात होता. त्याचं तिथं पुस्तकाचं दुकान होतं. पण व्यापारापेक्षा वाङ्मयाकडेच त्याचें जास्त लक्ष होतें. तो स्वतः कानडी भाषेंत गोष्टी लिहीत असे. त्यामुळे आमच्या गप्पांना बरेंचसें वाङ्मयीन स्वरूप आलें. त्यानें मला कानडी वाङ्मयाची चांगली कल्पना दिली. त्या वाङ्मय विचारांचे प्रमुख प्रवाह सांगितले. विशिष्ट लेखकांच्या व कवींच्या कला-कृतीबद्दल चर्चा केली. मींदेखील मराठी वाङ्मयाबद्दल बरीच माहिती त्याला

एकवली. गप्पांत इतका छान वेळ गेला की पुणें आलें त्यावेळीं नूतन-परिचित असून देखील चिरपरिचितांचा मोकळेपणा आमच्या भाषणांत आला होता.

"आतां आपली ओळख कायम राहिली पाहिजे ह !" तो म्हणाला, "प्रत्यक्ष भेटणें जरी जुळलें नाही तरी पत्र रूपानें आपण जरूर मैत्री वाढवली पाहिजे."

"अवश्य !" मीं म्हटलें, "आणि पत्रांतून कानडी वाङ्मयासंबंधीं माहिती पण तुम्ही पुरवली पाहिजे."

असें म्हणून मीं त्याचा व त्यानें माझा पत्ता उतरून घेतला. आम्ही पुणें स्टेशनवर एखाद्या जिव्हाळयाच्या मित्राप्रमाण एकमेकांचा निरोप घेतला.

वरील प्रकाराला सहा वर्षे झालीं होतीं. त्या अवधींत त्याचें मला किंवा माझें त्याला एकहि पत्र गेलें नव्हतें. किंबहुना 'कुंदगोळ' हें नांव व त्याचा पत्ता पाहिल्याबरोबर 'हा कोण इसम ?' असा प्रश्न करण्याइतके माझ्या स्मरणशक्तीनें त्याला विस्मृतीच्या अडगळींत टाकून दिलें होतें.

या विस्मृतीच्या अडगळीत, अशा ओळखी झालेल्या किती व्यक्ती असतील याची खानेसुमारी करणेंच अशक्य आहे. कितीतरी अनोळखी लोक आपणाला गाडींत भेटतात, त्यांच्याशीं आपण गप्पा मारतों, त्यांच्या डब्यांतील फराळावर ताव मारतों, राजकारणापासून अगदी क्षुल्लक विषयापर्यंत घसा फुटेपर्यंत त्यांच्याबरोबर वाद घालतों—आणि उतरण्याचें ठिकाण आलें की जो तो आपापल्या दिशेनें निघून जातो. पुढें एकमेकांना त्या ओळखीची आठवणसुद्धा रहात नाही. एका दृष्टीनें खरोखरच या ओळखी म्हणजे हातावर लावलेल्या अत्तरासारख्या असतात. जोंपर्यंत हातावर अत्तर असतें तोंपर्यंत त्याचा सुवास मनाला आनंद देतो. पण कालान्तरानें तें उडून गेल्यावर त्याची स्मृतीहि आपणाला रहात नाही. आगगाडींतल्या ओळखीचें स्वरूपही कांहीसें असेंच असतें, नाही का ?

आणि याला कारण म्हणजे आगगाडींतील विश्वच कांहीसें निराळें असतें. माणूस प्रवासाला निघतो व आगगाडींत प्रवेश करतो तोच मुळीं पांचसहा तास एका ठिकाणीं बसून कंटाळवाण्या रीतीनें घालवायच या कल्पनेनें! मित्रमंडळीचा तांडा बरोबर असला म्हणजे हा प्रश्न फारसा उत्पन्न होत नाही. पण एकटा माणूस प्रवासाला निघाला—आणि विशेषत: लांबच्या प्रवासाला निघाला—तर त्याला हा एकाकी प्रवास म्हणजे एक दिव्यच वाटत असतें. वर्तमानपत्रें किंवा साप्ताहिकें फार तर एकदोन स्टेशनांपर्यंत पुरूं शकतात—गाडींत सतत पुस्तक वाचणे एखाद्या गाढ्या पंडितालाच शक्य असतें—बाहेरचें सृष्टिसौंदर्य मनाला फार काळ रिझवूं शकत नाही आणि रात्रीची वेळ असली तर तोही करमणुकीचा प्रकार काळोखांतच दडलेला असतो—अशा वेळीं डब्यांतील उतारू व त्यांच्या हालचाली यांच्याकडे लक्ष पुरवून मनाची करमणूक करून घेण्यापलीकडे त्याला दुसरें कांहीच करणे शक्य नसतें. त्याचा शेजारी अशाच मानसिक अवस्थांतरांतून जात असेल तर त्या दोघांची ओळख होणें फारसें कठीण नसतें—आणि त्या दोघांनाही जिव्हाळ्याच्या वाटणाऱ्या विषयावर सभाषणाचा ओघ वळला तर त्या ओळखीचें पर्यवसान एकत्र चहा—फराळ करण्याच्या मैत्रींतही होण्याला फारसा वेळ लागत नाही.

अशा ओळखी करून घेण्यास साधनेंही सहजसुलभ असतात. प्रवास करणारा माणूस थोडा फार सुशिक्षित असला तर वर्तमानपत्रें, साप्ताहिकें हीं त्यांची ओळख करून देण्यास चांगलीं उपयोगी पडतात. 'जरा वर्तमानपत्र देतां का हो?' हा मंत्र म्हणजे ओळखीचें सूत उवाच आहे हें नक्की समजावें. याहीपेक्षां अधिक उच्च पातळीवरील मनुष्य खिशांतून सिगरेटचें पाकिट काढील आणि त्यांतील एक आपल्या शेजारच्या प्रवाशाला 'ऑफर' करून सभाषणाला तोंड फाडील. खालच्या वर्गांतील लोकांना या वर्तमानपत्रांचें आकर्षण फारसें नसतें, पण त्यांच्याजवळही ओळखीची दोन प्रभावी साधनं असतातच. एक म्हणजे चंची व दुसरी चिलीम किंवा

विडी. चंची काढून बार भरायला सुरवात झाली म्हणजे त्या चंचीभोंवतीं जमलेल्या लोकांच्या गप्पांना तितकाच बहर येतो हा अनुभव गार्डीत कुणाला येत नाही ?

याशिवाय एकदां डब्यांत शिरल्यावर त्या डब्यांतील व्यक्तींविषयीं एक प्रकारची आपुलकीची भावना निर्माण होते. उभ्या राहणाऱ्या लोकांना आपण सरकून व दाटीवाटीनें बसून जागा करून देतों, ‘ काय ही गर्दी ! ’ ‘ काय ही गैरसोय ! ’ असें म्हणून सर्वांबरोबर आपणही रेल्वे–कंपनीच्या व्यवस्थेचा तीव्र निषेध करतों. याशिवाय प्रत्येक स्टेशनवर बाहेरील उतारूंनीं आंत येऊं नये म्हणून सामुदायिक गिल्ल्यांत भाग घेऊन त्यांच्याविरुद्ध स्वतंत्र आघाडी निर्माण करण्यांतही आपण सामील होतों; पण तेच बाहेरील उतारू एकदां डब्यांत आले म्हणजे पूर्वीचें वैर विसरून त्यांना जागा करून देण्याचाही कटाक्षानें प्रयत्न करतों. थोडक्यांत म्हणजे डब्यांत असतांना आपण एका सामुदायिक मनाचे घटक म्हणून वागत असतों.

या छोट्या विश्वांतही ‘ व्यक्ति तितक्या प्रकृति ’ या न्यायाचा पुरेपूर अनुभव येतो. आपला बिछाना पसरून बेगुमानपणें पसरणाऱ्या व इतर अडचणींनें उभ्या राहणाऱ्या व्यक्तींची थोडीसुद्धां पर्वा न करणाऱ्या एकाद्या मिलिटरींतल्या शिपायापासून तें बाकाच्या अगदीं टोकावर कोणी बोलेल म्हणून कावऱ्याबावऱ्या नजरेनें इकडेतिकडे पहात बसणाऱ्या एकाद्या अडाणी खेडवळापर्यन्त सर्व नमुने आपणास पहावयास सांपडतात. कांही कांही जबर गोष्टीवेल्हाळ भेटतात–तर कांही तोंडाला कुलूप लावून बाहेरचें नसलेलें सृष्टिसौंदर्य पाहाण्यांत गुंग झालेले अबाल भेटतात. पांच मिनिटांच्या ओळखीवर आपल्या फराळाच्या डब्यांतील चमचमीत पदार्थांवर ताव मारण्यांत भाग घेण्याचा आग्रह करणारे उदारधी भेटतात तर पांच तासाच्या परिचयानंतरही स्टेशनवर स्वत:पुरताच ‘ सिंगल ’ चहा मागविणारे महाभागही भेटतात. त्यामुळे डब्यांत बसलें कीं त्यांतील हें छोटें विश्व पहातांना मोठी गंमत वाटते–व अनुभव तर फार मजेचे येतात.

मला आठवतंय, एकदां मी सोलापूरहून पुण्याला जात होतों. माझ्या शेजारींच एक अद्यावत् युरोपियन पोषाख केलेला तरूण बसला होता. पण त्याची ती एकंदरींत ताठ बसण्याची पद्धत व सरळ डब्याच्या बाहेर रोखलेली दृष्टि पाहून कुणालाही वाटलं असतं, कीं फर्स्ट क्लासमध्यें बसण्याची योग्यता असलेला उतारू चुकून तिसऱ्या वर्गात बसलेला आहे आणि आपण आपल्यापेक्षां खालच्या पातळींतील माणसांच्या जमावांत आहोंत ही जाणीव सारखी त्याला होत आहे. डब्यांत कितीही गडबड उडाली–कितीही हंशा पिकला तरी या बहाद्दराची नजर डब्यांतील देखाव्याकडे वळली नाही. बाहेरच्या सृष्टिसौंदर्यात इतकी काय मोहिनी भरली होती ते त्याचा तोच जाणे. त्याच्याच पलीकडे एक वाणी बसला होता व त्या वाण्याच्यासमोर एक शेतकरी बसला होता.

थोड्याच वेळांत त्या शेतकऱ्यानें आपली चंची बाहेर काढली व पानें वगैरे काढून तीं त्या वाण्यापुढें धरलीं. शेजारीं एक मुसलमान बसला होता त्यालाही त्यानें दोन पानें देऊ केलीं–आणि हळूहळू त्या पानतंबाखूबरोबर त्यांच्या गप्पा सुरू झाल्या. प्रत्येकानें आपापल्या धंद्याविषयीं माहिती सांगायला सुरवात केली व युद्धाचा परिणाम आपल्या धंद्यावर कसा झाला याचेंही प्रत्येकानें वर्णन केलें. त्यांच्या गप्पा चालू असतांना त्या मुसलमानानें फर्मास विड्या काढून प्रत्येकाला दिल्या आणि त्या वाण्यानें आपल्या गाठोड्यांतील शेंगाही काढल्या. शेवटीं शेवटीं तर त्यांच्या गप्पांना इतका रंग चढला की, ज्यावेळीं त्यांचें उतरण्याचे स्टेशन आलें त्यावेळीं त्यांनीं अगदीं जिव्हाळयाच्या मित्राप्रमाणे एकमेकांचा निरोप घेतला.

ज्यावेळीं त्यांच्या गप्पांना असा रंग चढला होता त्यावेळीं आमचा शेजारी जणूं कांही आपल्या आसपास कांहीच घडत नाही अशा आविर्भावानें डब्याबाहेर दृष्टि रोखून ताठ बसला होता. माझ्या शेजारीं तेवढा एकटाच सुशिक्षित तरुण होता. तेव्हां आपण तरी सुरवात करावी म्हणून

मीं कांहींसें स्वतःशीं अन् कांहींसें त्याला उद्देशून म्हटलें, 'काय गर्दी ही गाडीमध्यें! छे छे! आजकाल प्रवास म्हणजे......'

पण माझा बाण फुकट गेला. माझ्या शेजाऱ्यानें मान वळवून देखील माझ्याकडे पाहिलें नाहीं. बाहेर नसलेल्या सृष्टिसौंदर्यांत त्याला काय एवढें आकर्षण वाटत होतें याचा मला तरी पत्ता लागला नाहीं. पण तेवढ्यानें मी निराश झालों नाहीं. फिरून एकवार प्रयत्न करण्याच्या चिकाटीनें मीं दौंड स्टेशनवर त्याला उद्देशून म्हटलें, 'काय हो? चहा वगैरे घेणार का?' 'माफ करा! मी चहा वगैरे कांहीं घेत नाहीं' असें उत्तर देत त्या तरुणानें अशा रीतीनें माझ्याकडे पाहिलें की त्याला जणू म्हणायचें होतें 'काय लुडबुड चालवली आहेत हो मघापासून! स्वस्थ बसतां येत नाहीं वाटतं?' मी फिरून या गृहस्थाच्या वाटेला गेलों नाहीं. त्याची आठवण झाली म्हणजे मला अजून वाटतें की बहुधा प्रेमभंग झालेला व त्यामुळे आत्महत्येचे विचार मनांत घोळत असलेला तरुण असावा तो.

एकाद्या वेळीं बिकट प्रसंग आला म्हणजे गाडींत संभाषणसुद्धां न केलेल्या व्यक्तींशीं प्रवासाच्या शेवटीं जवळ जवळ जिव्हाळ्याच्या मित्राचें नातें उत्पन्न होतें. असाच एक अनुभव मला मनमाड ते पुण्याच्या प्रवासांत आला. मनमाडहून मी रात्रींच्या गाडीनें पुण्याला निघालों होतों. माझ्याच डब्यांत माझ्या वयाचा एक तरुण बसला होता. आम्हीं एकमेकाकडे पाहिलें. पण तो पुस्तक वाचण्यांत गुंग झाल्यानें व माझ्याही डोळ्यावर झोंपेची झांपड असल्यामुळे आमचें बोलणें कांहींच झालें नाहीं. गाडीला गर्दी होतीच. पण त्यांतल्या त्यांत मला थोडी जागा मिळाल्यामुळे मीं त्याचा पुरेपूर फायदा करून घेतला. आणि दौंड स्टेशन आल्यावर मी जागा होऊन पाहतों तों बाहेर चांगलें ऊन पडलेलें. मी आश्चर्यचकित झालों. गाडी वास्तविक रात्रीं तीनला दौंडला यायची—अन् आतां जवळजवळ आठ वाजलेले! नंतर मग मला कळलें कीं, नगरच्या अलीकडील घाटांत एक

मालगाडी फेल झाल्यामुळे गाडीनें अलीकडील स्टेशनवर पांच तास मुक्काम केला होता. अर्थात पुण्याला जाणारी एक्सप्रेस केव्हांच निघून गेली होती व पुण्याला जाण्यास संध्याकाळीं ६ खेरीज दुसरी गाडी नव्हती. हे दहा तास स्टेशनवर कसे घालवायचे हा मोठा पेंचच माझ्यापुढें पडला होता. फलाटावर हिंडतांहिंडतां मधाशीं डब्यांत बसलेल्या तरुणाची गांठ पडली. त्याच्याही समोर तोच पेंचप्रसंग होता. समान दुःखांत वांटेकरी झाल्यानें आम्ही नकळतच एकमेकांकडे पाहून हसलों.

"काय हो? गाडीनें आपली चांगलीच विकेट घेतली की!" तो म्हणाला, "हे दहा तास आतां स्टेशनवर करायचं तरी काय?"

"तोच प्रश्न मलाही पडला आहे." मीं म्हटलें, "पण मी एक योजना सुचवतों. पटली तर पहा. आपण एवींतेवीं अडकलोंच आहोंत इथें—तर दौंड गांव पाहून येऊं या."

माझी सूचना एकदम त्याला मान्य झाली व सामान लॉक्‌अपमध्यें ठेऊन आम्ही दौंडमध्यें शिरलो. खूप गंमत केली आम्ही त्या आठ—दहा तासांत. दौंडमधील प्रत्येक हॉटेलचा नमुना पाहिला, बाजारांतून हिंडून आलों, नदीच्या कांटाकांठानें खूप हिंडलों, गांवांतील प्रत्येक रस्त्यांतून आडव्यातिडव्या चकरा मारल्या—तिथल्या वाचनालयांत शिरलों आणि इतकंही करून वेळ उरलाच, तेव्हां आम्ही बरीचशी भेळ फळें, वगैरे खरेदी करून नदीच्या कांठावर सांवलींत जाऊन बसलों. हे सगळे कार्यक्रम चालू असतांना आमच्या मनमुराद गप्पा चालल्याच होत्या. जे दहा तास कसे घालवायचे हा आम्हांला मोठा प्रश्न पडला होता, ते कसे गेले तें आम्हाला कळलेंही नाही. पुण्याला आलों त्या वेळीं दहापंधरा वर्षांची जुनी मैत्री असावी इतका जिव्हाळा आमच्या संभाषणांत आला होता. आतां त्याची न् माझी फारशीं गांठही पडत नाही—किंवा आमचा पत्रव्यवहारही नाही, पण जेव्हां जेव्हां मी दौंडवरून जातों तेव्हां तेव्हां तेथें घालवलेल्या त्या दहा अविस्मरणीय तासांची आठवण झाल्याखेरीज रहात नाही.

गाडींत वाचायला घेतलेलें पुस्तक गाडींतील वेळ घालविण्यास मदत करतें, पण कधीं कधीं त्या पुस्तकाच्या योगानें भिन्न संस्कृतीच्या माणसाची ओळख होते व प्रवाशांना तें आपला सामाजिक वा आर्थिक दर्जाही विसरायला लावतें याचा विचित्र अनुभव मला मुंबईच्या प्रवासांत चांगलाच आला. प्रवासांतील आत्यंतिक गर्दीनें मीं इंटरचें तिकिट काढलें होतें व करमणूक म्हणून बरोबर पी. जी. वुडहाऊस या विनोदी लेखकाचें 'डक्रिज्' हें पुस्तक घेतलें होतें. डब्यांत माझ्या समोरच्या बाकावर एक मिलिटरींला कुणीतरी युरोपियन अधिकारी बसला होता. गाडी सुरू झाल्यावर त्याचें लक्ष सहज माझ्या पुस्तकाकडे गेलें.

"अरे, तुम्ही पी. जी. वुडहाऊस वाचतां वाटतं?" तो जरा पुढें वांकून इंग्रजींत म्हणाला, "कसा काय वाटतो तुम्हाला तो ग्रंथकार?"

त्याच्या त्या अनपेक्षित प्रश्नानें मी आश्चर्यचकित झालों. त्याच्याकडून अशा तऱ्हेचा प्रश्न येईल, किंबहुना Damn, fool या शिव्याव्यतिरिक्त तो आपणाशी कांही बोलेल अशी माझी कल्पनासुद्धा नव्हती. युरोपियन माणूस—व तोही लष्करांतील—एका धोतरांतील काळ्या आदमीबरोबर संभाषण सुरू करील ही घटनाच माझ्या दृष्टीनें असंभाव्य होती.

"माझा अतिशय आवडता लेखक आहे तो!" मीं त्याला जरा हंसत इंग्रजींत सांगितलें, "पी. जी. वुडहाऊसचें कोणतेंही पुस्तक म्हणजे मेजवानीच वाटते मला!"

"खरंच!" तो म्हणाला, "मला स्वतःला पी. जी. वुडहाऊस इतका आवडतो की मीं त्याच्या सगळ्या पुस्तकांचीं तीन तीन वेळा पारायणें केलीं आहेत. त्याचीं सारीं पुस्तकं माझ्याजवळ आहेत अन् कुठेंही जायचं म्हणजे त्याचीं एक दोन पुस्तकें बरोबर असल्याखेरीज मी बाहेर पडत नाही. तुम्हीं सगळीं पुस्तकं वाचलीं का त्याचीं?"

“अगदी अलीकडचीं पुस्तकें मला नाहीं वाचायला मिळालीं, पण बाकी सगळीं वाचलीं आहेत.” मीं उत्तर दिलें.

“मजजवळ त्याचें एक अगदी अलीकडचें पुस्तक आहे. क्षणभर थांबा. मी तुम्हाला तें दाखवतों.” असें म्हणत खालीं वांकून त्यानें आपल्या बॅगेंतून पी. जी. वुडहाऊसची नवीन प्रसिद्ध झालेली कादंबरी काढली व माझ्या हातांत दिली.

आणि नंतर त्याच्या निरनिराळ्या पुस्तकांवर आमच्या ज्या गप्पा सुरू झाल्या त्या अगदीं दादर स्टेशन येईपर्यंत! त्याचें तें सफाईदार इंग्रजी व माझे त्या मानानें गांवठी उच्चार याचें कदाचित् डब्यांतील इतर लोकांस हंसूं आलें असेल. कित्येक वेळां तो इतक्या भरभर बोले की मला तो काय बोले तेंच समजत नसे. तरीपण आमच्या गप्पांत कांहीं खंड पडला नाहीं. विशेषत: त्याला वुडहाऊसवर बोलतांना विशेषच उत्साह वाटत होता. त्यानें त्या नवीन कादंबरीचें कथानक सांगितलं,—त्यांतले विनोदी प्रसंग अशा कांही आविर्भावानें वर्णन करून सांगितले की मला अतिशय हंसूं आलें. शिवाय उक्रिज्, जीव्हज्, मुलिनर इत्यादि वुडहाऊसनें निर्माण केलेल्या अनेक पात्रांच्या पराक्रमाचीं वर्णनें करून आम्हीं खूप हंसलों. बोलायचें काम मुख्यत: तोच करीत होता. श्रोत्याची भूमिका मीं पतकरली होती. गप्पांत आम्ही दोघे इतके रंगून गेलों होतों की दादर केव्हां आलें हें मला कळलेंही नाही. पण माझे चुलतबंधु बाळासाहेब व मालती वहिनी खिडकीशी आल्या, तेव्हां मी एकदम दचकून उठलों.

“Well, good bye!” उतरतांना त्यानें पुढें केलेला हात घेऊन हस्तांदोलन करीत मीं म्हटलें, “आतांपर्यंत इतका सुंदर प्रवास मीं कधींच केला नव्हता.”

“माझेसुद्धां हे चार तास कसे गेले हें कळलेंसुद्धा नाही.” तो म्हणाला, “मी आतां दिल्लीला चाललों आहें. कदाचित् इकडे पुन्हा

येणारहि नाही. पण हा चार तासांचा प्रवास मात्र माझ्या कायम स्मरणांत राहील."

आणि नंतर आम्ही एकमेकांचा निरोप घेतला. शेवटपर्यंत त्याचं मला नांवही कळलं नाही किंवा माझंही नांव त्याला मीं सांगितलें नाही. यापुढें आम्ही दोघे एकमेकांना भेटण्याचाही थोडासुद्धां संभव नाही. पण गप्पा मारण्यांत घालविलेले ते चार तास माझ्या मनावर कोरल्यासारखे आहेत. ज्या ज्या वेळीं मी वुडहाऊसचें एकादें पुस्तक वाचायला घेतों त्या त्या वेळीं त्याचा तो लालबुंद चेहरा, त्यावर दिसणारें तें मिस्किल हास्य, व वर्णन करण्याच्या उत्साहांत चमकणारे त्याचे ते डोळे अद्याप माझ्या डोळ्यासमोर उभे राहतात व क्षणभर मी त्या आठवणींतच दंग होऊन जातों.

आपल्या धडाडीनें किंवा कर्तृत्वशक्तीनें पुढें आलेल्या व्यक्तींचीं चरित्रें आपण केवळ मासिकांतूनच वाचतों असं मला अद्यापपर्यंत वाटत होतं. पण अशा व्यक्तीचा परिचय मला नुकत्याच केलेल्या नगरच्या प्रवासांत झाला. पुणें–नगरच्या गाडीला अगोदरच विलक्षण गर्दी–त्यांत पुन्हां दोन दिवसावर कार्तिकी आलेली. स्टेशन त्यामुळे माणसांनीं अगदीं फुलून गेलें होतें. या भाऊ–गर्दीत आपला कसा काय निभाव लागेल ही शंका माझ्या मनांत होतीच–त्यांत पुन्हा गाडी आली ती अगदीं भरूनच. गाडी फलाटावर उभी राहण्याचे आधींच डब्याच्या दाराशीं चेंगराचेंगरीला सुरवात झाली. 'काय होईल तें होवो' या निर्धारानें मुठींत प्राण धरून मी त्या गर्दीत घुसलों. पण जें व्हायचें तेंच झालें. त्या विलक्षण गर्दीत चेंदामेंदा होण्याची वेळ आली माझ्यावर! पाठीमागून गर्दीनें उभ्या राहिलेल्या माणसांचें पुढें ढकलणें–व दारांतून आंत येणाऱ्या लोकांचें मागें रेटणें यामध्यें मी एकीकडे, माझें सामान एकीकडे, अशी स्थिती झालीच, पण या गर्दीत डोळ्यावरील चष्मा खालीं पडण्याच्या बेतांत होता तो नीट ठेवण्याला हात वर करणेंही अशक्य झालें. पुढें मागें स्वतः ढकलावें म्हटलें तर

पुढें दोनतीन दांडगट मराठे डोक्यावर मोटमोटीं पोतीं घेऊन उभे होते व पाटीमागे तर तीनचार पटाण होते. बहुधा आमची कार्तिकी गाडींतच साजरी होणार या कल्पनेंत मी होतों. इतक्यांत एक गृहस्थ पुढें आले, त्यांनीं त्या दोन्हीतिन्ही मराठ्यांना जोरानें पुढें ढकललें, त्या पटाणांनाही मार्गे रेटलें व हात धरून त्यांनीं मला ते स्वत: बसले होते त्या जागेकडे आणलें. तिथेंच ऐसपैस बसलेल्या एका मिलिटरींतल्या माणसाला जरा जोरांत आवरून बसण्यास सांगितलें व मला जागा करून दिली. त्यांचा एकंदर रुबाब व व्यक्तिमत्वच असें होतें की कोणालाही त्यांच्याविरुद्ध ब्र काढण्याची छाती झाली नाही.

"अहो, प्रवासांत असा मवाळपणा उपयोगी नाही. धडाडीची वृत्ति पाहिजे. त्याशिवाय आजच्या प्रवासांत माणूस धडपणें निभावणें अशक्य." ते हंसत म्हणाले.

त्यांचें म्हणणें मला पूर्णपणें पटलें होतें! आणि ती धडाडी माझ्यांत नाही याची जाणीवही मला होती, पण हें कबूल कशाला करा म्हणून एकदम विषयाला बगल देत मीं म्हटलें "आपण कुठें नगरला चालला वाटतं?"

—आणि नंतर मग आमच्या गप्पांना तोंड फुटलें. बोलतांबोलतां ओघांत त्यांनीं स्वत:संबधीं जी माहिती सांगितली ती खरोखरच विस्मयजनक होती. दहा वर्षांपूर्वी तीस रुपयावर कारकुनी करणारा प्राणी आज दोनशें रुपये दरमहा भाडें येणाऱ्या दोन इमारतींचा मालक व तीन–चार उद्योगधंद्याचा प्रमुख होऊं शकतो हें खरोखरच आश्चर्यकारक होतें. त्यांच्या दहा वर्षांच्या झगड्याची हकीगत खरोखर कादंबरीपेक्षा अद्भुतरम्य होती. दहा वर्षांपूर्वी ते साधे मॅट्रिक व दरमहा तीस रुपये पगारावर खर्डेघाशी करणारे कारकून होते. योगायोगानें त्यांची व मुंबईतील एका विख्यात शू–मेकरची गांठ पडली व कुणाच्याही निंदेला किंवा विरोधाला न जुमा-

नतां नोकरी सोडून चप्पल बूट करण्याचा धंदा शिकण्यासाठी ते त्या शूमेकर बरोबर मुंबईला आले. तीन वर्षे तो धंदा आत्मसात् करण्यासाठी ते धडपडत होते. आणि आपणाला थोडेंफार यश येईल अशी खात्री होतांच त्यांनीं चप्पलबुटाचें दुकान उघडलें. ब्राह्मण असून चांभाराचा नगरमध्यें धंदा करीत असल्याबद्दल प्रथम लोकांनीं त्यांची फार निंदा केली. त्यांच्यावर टीकेची झोड उठवली. क्वचित् कांहीं जणांनीं त्यांना वाळींतही टाकलें; पण त्या सर्वांना तोंड देऊन त्यांनीं घरोघर जाऊन स्वतः आपल्या मालाची खात्री लोकाना पटवून दिली व लोकांचा विश्वास संपादन करून गिऱ्हाईक मिळविलें. या दहा वर्षांत त्यांनीं चार निरनिराळ्या गांवांत आपल्या दुकानांच्या शाखा काढल्या होत्या. तीस ते चाळीस लोक प्रत्येक शाखेत काम करीत होते. याशिवाय मिलिटरीला बूट पुरविण्याचें कॉंट्रॅक्ट त्यांनीं मिळविलें होतें तें निराळेंच!

ठराविक चाकोरींतून जाणाऱ्या जीवनापेक्षां किती निराळें होतें त्यांचें जीवन! जीवनांत यशस्वी होण्यासाठी लागणारी धडाडी व परिश्रम घेण्याची तयारी या दोन गुणांमुळे माणूस किती वर जाऊ शकतो याचें ती व्यक्ति म्हणजे एक उदाहरणच होतें. याशिवाय त्यांचें वाचन व राजकारणाचा अभ्यासही फार चांगला होता. आमच्या गप्पांत निरनिराळे जे विषय येत त्यांवर ज्या सहजतेनें ते गप्पा मारीत, त्यांत त्यांचे त्या त्या विषयावरील ज्ञान सहज दिसून येत असे. मला त्यांच्याविषयीं अतिशय आदर वाटूं लागला.

दौंडला उतरतांना ते म्हणाले, “ हें पहा पांडितराव, तुम्ही माझं एक ऐका! तुमची मवाळवृत्ति सोडून द्या. आयुष्यांत काय किंवा गाडीच्या डब्यांत काय, धडाडीनें पुढें घुसल्याशिवाय चांगली जागा मिळत नाही हें लक्षांत ठेवा. गरिबीनें मागें मागें राहलांत तर केवळ लोकांच्या लाथा खाल. मला तुम्हाला उपदेश करायचा अधिकार नाही वास्तविक, पण

ज्ञानानें नसलों तरी अनुभवानें मी तुमच्यापेक्षां वडील आहें. तेव्हां माझा उपदेश ऐका–अन्याय सहन करून अधिक मवाळवृत्ति दाखवली तर तुमच्यावर अधिक अन्याय होईल हें लक्षांत ठेवा. जग गरिबीनें वागणाऱ्यांचें नाहीं–बेरड वृत्तीच्या, धडाडी अंगीं असलेल्या लोकांचें तें आहे. तेव्हां–" पण इतक्यांत त्यांच्या एका मित्रानें हांक मारल्यानें त्यांचें व्याख्यानवजा भाषण मध्येंच थांबलें व ' ठीक आहे, जातों मी ! नगरला आलांत तर या आमच्याकडे ' असें म्हणत ते निघून गेले.

त्या व्यक्तीची व माझी नंतर परत भेट नाहीं–पण त्यांचा उपदेश मात्र मीं मनावर कोरून ठेवला आहे.

प्रवासांत ओळख झालेल्या अशा किती तरी व्यक्ति अद्याप माझ्या डोळ्यासमोर येतात. राजकारणापासून तें अगदीं क्षुल्लक गोष्टीपर्यंत कोणत्याही विषयावर वादविवाद करण्यास तयारी असलेल्या वावदूक व्यक्तीपासून ते खेडेगांवांत सासरीं आपल्या मुलीच्या होणाऱ्या छळाचें वर्णन करणाऱ्या एका म्हातारीपर्यंत अनेक निरनिराळे चेहेरे माझ्या डोळ्यासमोरून जात आहेत. प्रत्येक व्यक्तीनें मला व मीहि प्रत्येक व्यक्तीला ओळख कायम ठेवण्याबद्दल मोठ्या जिव्हाळ्यानें विनंति केली असेल–पण आज त्या व्यक्ति कुठें आहेत याचा मला पत्ता नाहीं व मी कुठें आहे याचा त्या व्यक्तींनाही पत्ता नसेल. किंबहुना ' कुंदगोळ ' हें नांव ज्याप्रमाणें मी पार विसरून गेलों होतों त्याचप्रमाणे माझेंही नांव या व्यक्तींनी विस्मृतीच्या अडगळींत टाकून दिलें असेल याबद्दल मला कांहीच शंका वाटत नाहीं.

तरी पण त्या त्या ठिकाणावरून प्रवास करतांना अद्याप त्या त्या ठिकाणाशीं निगडित असलेल्या व्यक्तींची आठवण होते व कांहीं काळ मन त्या पूर्वींच्या आठवणींत पार रमून जातें. क्षणभर आपण त्या व्यक्तींच्या सान्निध्यांत आहोंत असा भास होतो व मनाला विलक्षण समाधान वाटतें.

आज प्रवास म्हणजे एक विलक्षण अशी शिक्षाच झाली आहे. ‘आवश्यक असेल तरच प्रवास करा’, ‘हलका प्रवास करा’ इत्यादि पाट्या वाचत सामानाचे भारे डोक्यावर घेऊन गाडींत चेंगराचेंगरी करणारे व मधाच्या पोळ्याला मधमाशा लटकाव्यात तसे गाडीला लटकणारे हजारो प्रवासी पाहिले तर क्षणभर ‘नको हा प्रवास’ असें वाटण्याइतका प्रवास भयंकर झाला आहे.

—तरी पण वरील सुखाचे क्षण मिळविण्यासाठी तरी या नरकतुल्य यातनांचाही कांही काळ अनुभव घ्यावा असें कुणाला वाटणार नाही ?

# इस्पितळाबाहेरील वेडे !

अगदी प्रथमच वेड्याच्या इस्पितळांत (प्रेक्षक म्हणून) आम्ही प्रवेश करीत होतों. आतापर्यंत सड्यावरून खाली जातांना डाव्या हाताला असलेली ती भव्य इमारत पाहून आम्हांला केवढेंतरी कुतूहल वाटत असे! त्या भव्य प्रवेशद्वाराच्या आड दडलेल्या विश्वाचें स्वरूप कसें असेल या विषयीची आमची जिज्ञासा पुरी करण्याची संधि अखेर आम्हाला मिळाली आणि इस्पितळाच्या प्रमुख डॉक्टरांबरोबर आम्ही आंत प्रवेश केला.

इस्पितळाच्या आंतील सारें नवीन वातावरण पाहून क्षणभर आम्ही गोंधळून गेलों. पांढरी चड्डी, पांढरा सद्रा व डोक्यावर पांढरी टोपी घातलेले कितीतरी वेडे इकडे तिकडे फिरत होते. कुणी बागेला पाणी घालण्याचें काम करीत होते, कुणी माग चालवीत होते, कुणी आपल्या स्वतःशी कांहीतरी पुटपुटत इकडे तिकडे हिंडत होते, तर कुणी गाण्याची स्वैर लकेर घेत होते.

डॉक्टरांनीं आम्हांला निरनिराळ्या रोग्यांचा परिचय करून दिला. कितीतरी प्रकारचे वेडे होते त्या समूहांत! आणि प्रत्येकाचें वेड निराळें होतें. तेवढा त्यांचा वेडाचा भाग सोडला तर एरवीं ते सामान्य माणसा-प्रमाणे वागत. पण तो वेडाचा मुद्दा आला म्हणजे मात्र ते कुणालाच ऐकत नसत. आपण शहाणे असून इतर सर्व लोक वेडे आहेत असें समजण्याची त्यांची प्रवृत्ति असे.

त्यांतील एक वेडा आपणाला अमरावतीचा राजा समजत असे, तर दुसरा एक वेडा कुदळ घेऊन सारखा खणत होता. थोडें खणून झालें की तो थांबे, खणलेल्या ठिकाणची माती हातानें बाजूला करून पाही अन् मग मान हालवून पुन्हां दुसऱ्या ठिकाणीं खणायला सुरवात

करी. डॉक्टरांनीं त्याच्याजवळ जाऊन त्याला विचारलें, “ काय गणोबा, सापडला का द्रव्याचा हंडा ? ” त्यावर त्या वेड्यानें नुसती मान हालवली आणि पुन्हां आमच्याकडे लक्ष न देतां गुप्त धन मिळविण्यासाठीं खणायला सुरवात केली.

तिसऱ्या एका वेड्याला देशांतील निरनिराळया पुढाऱ्यांना पत्रें पाठवून स्वराज्यप्राप्तीसाठीं नाना तऱ्हेचे उपाय सुचविण्याचें वेड होतें. पण त्याहीपेक्षा एका बाईचें वेड अगदी करुणाजनक होतें. ती बाई निपुत्रिक होती आणि म्हणून तिला नवऱ्यानें टाकलें होतें; तेव्हांपासून तिला वेड लागलें. आणि त्या वेडाच्या लहरींत ती असली की तिला आपणाला चार-पांच मुलें आहेत असा भास व्हायचा. मधूनच बाळंतपणाच्या वेदना आपणाला होत आहेत असा तिला भास होत असे. अशा वेळीं सुइणीला आणण्यासाठीं आरडाओरड करीत ती सर्व वॉर्ड दणाणून सोडी !

त्याच वेळीं दुसरी एक तरुण आणि मोठ्या कुळांतली दिसणारी तरुणी आमच्याजवळ येऊन आम्हांला विचारूं लागली, “ तुम्ही बर्माहून आलां ना हो ? मग माझा सुरेश पाहिलांत कां कुठं ? ” आम्ही ‘नाही’ म्हणून सांगतांच तिनें एकदम भीषण हास्य केलें व “सुरेश ऽ, ऽ सुरेश ऽ ” अशी हाक मारीत ती दुसऱ्या दिशेला निघून गेली. तिची हकीकत अशीच दुःखपूर्ण होती. तिचें सुरेश नांवाच्या एका तरुणाशीं लग्न ठरलें होतें. दोघांचेंहि परस्परांवर अत्यंत प्रेम होतें; पण रंगूनच्या बॉंब–हल्लयांत सुरेश कामाला आला आणि ही बातमी हिला कळताच त्या धक्कयानें ती वेडी झाली ! तेव्हांपासून प्रत्येक इसमाला ती ‘सुरेश’विषयीं बातमी विचारीत होती.

बाहेरच्या वॉर्डांत एक प्रेमभंग झालेला तरुण होता. त्यानें आम्हांला ‘स्त्रिया या निमकहराम असतात’ या विषयावर व्याख्यानच द्यायला सुरवात केली. त्याच्या शेजारच्या खोलींत एक वेडा मुक्त कंठानें गात

होता. आम्हांला पाहतांच तो एकदम बाहेर आला व त्यानें डॉक्टरांना विचारलें, "हेच का ते नवे डायरेक्टर? बोला मग नव्या चित्रपटाच्या शूटिंगला सुरवात केव्हां करतां ती!" या माणसाला आपण फार मोठे नट आहोंत असें वाटत होतें; त्यामुळे वेडाच्या लहरींत असताना बोलपटा-शिवाय तो दुसरें कांहीच बोलत नसे.

अशा प्रकारें कितीतरी वेड्यांच्या लहरी आम्हीं पाहिल्या. 'केवळ आपल्याच वेडांत गुंग होऊन जगाकडे पाहून हसणारा बेडर प्राणी म्हण-जेच वेडा' असा विचार या वेडांचे सारे प्रकार पाहून आमच्या मनांत आल्यावांचून राहिला नाही.

आम्ही इस्पितळ पाहून डॉक्टरांचे आभार मानून निघणार होतों इतक्यांत जवळच एक वेडा झाडाला पाणी घालताना दिसला. त्याला पाहतांच माझ्या मित्रानें सहज विचारलें, "या वेड्याला कोणतं वेड लागलं आहे?"

हें वाक्य त्या वेडयानें ऐकलें मात्र—हातांतील झारी जमिनीवर टाकून डोळे फिरवीत तो आमच्या रोखानें झाला आणि ओरडला, "कोण वेडे? आम्ही? तुम्हीच—तुम्ही सर्वजण वेडे आहांत!"

इस्पितळाकडून मीं घरीं परत आलों; पण माझ्या मनांतून त्या वेडयानें उच्चारलेलें तें वाक्य जाईना! जगांत सारे लोक वेडे नसतील कदाचित्, पण या वेडयाप्रमाणेच एकच एक गोष्टीचें वेड लागलेले कितीतरी लोक बाहेर सांपडतील! फरक एवढाच, की त्याच्या मनाचा तोल अद्याप इतकासा सुटलेला नसतो, तर या वेड्यांच्या मनाचा व विचार-शक्तीचा तोल अगदींच सुटलेला असतो. एरवीं असें एकाच गोष्टीचें वेड असणारे लोक म्हणजे इस्पितळाबाहेरील वेडेच नाहीत तर काय?

जीवनाच्या निरनिराळ्या क्षेत्रांत आपण जर दृष्टी फिरविली तर असे कितीतरी वेडे आपणास दिसतील. त्यांचे सारे विचार, सारें संभाषण, सारे

उद्योग त्या एका वेडाच्या पूर्तीसाठींच असतात. त्यामुळे कित्येक वेळां ते लोकांच्या उपहासाचा विषय बनतात, पण त्याची त्यांना पर्वा नसते. त्या नादापुढें त्यांना नेहमीचे व्यवहार सुचत नाहीत—नोकरीधंद्याकडे पुरेसें लक्ष द्यायला फुरसत मिळत नाही.

माझ्या एका दूरच्या नातेवाइकाचें वेड असेंच होतें. आहारा-विषयीं हा मनुष्य अतिशय चिकित्सक! त्यांतल्यात्यांत जीवनसत्वाचें त्याला अतिशय वेड. आपण कोणताहि पदार्थ खातों तो जीवनसत्वांनीं युक्त आहे कीं नाही हें प्रथम प्रत्येकानें अवश्य पाहिलें पाहिजे; पोटाला अपाय-कारक पदार्थ कोणते, जीवनसत्वाचें जीवनांत महत्त्व काय, इत्यादि साऱ्या विषयावर तो तासन् तास बोलत बसे आणि त्यांतील प्रत्येक गोष्ट आपल्या व आपल्या कुटुंबांतील माणसाच्या जीवनांत आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न करी. हे गृहस्थ एकदा आमच्या जेवणाच्या वेळीं आमच्या घरीं आले. त्या दिवशीं कांद्याचीं भजीं आणि मसाल्याचा भात असा दुहेरी बेत होता आमच्या-कडे. मी जेवायला बसलों होतों, म्हणून त्यांना आंतच गप्पा मारण्यास बोलवलें. आणि तो जेवणाचा बेत पाहून ते असें कांही उखडले म्हणतां!

"असले पदार्थ खातां तुम्ही पंडीतराव?" ते म्हणाले, "काय भयंकर विष पचवतां आहांत तुम्ही! अहो हीं तेलानें थबथबलेलीं भजीं, हा मसाल्यानं बरबटलेला भात, हे असले पदार्थ खाऊन स्वतःचं आयुष्य कमी करून घेतां आहांत तुम्ही! अहो, एक तरी व्हिटॅमिनयुक्त असा पदार्थ आहे का तुमच्या पानांत?" एक ना दोन! मग जीवनसत्वाविषयीं माहिती व आमच्या मसालेदार जेवणावरील निंदा आम्हांला ऐकावीच लागली!

कांही लोकांना याच्या उलट आहाराचें वेड असलेलें मला माहीत आहे. त्यांना आपल्या आहारांत सर्व गोष्टी परिपूर्ण लागतात. कशांत कांही न्यूनता असलेली त्यांना बिलकूल खपत नाही. माझ्या माहितीच्या एका गृहस्थानें आमटींत गूळ कमी झाला म्हणून आमटीची वाटी रागानें

भिकांबून दिल्याचें मला माहीत आहे. अशा गृहस्थांना खाण्याचेंच वेड असतें आणि त्यांची लहर संभाळण्यासाठीं घरांतील बायकामंडळींना बिचाऱ्या कोण आटापीटा करावा लागतो!

माझ्या माहितीच्या दुसऱ्या एका गृहस्थाला देशी औषधाचेंच वेड होतें. वास्तविक तो वैद्य नव्हता की डॉक्टरहि नव्हता. पण त्यानें काढे, चूर्णे, भुकट्या, चाटणें, इत्यादि संबंधीं इतकी माहिती निरनिराळे वैद्यकीय ग्रंथ वाचून मिळवली होती आणि काढे चूर्ण वगैरे करण्याची सामुग्री इतक्या मोठ्या प्रमाणांत जमवली होती, की तें एक त्याच्या बाबतींत वेडच झालें होतें! आणि आपल्या या सर्व ज्ञानाचा प्रयोग तो घरांतील लहानांपासून थोरापर्यंत सर्व मंडळींवर करीत असे. त्याच्या घरीं सकाळीं कोणी चहा घेत नसे, तर कोणत्यातरी द्रव्याचा काढा लहानांपासून थोरापर्यंत सर्वांना घ्यावा लागे. "सुदृढ होण्यासाठीं माणसानें नियमितपणें हे काढे व चूर्णें घेतलीं पाहिजेत, तरच तरुण पिढीचा तरणोपाय आहे" असें त्यांचें आवडतें मत होतें.

त्यांच्या व्यक्तिगत वेडामुळे घरांतील सर्व मंडळींना ते काढे-निकाढे अगदी मनाविरुद्ध प्राशन करावे लागत! त्यामुळे ती सर्व मंडळी एकंदर आयुर्वेदावरच अतिशय चिडली होती! इतके काढेनिकाढे पिऊनहि घरांत आरोग्य नांदत असेल तर शपथ! दररोज एकादोघांची कुरकूर चालू असेच; पण ती शक्य तों त्या गृहस्थाच्या कानापर्यंत न जाण्याची काळजी मात्र ते सर्वजण घेत! कारण अशा आजाराची बातमी त्यांना समजली की लागलीच त्यांच्या औषधाचे नवेनवे प्रयोग सुरू होत; मग मात्र आजारी माणसाला जीव नकोसा होई!

भविष्याच्या वेडानें पछाडलेले पुष्कळ लोक मला माहीत आहेत. निरनिराळ्या लोकांचे हात व पत्रिका पाहणें, त्यावर ग्रहगणित बसविणें, भविष्याचे ठोकताळे करणें हाच मुळी त्यांचा उद्योग. आणि असे दोन

लोक एकत्र आले की मग विचारूंच नका. माझ्या मित्राच्या मेहुण्याला हस्तसामुद्रिकाचें खूप वेड होतें. सहज माझ्या मित्राबरोबर तो घरीं आला. मामुली संभाषण झाल्यावर त्यानें मला एकदम म्हटलें, "जरा हात पाहूं तुमचा!" आणि माझ्या संमतीची वाट न पाहतां माझा हात त्यांनीं हातांत घेतला, तो वाकडातिकडा केला, बोटें पाहिलीं अन् तळहातावरील रेषाहि पाहावयास सुरुवात केली. आणि झटकन् मला त्यानें विचारलें, "तुमची आई जिवंत आहे, खरं ना?"

दुर्दैवानें त्याला नकार देणें मला भाग होतें. तो पुन्हा माझा हात न्याहाळून पाहात म्हणाला, "मातृवियोग? छे छे! तुमच्या हातांत स्पष्टपणें मातृसौख्य आहे. मग असं कसं होईल?...बरं पण वडील तरी?"

"हो! सुदैवानें ते जिवंत आहेत!" मीं म्हटलें.

"बरोबर! ह्या टाळी! अहो मातृस्थानीं पिता—काय समजलं?" मी समजलें नसतांहि नंदीबैलासारखी मान हालवली!

हस्तसामुद्रिकाचें किंवा भविष्याचें वेड असलेलीं माणसें तुम्हांला हात तरी पाहायला मागतील किंवा तुमची पत्रिका तरी मागतील. एकदा तुमचा हात किंवा पत्रिका त्यांच्या ताब्यांत गेली की तुमचें भूतभविष्य त्यांच्या ताब्यांत गेलें असें खुशाल समजावें!

अशा भविष्य-जाणत्या वेड्यांबरोबर भविष्यावर विश्वास ठेवणाऱ्या वेड्यांचें पीकहि कांहीं कमी नसतें. तसें नसतें तर आज केवळ भविष्याच्या जोरावर जीं साप्ताहिकें नियमित चाललीं आहेत तीं चाललींच नसतीं! माझा एक मित्र तर आपल्या राशीचें दररोज भविष्य वाचल्यावाचून घराबाहेर पाऊल टाकत नाही. ज्या दिवशीं 'खर्च जास्त होईल' असें भविष्य असतें, त्या वेळीं तो सगळे पैसे घरीं ठेऊनच बाहेर पडतो. 'अपघातापासून धोका' असें त्याच्या भविष्यांत लिहिलेलें असेल तर तो त्या दिवशीं शक्य तों बाहेरच पडणार नाही! अर्थात् या त्याच्या प्रयत्नांमुळे त्याच्या राशीचीं

एकूण एक भविष्यें आतापर्यंत खोटीं ठरलीं आहेत. आणि तरीहि भविष्या-वरील त्याचा विश्वास अद्याप कमी होत नाही!

माणसाला आणखी कितीतरी गोष्टींनीं वेडें केलेले असतें. कुणाला पैशाचें वेड असतें; त्यांना पैसा म्हणजे परब्रह्म वाटत असतो! पैसा जमविणें, त्याच्याकडे नुसतें पाहून आनंद मानणें व त्यांत भर घालण्याचें निरनिराळे उपाय शोधून काढणें हेंच त्यांचें जीवितकार्य! दुसऱ्या कुणाला कीर्तीचें वेड असतें. आपणाला कोणत्या ना कोणत्या कारणानें प्रसिद्धि मिळावी अशी या लोकांची उत्कट इच्छा असते व त्याकरितां प्रसंगीं वाटेल त्या मार्गाचा अवलंब करावयाची त्यांची तयारी असते. आपलें नांव सतत वर्तमानपत्रांत झळकावें, आपल्या कार्याचा सगळीकडे गवगवा व्हावा यासाठीं त्यांची सदैव धडपड सुरू असते. असे लोक प्रसिद्धीची एकहि संधि वाया घालवतील नाहीत. ठिकठिकाणचीं व्याख्यानाचीं निमंत्रणें ते मिळवतील व त्याचा रिपोर्ट स्वतःच लिहून निरनिराळया वृत्तपत्रांकडे ते पाठवतील. गांवांत कुठेंहि सभा असली तरी तेथें हटकून हजर राहून उपवक्ते म्हणून का होईना, पण भाषण करतील. मोठमोठे पुढारी वगैरे गांवांत आले म्हणजे अनाहूतपणें त्यांच्या भेटीला जातील. सारांश '–तेवढेंच ज्ञानप्रकाशांत–' येण्यासाठीं जें जें कांही शक्य आहे तें तें करतील. अर्थात् प्रसिद्धीची हौस बहुतेकांना असते; पण ज्या प्रकारांनीं हे लोक प्रसिद्धीच्या मागें हात धुऊन लागतात, ते प्रकार पाहिले म्हणजे प्रसिद्धी हेंच त्यांचें जीवनाचें एकमेव ध्येय असावेंसें वाटूं लागतें!

नाटकें, बोलपट, खेळ इत्यादि करमणुकीच्या साधनांनीं कित्येक माणसांना वेडें केलेलें असतें. कै. श्री. कृ. कोल्हटकरांनीं 'आपले बैठे खेळ' यांत म्हटल्याप्रमाणे "फुरसतीच्या वेळीं खेळलेले खेळ खेळणारांवर लवकरच अस्मानी सुलतानी गाजवायला लागून मनुष्याला आपलें खेळणें करून सोडतात!" त्यांतील सुदामा, पांडुतात्या, बंडुनाना यांनीं बुद्धिबळें,

सोंगट्या, पत्ते इत्यादींच्या वेडांत केलेल्या मूर्खपणाच्या गोष्टी अतिशयोक्ति पूर्ण वाटण्याचें कांहीच कारण नाही. शनिवारीं संध्याकाळीं ब्रिज खेळावयास सुरवात करून सोमवारीं ऑफिसच्या वेळेपर्यंत जेवणाखाणाकडेहि लक्ष न देता सतत खेळणारे कितीतरी लोक मीं पाहिले आहेत.

खेळांप्रमाणेच बोलपटाचें वेडहि कितीतरी तरुणतरुणींना लागलेलें असतें. त्यांच्याशी तुम्ही केव्हांहि भाषण करूं लागलांत तरी त्यांच्या भाषणाचा ओघ बोलपटाकडेच वळावयाचा. अमक्या बोलपटांत दिग्दर्शन किती भिकार झालें आहे, तमक्या बोलपटांत अमक्याअमक्या नटीनें किती उत्कृष्ट काम केलें आहे, त्या बोलपटांत संगीत किती छान आहे अन् या बोलपटांत भिकार गोष्ट असूनहि दिग्दर्शकाच्या कौशल्यामुळे बोलपट कसा उत्कृष्ट वटला आहे, या किंवा अशासारख्या विषयावर तासन् तास बोलणें सुरू असतें. केवळ बोलण्यांतच नव्हे, तर वागणुकींतहि त्यांच्यावर बोलपटाचा परिणाम केवढातरी झालेला दिसतो. पडद्यावरील लोकप्रिय झालेल्या नटाची वा नटीची भाषणपद्धति, वेषभूषा, आविर्भाव इत्यादींचें अनुकरण कितीतरी तरुण वा तरुणी करीत असताना आपणांला दिसतात. अशा तरुणतरुणींच्या वांट्याला नंतर जर व्यवहारी रुक्ष जीवन आलें, तर त्यांच्या कल्पनेचे सारे मनोरे ढासळून पडून त्यांना निराशेचा आत्यंतिक धक्का बसत असेल यांत शंका नाही.

वाङ्मय प्रांतांतदेखील असे कांही कांही वेडे धुमाकूळ घालतांना आपणांला आढळतात. कांही लोकांना वाङ्मयांतील अश्लील भाग हुडकून काढून वेळींअवेळीं त्याचा निषेध करण्याचें वेड असतें. अश्लील वाङ्मय म्हणजे आपल्या नीतिमत्तेवर मोठा हल्लाच, असें त्यांना प्रामाणिकपणें वाटतें आणि तो परतविण्यासाठी ते कंबर कसून सज्ज असतात! कांहीजणांना पुरोगामी वाङ्मय हवें असतें, पण पुरोगामी व प्रतिगामी यांचा निकष त्यांना नक्की न ठरवितां आल्यानें केवळ ‘पुरोगामित्वा’ची गर्जना करण्यांतच ते समाधान मानत असतात. कांहीजणांना वाङ्मयांत बोधवाद

हवा असतो व वाङमय हें एक प्रचाराचें साधन आहे असें ते जोरजोरांत प्रतिपादन करीत असतात; तर कांही लोकांना वाङमयानें केवळ आनंद देण्याचें कार्य केलें पाहिजे असें वाटत असतें.

प्रेमवेड्यांच्या वेडासंबधीं तर कांही सांगावयासच नको. 'प्रेमवेडा' या विशेषणावरून त्यांचे 'वेड' जगजाहीर होतें. त्यांना आपल्या प्रेमविषयाखेरीज दुसरं कांहीहि सुचत नसतें. त्यांना खरोखरच्या वेड्याप्रमाणे इतर जगाच्या टीकेची पर्वा नसते, स्तुतीची अपेक्षा नसते, व्यवहाराची ओळख नसते! एका व्यक्तींतच सारें जग सामावल्यासारखें वाटतें त्यांना! आपल्या प्रेमपूर्तीच्या मार्गात व्यावहारिक, धार्मिक, आर्थिक अडचणी आहेत किंवा नाहीत याचाहि तो कधीं विचार करीत नाही. आणि याचा परिणाम म्हणजे प्रेमभंगाचा धक्का बसतो आणि तो बसला म्हणजे तो कधींकधीं पूर्ण वेडा होतो!

प्रेमभंगाच्या गंभीर घटना सोडून दिल्या तरी प्रेमानें वेड्या झालेल्या माणसाच्या हातून कितीतरी वेड्यासारखे आचार होतात व तो स्वत:ला हास्यास्पद करून घेत असतो. प्रियतमेच्या एका दृष्टिकटाक्षासाठीं तासन्‌तास तिच्या मार्गात थांबणें, तिच्या आवडी निवडी वगैरेची पूर्ण माहिती काढून त्याप्रमाणे आपल्या आवडीनिवडी व सवयी बनविणें, तिच्याशीं एक शब्द तरी बोलावयास मिळण्याच्या संधीची तासन्‌तास वाट पाहणें, तिच्या राहत्या घरावरून उगीच इकडून तिकडे व तिकडून इकडे अशा चकरा मारणें अशा एक ना दोन, कितीतरी कृतींनीं तो आपलें 'वेड' प्रगट करीत असतो!

हेच काय, पण असे कितीतरी वेडे जीवनाच्या निरनिराळ्या क्षेत्रांत संचार करीत असतांना आपणाला दिसतील. मात्र आपण उघड्या दृष्टीनें सगळीकडे वावरलें पाहिजे. फार लांब कशाला? आपण आत्मपरीक्षण जर नि:पक्षपातीपणानें करूं लागलों, तर आपणालासुद्धा कसलें तरी वेड असल्याची जाणीव आपणाला होईल; अर्थात् तें वेड वर वर्णन केलेल्या

लोकांच्या वेडा इतकें प्रबळ नसेल कदाचित्, पण माणसाला कसलें ना कसलें तरी वेड असतें हें निश्चित!

अर्थात् सारासार विचार सोडून माणसानें आपलें सारें बुद्धिसामर्थ्य आपल्या एका वेडाकडेच वळविलें तर इस्पितळांतील वेड्यांना हसण्याचा त्यांला काय अधिकार आहे? त्या वेड्यांना जसा एकच एक गोष्टीचा ध्यास लागलेला असतो, त्याचप्रमाण त्यांनाहि एकाच विशिष्ट गोष्टीचा ध्यास लागलेला नसतो का? त्या वेड्यांच्या वेडाविरुद्ध थोडे जरी तुम्ही गेलांत, तर ज्याप्रमाणे ते संतापतात व वाटेल तें बडबडू लागतात, तशीच थोडीफार स्थिति या व्यक्तींच्या वेडाविरुद्ध तुम्ही थोडे जरी गेलांत तर त्यांची होत नाही का? वेडाची बाब सोडून दिल्यास इस्पितळांतले वेड एरवी अगदी सामान्य माणसाप्रमाणे वागतात, इतर गोष्टींची त्यांना फारशी पर्वाच नसते; जणू कांही इतर जग त्यांच्या दृष्टीने अस्तित्वांतच नसतें. या लोकांची बहुतांशीं तीच स्थिति असतें असें म्हटलें तर फारसें चुकणार नाही. त्यांचें विशिष्ट गोष्टीविषयींचें वेड वर्ज्य केल्यास त्यांना तरी इतर जीवनांतील गोष्टीबद्दल कुठें आकर्षण वाटतें? आणि आपणांपासून इतरांना त्रास होतो ही जशी वेड्यांना जाणीव नसतें, तशी आपल्या वेडापासून इतरांना किती त्रास होतो याची जाणीव यांना तरी कुठें असते? या वेड्यांत फरक एवढाच, की इस्पितळांत वेड्यांच्या मस्तकांतील मेंदु अचानक धक्का बसल्यानें बधिर झालेला असतो आणि त्यामुळे त्यांची विचारशक्ति नाहीशी झालेली असते; या बाहेरच्या वेड्यांची विचारशक्ति अद्याप कायम असते, आणि म्हणून तर ते इस्पितळाबाहेर मोकळे हिंडत असतात!

एरवी त्यांना ‘इस्पितळाबाहेरील वेडे’ अशी संज्ञा दिली तर चुकेल का?

---

# संसारांतील रम्य झरे

माझा एक मित्र नेहमीं भांडणाला तिखटमिटाची उपमा देत असतो. त्याचें म्हणणें असें कीं तिखटमिठाशिवाय जेवणाला जशी लज्जत येत नाही, त्याप्रमाणे भांडणाशिवाय जीवनांत मुळीच स्वास्थ्य येत नाही. भाडणाशिवाय जीवन हें तिखटमिटाशिवाय केलेल्या स्वयपाका-प्रमाणे आळणी असतें असें तो जोरजोरांत प्रतिपादन करीत असतो.

आत्तांपर्यंत मला त्याचें हें विधान फारसें पटलें नव्हतें. तसं म्हटलं, तर लग्न झाल्यापासून आजपर्यन्त आम्ही एकसारखे भांडत आलों आहोंत. बोलपटासारख्या क्षुल्लक गोष्टीपासून तें पातळाच्या पसंतीसारख्या गंभीर घटनेपर्यंत अशी एकहि मतभेदाची संधि नव्हती कीं जी आम्ही भांडणां-शिवाय फुकट दवडली होती. 'फिरायला पांचला निघायचें कीं साडे-पांचला निघायचें' चहासाठीं शेगडी पेटवायची का स्टोह पेटवायचा' 'फिरायला जातांना तिनें गोल पातळ नेसायचें का नऊवारी नेसायचें अन् मीं निळा कोट घालायचा कीं पिवळा घालायचा', अशासारख्या क्षुल्लक विषयावर मतभेद उकरून काढून आम्ही आमची भांडणाची हौस यथेच्छ भागवून घेत असूं. आमच्या आळींत 'भांडखोर जोडपें' म्हणून थोडाफार आमचा (बद) लौकिकहि झाला आहे.

अशा स्थितींत 'भांडणानें जीवनाला खरी लज्जत येतें' हें माझ्या मित्राचें विधान, खरं म्हटलं म्हणजे, मला पटायला पाहिजे होतें. पण भांडणाला कंटाळल्यामुळे म्हणा किंवा सदोदित भांडण चालू असल्यानें त्याची खरी गोडी कांहीशी दृष्टिआड झाल्यामुळे म्हणा, केवळ एक चमत्कृतीपूर्ण उपमा यापलीकडे मीं माझ्या मित्राच्या विधानाकडे लक्ष दिलें नव्हतें. सदोदित मतभेद उकरून काढून तोंड वाजविण्यापेक्षां शांततेनं, एकोप्यानें व एक विचारानें राहून जीवनांतील आनंदाचा उपभोग घेण्यांत केवढी तरी गंमत असेल असं मला राहून राहून वाटायला लागलं होतं.

याप्रमाणे मतभेदाला थारा न देता चिमणीप्रमाणे किलबिल करीत सुखानें संसार करणारीं जोडपींसुद्धां मला आजूबाजूला दिसत. आपणच मतभेदाचे वारें डोक्यात भरवून कावळ्यासारखा कलकलाट कां करावा हें मला समजेनासें झालें होतें. आपणसुद्धां गुण्यागोविंदानें, एकमतानें, सुरळीतपणें ससाराचा गाडा हांकावा असा विचार मनांत येऊन माझी ती कल्पना मीं संसाररथाच्या दुसऱ्या चाकापुढें मांडली.

आणि त्यावरच आमचं भांडण झालं. 'आपण भांडतों' ही कल्पना मुळीं तिला पटत नव्हती. 'भांडण' या शब्दाला तिचा आक्षेप होता. 'वाद–तर्कट–शब्दाशब्दी' यासारख्या कोणत्याहि शब्दाचा स्वीकार करण्यास ती तयार होती. पण आमच्या नेहमींच्या होणाऱ्या वाग्युद्धाला भांडण म्हणण्याची मात्र तिची तयारी नव्हती. 'शब्दाशब्दानें वाद वाढविणे व अडेलतट्टूप्रमाणे आपलाच शब्द खरा करण्यासाठीं हटून बसणें यालाच भांडण म्हणतात' ही कल्पना पटवून द्यायला मला अगोदर बराच वेळ खर्च करावा लागला अन् नतर मीं माझी कल्पना तिच्यापुढें मांडली.

"हें पहा,–उद्यां आहे पाडवा." मी माझी कल्पना स्पष्ट करूं लागलों. "उद्यां आपण जसे वागूं तसें वर्षभर वागणार. उद्यां जर तूं माझ्याशीं भांडलीस तर वर्षभर तुला माझ्याशीं भांडावं लागेल. तेव्हां एकमेकाशीं न भांडण्याचा उद्याच्या शुभमुहूर्तावर निश्चय करूं या. काय?"

"माझा कांही विरोध नाही,–पण आपलं पहा बाई!" ती जरा हंसत म्हणाली, "फट्दिशीं कांही तरी बोलून जाल अन् मग भांडणाला सुरुवात होईल. नेहमीं आपणच तर भांडणाची ठिणगी उडवतां."

मला अर्थात तें नाकबूल होतें आणि त्या मुद्यावर आमचें थोडेंसें भांडण झाल्यावर माझा ठराव दोन विरुद्ध शून्य मतांनीं मंजूर झाला.

दुसरे दिवशीं मी सकाळीं उठलों तों मनामध्यें एक धास्ती घेऊनच. पटकन् चुकून आपण एकादा शब्द बोलायचा आणि आपला निश्चय आपणच मोडल्याचें खापर आपल्या कपाळीं फुटायचें. त्यामुळे प्रत्येक शब्द मी

मोजूनमापून बोलत होतों. तिचीहि कांही अंशीं तीच स्थिति झाली होती. त्यामुळे सकाळचा चहा कांहीशा शांततेंत पार पडला. वास्तविक आमचा सकाळचा चहा नेहमीं रंगायचा—पण आज 'चहा कसा झालाय?' 'सुंदर!' यापलीकडे शब्दांची फारशी देवघेव झाली नाही. नेहमीं दाढीला पंधरा—वीस मिनिटें लागायचीं. कारण दाढी करायच्या वेळीं कसला तरी वाद चालू असेच. पण आज तो वाद नसल्यानें दाढी पांच मिनिटांतच आटोपली. स्नान, हिंडणें, भोजन इत्यादि सर्व कार्यक्रम नेहमींप्रमाणे झाले. प्रथमप्रथम या शांत वातावरणाची नावीन्यामुळें गंमत वाटत होती. आपण एकादें विधान केलें कीं, तिनें हसून मान डोलवायची व तिनें एकादा प्रश्न केला कीं, मीं हास्यपूर्ण चेहेरा करून तिला अनुकूल उत्तर द्यायचं हें प्रथमप्रथम टीक होतं. पण आमच्या दोघांच्याही खट्याळ अन् वावदूक वृत्तीला तें पटण्यासारखं नव्हतं फार वेळ. संध्याकाळपर्यंतच आम्हाला इतका कंटाळा आला कीं, सांगायची सोय नाही. दोघांच्याहि तोंडाचे सारखे कोनाडे होत होते. शेवटीं जेवण झाल्यावर तर हें शांत वातावरण इतकं कंटाळवाणं झालं कीं, हा कंटाळा घालविण्यासाठीं कोणत्या तरी बोलपटाला जायचं आम्ही टरवलं.

"पर्वत पे अपना डेरा या बोलपटाला जाऊं या आपण." मी सुचविलें.

"इश्य! नको बाई तो बोलपट! त्यापेक्षां 'दासी'ला जाऊं या आपण!" ती म्हणाली, "पर्वत पे अपना डेरा इतका चांगला नाही म्हणे. माझी मैत्रीण परवांच जाऊन आली. एक अजस्र घंटा सारखी वाजत असते अन् एक दगड पर्वतावरून गडगडत खालीं येतो यापलीकडे त्यांत विशेष कांहीच नाही म्हणे."

"शहाणीच दिसते आहे तुझी मैत्रीण!" मीं म्हटलें, "सिनेमा तरी कळतो का तिला? केवढी उदात्त कल्पना आहे त्यांत, अन् म्हणे नुसता दगड गडगडत येतो. दगड दिसते आहे अगदीं ती!"

झालं! या वाक्यानें आत्तांपर्यंत मुष्किलीनें सांटवून ठेवलेल्या दारुगोळ्यावर बरोबर ठिणगी पडली अन् भडका उडाला.

त्या दिवशीं आम्ही कोणत्याच बोलपटाला गेलों नाही. मात्र कोणत्या बोलपटाला जायचं, कोणता बोलपट कसा आहे, तिच्या कोणत्या मैत्रिणीला किती अक्कल आहे, या विषयांवरच खूप भाडलों आम्ही. 'भांडण संपलं अन् आम्ही घड्याळाकडे पाहिलं! साडेदहा वाजले होते. आतां कोणत्याच बोलपटाला जाणें शक्य नाही या कल्पनेनें आम्ही दोघंहि जोरांत हंसलों.

आणि नाही तरी ज्याकरितां आम्ही बोलपट पहाणार होतों तो आमचा कंटाळा केव्हांच निघून गेला होता.

अन् तेव्हांपासून भांडणाच्या बाबतींत आम्हीं असे भलतेच संकल्प कधीं केले नाहीत. भांडणाला माझ्या मित्रानें दिलेली तिखटमिठाची उपमा किती यथार्थ आहे तेंहि मला पटलें.

पण माझ्या मित्रानें भांडणाला तिखटमिठाची दिलेली उपमा कितीहि यथार्थ वाटत असली तरी त्याहिपेक्षां भांडणाला मसाल्याची उपमा देणें मला जास्त आवडेल. भोजनांतील प्रत्येक पदार्थाला मसाल्यानें चव येते त्याप्रमाणे संसारांतील प्रत्येक घटनेला भांडणामुळे अधिक रम्यता येते हा अनुभव कुणाला नाही? किंबहुना या प्रेमकलहामुळेच प्रेमाचे धागे अधिक दृढ होतात असें म्हटलें तर फारशी अतिशयोक्ति होणार नाही. पतिपत्नीच्या जीवनांत तर प्रत्येक घटनेला या प्रेमकलहामुळेच गोडी येत असते. अपत्य-जन्मापूर्वी मुलगा होणार कीं मुलगी यावर कुणा पतिपत्नीचा कलह होत नाही? अपत्यलाभानंतरहि मुलाचें नांव ठेवताना होणारे प्रेमकलह कांही कमी नसतात. माहेरीं जाताना, कोणत्याहि नवीन गोष्टीची खरेदी करताना, कोणत्याहि गोष्टीची चर्चा करताना, कापड पसंत करताना आणि इतर किती तरी प्रसंगांनीं होणारे हे प्रेमकलह म्हणजे संसाराच्या मार्गांतील आनंदाचे झरेच नसतात का?

शिवाय दुसरं असं कीं, पतिपत्नींनीं प्रेमकलह न करता राहायचें ठरवलें तर दररोज ते बोलणार तरी कशावर ? बाजारहाट, खरेदी, भोजन व इतर गोष्टी यांवर मतभेद झाला नाही तर गप्पा मारूनमारून किती मारणार ? 'सिनेमा किती छान होता, नाही ?' या प्रश्नाला 'खरंच, सुरेख होता' हें उत्तर आलें तर बोलणें तिथेंच खुंटलें. पण 'छे ! मला बिलकूल नाही आवडला तो !' असं वादाकरितां कां होईना, पण खोटें विधान केलें कीं विवादाला लगेच सुरवात होते. मात्र खोट्या मतभेदाला खऱ्या मतभेदाचे वारें न लागण्याची काळजी पतिपत्नींनीं अवश्य घ्यायला हवी. भांडणाच्या प्रेमासाठीं भांडण करण्यात गंमत असते, पण तेंच द्वेष-बुद्धीनें, मत्सरबुद्धीनें भाडणाला सुरवात केली—त्यांत खऱ्या मतभेदाचे वारें शिरले—कीं सुखाची होळी होते हें त्यांनीं कधीहि विसरता कामा नये. संसारांत भांडणाचें महत्त्व एकाद्या खेळाप्रमाणे आहे. खेळांत विरुद्ध पक्षाचा पराजय करण्यास आपण झटत असतों. पण खेळ संपला कीं त्या वेळेपुरती घेतलेली चुरशीची वृत्तीहि विसरतों. भांडणाच्या वेळींहि ती भूमिका आपण ठेवली पाहिजे. ती भूमिका विसरली कीं, भांडणाचें पर्यवसान निराळेंच कांही तरी होतें.

मला या बाबतींत दोन जोडप्यांचीं उदाहरणं आठवतात. त्यापैकीं पहिलं जोडपं अगदीं शान्ततावादी होतं. भांडणाचं वारंसुद्धां कधीं त्यांच्या घरांत शिरलं नाही. आणि या गोष्टीचा त्या मित्राला मोठा अभिमान वाटे. तो मला नेहमीं म्हणे, "काय सारखे वसावसा भांडतां रे ! आमच्याकडे पहा. लग्न झाल्यापासून एकादांही भांडण झालं नाही आमचं !" अर्थात् माझं त्याच्या संसाराकडे लक्ष होतंच. दोघांचीहि वृत्ति इतकी मवाळ कीं एकाने एक शब्द तोंडाबाहेर काढला कीं दुसऱ्यानें त्याला नाही म्हणायचं नाही. त्यामुळे त्यांच्या संसारांत आलेली रुक्षता त्यांची त्यांनाच कळत नव्हती. घरांत कंटाळा येतो म्हणून त्याचा वेळ बाहेर मित्रमंडळींत जाई अन् तिचा वेळ शेजारणीशीं गप्पा मारण्यांत जाई. 'घरांत कंटाळा

येणें ' हेंच मुळीं संसारांतील रुक्षतेचें द्योतक नव्हे का ? त्याला मी कितीदां सांगितल, " तूं निदान भांडणाच्या गंमतीचा अनुभव घेण्यासाठीं तरी वहिनींशीं एकादें भांडण उकरून काढ. स्त्रिया रागावल्या म्हणजे किती सुंदर दिसतात, त्यांच्या डोळ्यांतून येणाऱ्या गंगायमुनांचा संगम किती मनोहर असतो याचा एकदां तरी अनुभव घे. " पण छे ! त्याला तें पटतच नाहीं. आणि त्यामुळे संसारांतील केवढ्या मोठ्या आनंदाला तो मुकला आहे.

माझ्या माहितींतील दुसऱ्या एका गृहस्थाची स्थिति अगदीं उलट आहे. तीं दोघंही पतिपत्नी सारखीं भांडत असतात. पण त्या भांडणांत खिलाडु वृत्ति बिलकूल नसते. उलट एक प्रकारचा कडवटपणा त्यांत भरलेला असतो. यानें तिचीं, तिच्या माहेरच्या माणसांचीं उणीं सारखीं बाहेर काढायचीं, कठोर शब्दांनीं वेळीं अवेळीं तिची निर्भत्सना करायची, व तिनें त्याला त्याच्या दारिद्र्याबद्दल सारखीं नांवं ठेवायचीं व नेहमीं टोंचून बोलायचें हें त्यांच्या भांडणाचें स्वरूप असतें. केव्हांहि त्यांच्याकडे जा ! कांहीं ना कांही तरी धुसफूस ही चाललेली असायची घरांत ! त्यामुळे त्याच्या कपाळाला नेहमीं आंठ्या व तिचा चेहेरा सदोदित दुर्मुखलेला. हीं अशा तऱ्हेचीं भांडणं खरंच तिखटासारखीं वाटतात. पण तें साधं तिखट नव्हे तर झणझणीत ! तोंडाला लावलं कीं डोळ्यांतून पाणी काढणारं ! अशा तिखटानं जेवणाची रुचि वाढण्याऐवजीं जेवणाचं पाणी मात्र व्हायचं !

तेव्हां हीं अशीं भांडणं संसारांत सुरू झालीं कीं संसाराचा केव्हांच सहारा व्हायचा ! म्हणून भांडणांतील रम्यता कायम ठेवायची असेल तर भांडणाऱ्या दोघांही व्यक्तींनीं आपली खिलाडु वृत्ति सदैव जागृत ठेवली पाहिजे. अन् अशा भांडणांत दुसरीहि गोष्ट कटाक्षानें पाळली पाहिजे. ती म्हणजे 'संयम.' भांडण ही लघुकथेप्रमाणे कला आहे. भांडण संपवावें

कुठें हें प्रत्येकानें लक्षांत घेतलें पाहिजे. लघुकथेच्या अखेरीप्रमाणे भांडणाच्या अखेरीलासुद्धां फार महत्त्व आहे. होतें काय कीं वादाच्या भरांत आपण दुसरी व्यक्ति किती चिडली आहे त्याच्याकडे लक्ष देत नाहीं. हा चिडखोरपणा कांही विशिष्ट मर्यादेपर्यंत ठीक असतो. पण ती मर्यादा ओलांडली कीं भांडणाचें पर्यवसान भलतेंच कांहीतरी होण्याचा संभव असतो. माझ्या एका मित्राचें असेंच झालें. विषयावरून विषय निघतां-निघतां त्यानें तिच्या माहेरच्या माणसाच्या लहरीपणावरून तिला चिडवायला सुरवात केली. पण चिडवताना माझ्या मित्राचा तोल सुटला. त्यानें तें चिडवणें इतक्या पराकोटीला नेलें कीं त्याची पत्नी संतापानें अगदीं लाल झाली—रागाच्या आवेशांत तिनें स्टोव्हवर ठेवलेलें चहाचें आधण मोरींत ओतून दिलें, स्टोव्ह बंद केला व रागानें गांवांतच असलेल्या आपल्या बहिणीकडे ती निघून गेली. आणि नंतर माझा मित्र शुद्धीवर आला. माझी मात्र मधल्या मध्यें मोठी केविलवाणी अवस्था झाली. मधें मधें त्याला डिंवचून शुद्धीवर आणण्याचा मी जों जों प्रयत्न करीं तों तों त्याला जास्तच जोर येई. त्यामुळे माझा तिथला चहा तर बुडालाच. पण संध्याकाळीं मला माझ्या मित्राला माझ्या घरीं जेवायला न्यावें लागलें. इतकेंच नव्हे तर वहिनींची समजूत घालून त्यांना परत आणण्याची कामगिरी मला आणि माझ्या पत्नीला करावी लागली.

पतिपत्नींच्या भांडणांत कित्येक वेळां आपलाच हेका चालविण्याच्या अट्टाहासामुळे कडवटपणा येतो. कांही कांही गोष्टी अगदीं क्षुल्लक असतात. पण त्या क्षुल्लक गोष्टींतहि आपलाच हेका खरा करावयाचा आग्रह दोघांनीं धरला तर दोघांचींहि मनं दुखवलीं जातात व एकादे वेळीं एकमेकांविषयीं एकमेकांच्या मनांत कांही काळ तरी अढी बसण्याचा संभव असतो. माझ्या एका नातलगाच्या भांडणाचें पर्यवसान तसेंच झालें होतें. त्या पतिपत्नींच्या त्या दिवशींच्या वादाचा मुद्दा अगदीं क्षुल्लक होता. त्यांच्या

छोकरीचा दुसरा वाढदिवस दोनतीन दिवसांवर आला होता, आणि त्या प्रसंगीं तिला एक अतिशय सुंदर सेलरसूट घ्यावा असें त्याचें म्हणणें होतें. पण तिनें त्याला विरोध केला. 'सेलरसूट तिला चांगला दिसायचा नाही—त्यापेक्षां एकादा सुंदर रेशमी फ्रॉक् घ्यावा.' असें तिचें मत होते. झालें! वादविवाद त्याच्यावरच रंगला. तिला सेलरसूट चांगला दिसेल कीं फ्रॉक चांगला दिसेल यावर वाद होतांहोतां शेवटीं एकमेकांच्या उखाळ्या-पाखाळ्या काढण्यापर्यंत तो वाद येऊन ठेपला. 'तुम्ही असेंच आहांत—तुम्हाला हौसच नाही अन् तुम्हाला माझ्या मताची किंमतच नाही.' आणि 'तुला अक्कल नाही—तुला सौंदर्यदृष्टि नाही' अशीं एकमेकांनीं एकमेकांना आपापलीं प्रामाणिक मतें ऐकवल्यावर शेवटीं तो वाद त्या पत्नीच्या गंगायमुनांत वाहून गेला. वाद वाहून गेला, पण त्याचा कडवट पणा दोघांच्याहि मनांत शिल्लक राहिला. त्या गृहस्थानें दुसरे दिवशीं बाजारांत जाऊन मुलीच्या वाढदिवसाकरितां फ्रॉक व सेलरसूट दोन्ही खरेदी केले. त्यावर वास्तविक तो वाद मिटायला पाहिजे होता. पण छे! दोघेही अभिमानी पडले. दोघांनांहि वाटत होतं कीं आपलंच मत बरोबर आहे. त्यामुळे त्या वादाची आठवण तर मिटली नाहीच पण, 'सेलरसूट' व 'फ्रॉक' या दोहोमुळे ती कायमची डोळ्यासमोर मात्र राहूं लागली. याचा परिणाम त्या बिचाऱ्या छोकरीला मात्र भोगावा लागे. कारण ज्या वेळी वडील मोठ्या हौसेनें तिच्या अंगावर सेलरसूट घालीत त्यावेळीं तिच्या आईच्या कपाळावर आठ्यांचें जाळें चढे व मुलीला सांभाळण्याचें काम वडिलांनाच करावें लागे आणि तिच्या आईनें तिच्या अंगावर फ्रॉक चढविला कीं, मुलीनें रडून आकाशपाताळ एक केलें तरी वडील तिला घेण्यासाठीं चुकूनहि हात पुढें करीत नसत.

तत्त्वाकरितां भांडणारीं पुष्कळ जोडपीं मीं पाहिलीं आहेत. पण ज्या ज्या ठिकाणीं दुसऱ्याच्या मताबद्दल सहिष्णुता मला दिसून आली, त्या त्या

ठिकाणीं अशा तत्त्वाकरितां चाललेल्या भांडणांनीं परस्परांबद्दल वाटणाऱ्या प्रेमाचे धागे अधिक दृढ केलेले मला आढळून आले. माझ्या ओळखीचे एक गृहस्थ पूर्ण नास्तिक होते, आणि त्यांची पत्नी अतिशय देवभोळी होती. त्या तिच्या देवभोळेपणाबद्दल ते तिची कितीतरी थट्टा करीत असत—त्यांचे त्यावर चाललेले वादविवाद मोठे ऐकण्यासारखे असत. पण हाच गृहस्थ प्रसंगीं पीतांबर नेसून सत्यनारायणाच्या पूजेला बसलेला मी पाहिला आहे. शिवाय रामनवमी–दत्तजन्म–गोकुळअष्टमी वगैरेसारखे धार्मिक उत्सवसुद्धां त्यांच्याकडे मोठ्या प्रमाणांत साजरे होत असत. त्यांना हे उत्सव कसे पटतात असं जर कुणी त्यांना विचारलंच तर ते उत्तर देत, "हें पहा, काही कांही गोष्टी स्वतःच्या मताविरुद्ध दुसऱ्याच्या भावना संभाळण्यासाठीं करायच्या असतात. मला या गोष्टी पटत नाहीत, पण तिला जर या सर्व गोष्टीपासून आनंद मिळत असेल तर तिचा तो आनंद, केवळ माझ्या मताकरितां, मी कां हिरावून घेऊं ?" त्यांच्या या उद्गारांत यशस्वी संसाराचें केवढें तरी मोठें रहस्य सामावलें आहे !

दुसऱ्या एका जोडप्यामध्यें राजकीय पक्षाबद्दल मतभेद होता. पति पक्का कॉंग्रेसचा अनुयायी होता, पत्नी हिंदुमहासभेची कार्यकर्ती होती. या दोघांमध्यें दोन्ही पक्षाच्या धोरणाबद्दल पुष्कळच वादविवाद होई. महात्मा गांधींच्या धोरणाचें समर्थन तो जोरजोरांत करूं लागे, तर महात्मा गांधी ही व्यक्ति थोर असली तरी प्रस्तुतच्या राजकारणांत त्यांचें धोरण चुकीचें असल्याचें ती प्रतिपादूं लागे. जिनांच्या पाकिस्तानाच्या मागणीला महात्मा गांधींनीं संमति दिली त्यावेळीं तर त्यांचे वाद फारच रंगले होते. पण त्या वादांत दोघांनींहि शिवीगाळीला कधीं स्थान दिलें नाही,–किंवा प्रतिपक्षाच्या पुढाऱ्यांची व्यक्तिविषयक निंदा कधीं केली नाही. आपलीं मतं दुसऱ्यावर लादण्याचा तर दोघांनीं कधींही प्रयत्न केला नाही. दोघांचें राजकीय कार्यक्षेत्र निराळें होतें–दोघेही त्या त्या कार्यक्षेत्रांत एकमेकांच्या भावना न दुखवितां

कार्य करीत. पण राजकीय प्रांतांत त्यांचा जेवढा मतभेद होता, तितकेंच संसारक्षेत्रांत त्यांचें मतैक्य असे. सुहास व अनिल या त्यांच्या मुलांवर त्यांचें असणारें प्रेम—आणि परस्परांशीं प्रेमळ वागणूक पाहून सर्व लोकांना त्या आदर्श जोडप्याबद्दल मोठं कौतुक वाटत असे.

त्याच्याच विरुद्ध स्वभाव असणाऱ्या माझ्या ओळखीच्या एका जोडप्याच्या संसाराचे धिंडवडे निघालेले मला माहीत आहेत. पति व पत्नी दोघंहि सुशिक्षित होतीं. आपण नोकरी करून पैसे मिळवावे व आर्थिक दृष्टया स्वतंत्र व्हावें असें पत्नीला सारखें वाटत होतें. 'आदर्श पत्नी बनून तिनें संसाराचा भार संभाळणें हेंच तिचें कर्तव्य—आर्थिक स्वातंत्र्य मिळव-ण्याचा प्रयत्न करणें म्हणजे तिनें पतीवरील आपला अविश्वास व्यक्त करणें होय.' असें त्याचें मत होतें. आणि या मुद्यावर होणारीं त्यांचीं भांडणें इतक्या विकोपाला गेलीं कीं शेवटीं त्याच्या पत्नीनें गृहत्याग केला व स्वतंत्र राहून ती नोकरी करू लागली. त्यामुळे तिच्या पतीनें संतापून दुसरें लग्न केलें. त्याचें तें दुसरें लग्न यशस्वी झालें नाहीं आणि तिनें मिळविलेलें आर्थिक स्वातंत्र्यहि तिला फारसें मानवलें नाहीं. पण अभिमानामुळे दोघंहि ती गोष्ट कबूल करावयास तयार नाहीत. मतभेदाच्या झालेल्या या पर्यवसा-नानें दोघांच्याहि जीवनाचा पूर्णपणें विचका केला.

शिवाय आपला अधिकार—अरेरावी—व्यक्त करण्यासाठीं जर पति किंवा पत्नी यापैकीं कोणीहि एकानें भांडण करण्यास सुरवात केली तर अशा भांडणापासून संसारांत दुःखाचे कढच अधिक निघतील, संसार हा दोघांचा आहे, एकट्याचा नाहीं हें लक्षांत न घेता 'पैसे मिळवतों' म्हणून पुरुषानें किंवा गृहस्वामिनी म्हणून स्त्रीनें जर आपली एकट्याचीच जुलमी सत्ता संसारांत चालविण्यास सुरवात केली आणि दुसऱ्याच्या मताकडे, आवडीकडे पूर्ण दुर्लक्ष करायचें ठरविलें तर तें कधींच हितावह होणार

नाही. संसाराला दिलेली रथाची शिळी उपमा पतकरूनसुद्धां असं सांगतां येईल कीं त्या रथाच्या सुरक्षिततेसाठीं त्या रथाला जुंपलेल्या पतिपत्नींनीं परस्परांच्या सहकार्यानें व एकमतानेंच रथ न्यावयास हवा. आणि अशा रीतीनें एकमतानें मार्गक्रमण करीत असतां कृत्रिम मतभेद उकरून काढून निर्माण केलेले प्रेमकलह हींच त्यांचीं मार्गावरील विश्रांतिस्थानें!

आणि अशीं विश्रान्तिस्थानें मार्गावर नसतील तर मनुष्याला जीवनाचा प्रवास खरोखर अत्यंत रुक्ष वाटेल. संसाराला ललितकथेची जर उपमा दिली तर ललितकथेंत छायाप्रकाशाचें जितकें महत्त्व आहे तितकेंच संसारांत कलहाचें आहे. मात्र ते कलह प्रेमाचे पाहिजेत आणि त्यामागें कलह करणारांची खिलाडु वृत्ति सदैव जागृत असली पाहिजे. विषदग्ध द्वेषाच्या वा मत्सराच्या भावना या कलहापासून कटाक्षानें अलिप्त ठेवण्याचा प्रयत्न करण्यांत आला पाहिजे. हें जर केलें तर ललितकथेपासून मनाला जो आनंद मिळेल त्यापेक्षां कितीतरी जास्त आनंद अशा कलहापासून खासच मिळेल. संसारांत सदैव आनंदाचे झरे निर्माण करणाऱ्या पुष्कळ गोष्टी आहेत.––अशा गोष्टींच्या अग्रभागीं जरी नाही तरी प्रमुख भागीं या प्रेमकलहांना स्थान निश्चित द्यावें लागेल.

हें सर्व विवेचन वाचून माझ्या पुष्कळशा मित्रांना हंसू येण्याचा संभव आहे. स्वतःच्या भांडखोरपणाची तरफदारी करण्यासाठीं मीं हें सारें लिहिलें आहे असें त्यांना खात्रीनें वाटेल. ज्या जोडप्यांनीं आत्तांपर्यंत आपलें जीवन केवळ एकमेकांची साथ करण्यांत घालवलें असेल त्यांनादेखील हें माझें विवेचन पटणार नाही. ते नाक मुरडून म्हणतील, “काय चमत्कारिक लेखक आहे पहा! चांगला गुण्यागोविंदानें संसार करायचा, तर तें सोडून हा सांगतो काय तर म्हणे, ‘भांडखोर बना.’ आपण स्वतः भांडखोर अन् दुसऱ्याला उपदेश काय, तर म्हण आमच्यासारखे व्हा.”

अर्थात् ज्यांना माझें हें म्हणणें पटत नसेल त्यांना मला कांहीच सांगायचें नाही. संसारांतील अत्यंत मोठ्या आनंदाकड त्यांना आपण-होऊन पाठ फिरवायची असेल तर त्याला कोण काय करणार? संसारांताल बऱ्या–वाईट अशा विविध प्रसंगांतून आनंदाची निर्मिति करून घेण्यास माणसाच्या अंगीं रसिकता व खिलाडु वृत्ति लागते. तीच जर माणसाच्या अंगीं नसेल तर संसारांतील प्रेमकलहाची त्यांना काय लज्जत समजणार? अशा रुक्ष माणसाची संभावना भर्तृहरीच्या 'साहित्य–संगीत–कलाविहीन' प्राण्याबरोबर करणें अधिक योग्य ठरेल.

पण ज्यांना आपल्या आयुष्यांतील खरा आनंद चाखायचा आहे, आणि संसारातील खऱ्या सुखाची गोडी अनुभवायची आहे त्यांनीं या संसारातील आनंदाच्या निर्झराकडे केव्हांहि पाठ फिरवून चालायचें नाही. मी तर कोणत्याहि नवविवाहित जोडप्याला 'नांदा सौख्यभरें करा कलह जो आनंद देई मना' असाच उपदेश करीन.

बाकी त्यांना असा उपदेश करण्याची जरुरीच नाही मुळीं! कारण प्रेमकलहाचें जीवनांतील महत्त्व त्यांच्याइतकें दुसऱ्या कुणालाच पटलेलें नसतें. नवपत्नीला चिडविणें, तिच्या खोड्या काढणें, तिच्यावर लटकें राग-वून तिच्या डोळ्यांतून गंगायमुना काढणें, तिच्याशीं खोटेंच भांडणें या गाष्टी कोणता नवविवाहित तरुण करीत नाही? त्यावेळच्या त्या प्रेमकलहांत केवढें तरी काव्य भरलेलें असतें! संसारांतील प्रेमकलह म्हणजे जीवनांतील आनंदाचे झरेच होत हें त्यांच्याइतकें कुणालाच पटलेलें नसतें. 'सत्तेच्या गुलामां' तील वैकुंठाप्रमाणे प्रेमकलहांचा आस्वाद घेतलेला प्रत्येक नववि-वाहित तरुण म्हणत असतो, "सदा कलहाविना। मना नये नेम, सुनें गमे प्रेम" या प्रेमकलहाशिवाय प्रेमदेखील सुनें भासावें इतकें जीवनांत त्यांचें महत्त्व खास आहे.

आणि संसारांत असे रम्य झरे आहेत म्हणूनच व्यवहाराच्या खाच-खळग्यांनीं भरलेला मार्ग आपणाला सुरम्य वाटतो—आणि मार्गावरील आपला शीण नाहीसा होतो. संसारांतील या रम्य झऱ्यांतच जीवनांत नवीन गोडी व नवचैतन्य निर्माण करण्याचं सामर्थ्य आहे.

तर मग ज्यांनीं या रम्य झऱ्याकडे जाणूनबुजून किंवा अजाणतां पाठ फिरवली आहे अशा अरसिक लोकांनीं भांडखोर जोडपं म्हणून आमचा कितीही उपहास केला तरी त्याची पर्वा आम्हीं कां करावी ?

———

# नको असलेलीं पत्रें

संध्याकाळीं पांच वाजलें कीं कोणतंहि काम करीत असलों तरी बाहेर बाल्कनींत यायचं अन् खूप लांबवर उजवीकडे नजर फेकायची हा माझा एक दैनंदिन कार्यक्रमच झाला होता. अपेक्षित खाकी पोषाख अन् तांबडे पट्टे असलेला फेटा परिधान केलेली व्यक्ति माझ्या नजरेच्या टापूंत आली कीं किती वेळ तरी त्या व्यक्तीची वाट पहात मी तिथेंच थांबत असें.

ती व्यक्ति आपणाकडे केव्हां येते—कीं येत नाही— अन् आली तर आपल्या हातांत काय देते याबद्दल किती अधीरता निर्माण होई माझ्या मनांत! पण माझ्या या अधीरतेची त्या पत्रवाहकाला कल्पना असेल तर ना! तो मुंगीच्या पावलानें सावकाश येई— मध्येंच एखाद्या घरांत शिरला तर पंधरा मिनिटं अंतर्धान पावे—कधीं कधीं वाटेंत कुणी भेटला तर त्याच्याशीं गप्पा मारीत तो अर्धा तास घालवी.

पण इतकी त्याची वाट पाहून आमच्या बंगल्याच्या पलीकडच्या बंगल्यांत पत्रें देऊन तिथूनच परते तो! त्यावेळीं त्याचा असा राग येई मला! कांही कांही वेळां शेजारच्या बंगल्यांत पत्र देऊन तो पुढें येई— आमच्या बंगल्याच्या फाटकापर्यंत येई—माझं हृदय अपेक्षेनं स्फुरूं लागे— पण आमच्याकडे दृष्टिक्षेपहि न टाकता तो तसाच पुढें जाई व शेजारच्या बंगल्यांत शिरे. अशा वेळीं परिक्षेंत वरचे दहाबारा व खालचे दहाबारा नंबर ओळीनें पास व्हावेत अन् आपण मधें एकटेंच नापास व्हावें—त्यावेळीं त्या मधल्या नंबरच्या उमेदवाराची जी मनःस्थिति होत असे तीच आमची होई.

पण त्याहिपेक्षां नको असलेलीं पत्रं त्यानें आणून दिलीं म्हणजे मात्र मला जास्तच राग येत असे—असें वाटे, इथें मधें न शिरतां तसाच

पुढल्या बंगल्यांत गेला असतां तर बिघडलं असतं ? काय बिघडलं असतं हें पत्र दिलं नसतं आणून तर !

आणि अशीं नको असलेलीं पत्रं आपल्या जीवनांत थोडीं का असतात ? संसारांत सुखांपेक्षां दुःखांचं प्रमाण अधिक असतं असं म्हणतात——तसं पत्रांचंसुद्धां नसतं का ? आनंदाच्या बातम्या आणणारीं——लालित्यानं आपलं मन रमविणारीं——अशीं कितीशीं पत्रं येतात आपल्याला ? ज्याला अशीं पुष्कळशीं पत्रं येत असतील तो खरोखरच भाग्यवान् होय ! पण एरवीं सामान्य माणसाला येणाऱ्या पत्रांत पुष्कळशीं पत्रं अशींच असतात कीं, तीं वाचल्यावर नाक मुरडून तें पत्र त्यानें फेकून द्यावें अन् उद्गार काढावे " शी ! कशाला आलं हें पत्र ! "

मला स्वतःला असा त्रासाचा उद्गार काढायला लावणारीं पत्रं येतात अन् त्या पत्राचं स्वरूप सुद्धा कसं निरनिराळं असतं ! कांहीं पत्रं वाचून झाल्यावर त्यांचं महत्त्व संपतं म्हणून तीं फेकून देण्याच्या लायकीचीं होतात——कांहीं वाचताना डोळ्यांतून अश्रू येतात तर कांहींमुळे नुसतेच 'काय कटकट पहा' असे त्रासाचे उद्गार बाहेर पडतात.

वाचून झाल्यावर फेकून देण्याच्या लायकीचीं पत्रं तर पुष्कळच असतात. 'आम्ही खुशाल आहोंत——तुम्ही कसें काय आहांत तें कळवा.' या स्वरूपाचीं मामुलीं पत्रं सारीं या प्रकारचीं असतात. तात्कालिक महत्त्व असतं त्यांना——पण तें किती ?——कळेल न कळेल इतकंच ! अमक्या अमक्यानं आपल्याला लिहिलंय बरं का——अद्याप आठवण आहे त्याला आमची——त्याला उत्तर पाठवलं पाहिजे केव्हां तरी, इतपत समाधान देण्याचं कार्य हीं पत्रं करतात. पुढें आपल्या नेहमींच्या कार्यक्रमांत आपण या पत्रांना पार विसरूनहि जातों.

आपणांकडे बहुतेकांना पत्रलेखनाची कला खरोखरच अवगत नसते असं म्हटलं तर फारसं अतिशयोक्त विधान होणार नाहीं. तें मामुली पत्र लिहि-

ताना त्याच्यांत जिव्हाळा आणणं ही एक कला आहे. पत्र लिहिणाऱ्याच्या भावनेच्या छटा, अन् त्याचं व्यक्तिमत्त्व त्यांत प्रतिबिंबित झालं पाहिजे. माझा एक मित्र आहे, दोनदोन तीनतीन पानं पत्र लिहितो तो—पण साऱ्या पत्रांत मामुली खुशालीखेरीज कांही नसूनसुद्धां त्याचं पत्र पुनःपुन्हां वाचावंसं वाटतं! त्याच्या प्रत्येक शब्दांतून अन् प्रत्येक वाक्यांतून त्याचा खेळकर अन् मिस्किल स्वभाव मला प्रतिबिंबित झालेला दिसतो. त्यामुळे त्यानं साधं कार्ड लिहिलं तरी मला पांच-पांच सहा-सहा वेळां वाचल्या-खेरीज तें खालीं ठेववत नाही--पण असें पत्र लिहिणारे फारच थोडे! इतर बहुतेक लिहायला पाहिजे म्हणून चार ओळी कशा-बशा खरडून टाकतात--अशीं पत्रं आपण वाचतों अन् दुसऱ्या क्षणीं विसरून जातों.

माझ्या एखाद्या मित्राकडून मला ज्या वेळीं असें मामुली पत्र येतें त्या वेळीं मला त्याची फार चीड येते. आपल्या मित्राकडून अशा मामुली वार्तेपेक्षां जास्त जिव्हाळ्याची आपण अपेक्षा करीत असतों. मित्राचें पत्र म्हणजे एका दृष्टीनें त्याची भेटच! फार दिवसांनीं एखादा जिव्हाळ्याचा मित्र भेटावा अन् त्यानं आपल्या संभाषणांत फक्त मामुली हवा-पाणी प्रकृतीविषयीं गप्पा माराव्या म्हणजे जितका राग येईल तितका राग मला त्यांचीं अशीं पत्रं वाचून येतो. वाचल्याबरोबर चिडून मी तीं पत्रं टेबलावर फेकून देतों आणि कधीं कधीं त्यांना बिलकूलच उत्तर देत नाही, तर कधीं त्यांच्याच शब्दांत त्यांना पत्र लिहितों. पण हीं अशीं पत्रं माझा फार अपेक्षाभंग करतात अन् असं वाटतं, 'नसतं आलं असं पत्र तरी बरं झालं असतं!'

कांही कांही पत्रं आपणांला नसत्या पेचांत टाकतात अन् त्यामुळे अशीं पत्रं वाचताना आपल्या कपाळावर नकळतच आठ्यांचें जाळें उमटतें. अशीं बरींच पत्रं मला आलीं आहेत, अन् अशा प्रत्येक पत्राच्या वेळीं त्या त्या पत्रलेखकानें मला कोणत्या ना कोणत्या तरी पेंचप्रसंगांत टाकण्याचा प्रयत्न

केला होता. एका दूरच्या नातेवाईकाचें मला एकदां एक पत्र आलें होतें. त्यांत त्यानें लिहिलें होतें, “ आमच्या सुशीलेकरितां पुण्यांत कसबा पेठेंत राहणाऱ्या देशपांडे वकिलांच्या मुलासाठीं आमचा प्रयत्न चालला आहे. तुम्ही पुण्यांत राहतां तेव्हां तुम्हांला या देशपांडे वकिलांची माहिती असेलच. तरी त्यांची घरची सर्व माहिती आणि मुलाची माहिती आम्हांला कळवावी आणि आमच्यासाठीं थोडी खटपटहि करावी. तें पत्र वाचून हसावें कीं रडावें हेंच मला कळेना. पुणें म्हणजे त्या गृहस्थाला एखादें खेडेगांव वाटत होतें कीं काय कोण जाणे! आणि कसबा पेठेंत देशपांडे वकिलांचें नांव मी प्रथमच ऐकत होतों. अर्थात् लग्नाचें काम आहे—शक्य तों मदत करून पुण्य संपादन करावें या दृष्टीनें मीं थोडासा प्रामाणिक प्रयत्नहि केला. कसबा पेठेंत देशपांडे वकिलांची पाटी पाहून मी आंत शिरलों. माझ्याच वयाच्या एका तरुणानें माझें स्वागत केलें. हाच देशपांडे वकिलांचा मुलगा असावा या कल्पनेनें मी आडून आडून त्याच्याविषयीं चौकशीहि सुरू केली. मी जसजसा खोलांत जाऊं लागलों तसतसा त्या तरुणाच्या चेहऱ्यावर अधिकाधिक गोंधळून गेल्याचा भाव दिसू लागला. अन् मीं ज्यावेळीं गणगोत्राची चौकशी केली त्या वेळीं त्यानें स्पष्ट विचारलें, “ काय हो—ही चौकशी तुम्ही कां करताय? माझं लग्न होऊन दोन वर्षे झालीं आहेत. अन् दुसऱ्या लग्नाचा माझा विचार नाही. ” हें ऐकल्यावर माझा चेहरा अगदीं पाहण्यासारखा झाला. नंतर मला कळलें कीं, तो पोरसवदा तरुण म्हणजेच देशपांडे वकील होता. मी त्याच्याकडे उपवधू म्हणून पाहत होतों आणि तो माझ्याकडे नवीन अशील या दृष्टीनें पाहत होता. या प्रकारानंतर मात्र मीं माझा प्रामाणिक प्रयत्न तिथेंच थांबवला. कारण कसबा पेठेंतील प्रत्येक देशपांडे वकिलाकडे जाऊन हाच अनुभव थोड्या फार फरकानें घेण्याची माझी इच्छा नव्हती.

दुसऱ्या एका नुकत्याच तोंडओळख झालेल्या तरुणाचें मला पत्र आलें. “ अमक्या अमक्या शाळेंत शिक्षकाची जागा रिकामी आहे असें

कळतें. मीं तिथें अर्ज टाकला आहे. तुम्ही तिथेंच राहणारे—तेव्हां हेड-मास्तरांना भेटून माझ्यासंबंधीं खटपट करावी." आतां या गृहस्थाची अन् माझी ओळख फक्त गाडींत झालेली—त्याची मला विशेषशी माहितीसुद्धा नव्हती. तरी पण त्या ओळखीला जागावं म्हणून फारशी ओळख नसतांनासुद्धां मी त्या हेडमास्तरांकडे गेलों अन् त्या तरुणासंबंधीं विषय काढला. तेव्हां त्यांनीं स्पष्ट विचारलें, "तुमची खात्री आहे का त्या तरुणाच्या लायकीसंबंधीं? असेल तर सांगा—आतां मी त्याला ऑर्डर पाठवतों. आम्हांला या शिक्ष-काला सहावी-सातवीचें काम द्यायचें आहे. तेव्हां तुम्ही त्याची हमी देत असाल तर माझी त्याला नेमायला कांहीच हरकत नाही." यावर मी काय बोलणार? दोन तास गाडींत भाषण झालेल्या तरुणासंबंधीं मी हमी तरी कशी देणार? आपण एखाद्या माणसाची शिफारस करायला जावें अन् त्याची आपणाला कांहीच माहिती असू नये अशा वेळीं त्याची जी विचित्र मनःस्थिति होईल तीच माझी झाली. त्या हेडमास्तरांकडून मी चहा घेऊन बाहेर पडलों, पण स्वतःला मी हास्यास्पद करून घेतलें ही जाणीव माझ्या मनांतून गेली नाही.

माझी सुट्टी होण्याचे दिवस जवळ आले आणि गांवाला जाण्याची तयारी सुरू झाली कीं मला या पत्रग्राहकाची फार भीति वाटू लागते. बहुधा तीन-चार तरी "नको असलेलीं पत्रं" तो आणून टाकतोच. त्यांत बहुतेक 'तुम्ही आतां सुट्टींत इकडे येणार असालच—तेव्हां येताना आमच्या अमक्या अमक्या जिनसा घेऊन याव्यात; पैसे तुम्हाला आल्यावर देऊं.' अशा तऱ्हेची विनंति केलेली असायची. कित्येक पत्रांत "अमक्या अमक्या ठिकाणीं राहात असलेल्या अमक्या गृहस्थाकडे जाऊन त्यांच्याकडे राहिलेलं आमचं सामान बरोबर आणावं." अशाहि तऱ्हेची विनंति केलेली असते. बरंऽ! ही विनंति करताना प्रवासाच्या दगदगीचा किंवा आमच्या सोयी-गैर-सोयीचा विचार कधींच केलेला नसायचा. एका गृहस्थाच्या पत्राप्रमाणे

पत्ता हुडकीत हुडकीत मी त्यानें पत्रांत लिहिलेल्या त्याच्या नातेवाइकाकडे गेलों. त्यानें बरोबर आणायला सांगितलेल्या जिनसा पाहिल्याबरोबर माझी छातीच दडपून गेली. एक मोठं पितळी पिंप, अन् एक जाड वळकटी एका कोपऱ्यांत ठेवलेली दिसत होती. त्यांच्याकडे अंगुली-निर्देश करून अगदीं सहज आवाजांत तो नातेवाईक म्हणाला, "बस्स! येवढ्या दोनच जिनसा!" "बस्स! दोनच डाग?" मींसुद्धां तितक्याच सहजतेनें म्हटलें—जणूं दहा-बारा डाग नेण्याच्या तयारीनेंच मी आलों होतों असा माझा अविर्भाव होता त्यावेळीं. "टीक! स्टेशनवर जाताना मी नेईन हे डाग." आणि त्यानंतर मी जो बेपत्ता झालों तो त्यांना पुन्हां तोंड दाखवतों कशाला!

त्याहीपेक्षां तिसऱ्या एका पत्रानें मला चांगलाच गोत्यांत आणण्याचा विचार केला होता. माझ्या एका मित्राच्या भावाचें पत्र होतें तें. "अमक्या अमक्या ठिकाणीं माझ्या चुलत मेहुण्याकडे जाऊन ते देतील ती करंडी कृपा करून घेऊन यावी" असं अगदीं आर्जवून लिहिलं होतं त्यानं पत्र! मित्राचा भाऊ पडला तो! एका दृष्टीनें मित्रासारखाच! म्हणून धडपडत त्याच्या चुलत मेहुण्याकडे गेलों. त्यानें करंडी तयारच करून ठेवली होती. दिवाळीचं फराळाचं आहे, तेव्हां जपून करंडी नेण्याविषयीं त्यानें मला बजावलं. माझ्या वाढत्या सामानांत मीं त्या करंडीचा समावेश केला. पुणें स्टेशनवर येऊन करंडी घेऊन जाण्याविषयीं मीं माझ्या मित्राच्या भावाला बजावलें होतें—पण स्टेशनवर त्याचा कुठेंच पत्ता नव्हता. शेवटीं मी आपलं सामान हलविणार इतक्यांत एका पोलिसाची माझ्या सामानाकडे नजर गेली. उद्योग नसल्यामुळे त्यानं माझ्या सामानाची चौकशी आरंभली. त्याला त्या करंडीविषयीं काय संशय आला कुणास ठाऊक? मी त्याला पुन्हां पुन्हां त्यांत "फराळाचें" आहे असं सांगत असताना सुद्धां त्यानें मला ती उघडायला लावली—अन् आंत पाहातों तों काय? व्यवस्थित

तीन-चार शेर साखरेचा पुडा करून ठेवलेला ! माझे डोळेच पांढरे होण्याची वेळ आली. चांगलाच रेशनिंगच्या "आर" कायद्याखालीं मी सांपडलों होतों. त्या पोलिसाच्या हातांत दोनाची नोट ठेवून त्याच्या हातून सुटतां सुटतां मला नाकीं नऊ आले.

तेव्हां हीं अशीं पत्रं यायला लागलीं तर कपाळावर आठ्यांचं जाळं उमटणं अनैसर्गिक आहे का? अशीं गोत्यांत आणणारीं पत्रं पत्रवाहक आणून देऊं लागला कीं असा राग येतो त्याचा! वाटतं आपल्या फाटकांत न शिरतां तसाच पुढल्या बंगल्यांत गेला असता तर कांही बिघडलं असतं?

दुःखद वार्ता आणणारीं पत्रं तर कुणालाच नको असतात. पण तीं नको असलीं तरी यायचीं चुकतात थोडींच? जगांत सुखाबरोबर दुःखाचा वांटा माणसाला स्वीकारावा लागतो तसेंच हें! अशीं पत्रं अपेक्षित असलीं तर कांहीशीं सुसह्य होतात—पण अनपेक्षित असलीं तर मात्र त्यांचा फार मोटा धक्का मनाला बसतो—कित्येक वेळां त्याच्या वेदना असह्य होतात आणि अशा पत्रांची आठवणसुद्धां फार काळ राहते.

एकदां दिवाळीच्या सुट्टींत मला एका पत्रानें केवढा धक्का दिला याची मला आठवण आहे. श्रीनिवास पाटणकर नांवाचा माझा मित्र होता—चांगल्यापैकी कवि होता तो—दिवाळींला आमच्या गांवीं येण्यापूर्वी आमची गांठ पडली होती—कितीतरी गप्पा मारल्या आम्हीं. आपल्या भावी आकांक्षा त्यानं मला ऐकविल्या, नवीन केलेल्या दोन-तीन कविता दाखविल्या. मोठा खुषींत होता तो त्या दिवशीं. आणि मी गांवाला निघून गेल्यावर आठच दिवसांनीं मला माझ्या दुसऱ्या मित्राचें पत्र आलें. पाटणकराच्या मृत्यूची वार्ता त्यानं मला त्यांत कळवली होती. ती वार्ता वाचून केवढा धक्का बसला मला! सारा दिवसभर त्याचा हंसरा चेहरा माझ्या डोळ्यासमोर सारखा दिसत होता. सबंध दिवस एक प्रकारच्या बधिर मनःस्थितींत होतों मी!—दुसऱ्या एका प्रसंगीं अशीच चुलत भावाच्या

नीला नांवाच्या छोकरीच्या मृत्यूची वार्ता एका पत्रानें आणली. आणि महिन्यापूर्वीच आम्हीं दोघांनीं तिला किती खेळवलं होतं——तिचं किती कौतुक केलं होतं! मोठी गोड अन् लाघवी पोर होती ती!—दोघांनाहि त्या दिवशीं सबंध दिवस दुसरं कांही सुचलं नाही.

अशी एक ना दोन! कितीतरी पत्रं असतील आणि जगाचं रहाटगाडगं जोंपर्यंत चालू आहे तोंपर्यंत प्रत्येकाला थोडा ना फार अशा पत्रांचा वांटा उचलावा लागतोच. हीं नको असलेलीं पत्रं कुणालाच टाळतां येत नाहीत, आणि टाळूं म्हटल्यानें तीं टळतहि नाहीत.

आणखीं कितीं तरी नको असलेलीं अप्रिय पत्रं आपणाला येत असतात. रुष्ट झालेल्या नातेवाइकांचीं अन् अधिकाऱ्यांचीं पत्रें, न दिलेल्या बिलाची आठवण देणारीं पत्रें, विम्याच्या हप्त्याच्या नोटीसा, वगैरे वगैरे! आपल्या जीवनांत ज्या ज्या अप्रिय गोष्टी घडत असतील त्यांची आठवण करून देणारें एखादें दुसरें पत्र आपल्या संग्रहीं असतेंच. रुष्ट अधिकाऱ्याच्या पत्रांपेक्षां एका दृष्टीनं रुष्ट नातेवाइकाचीं पत्रें फार वाईट! कारण अधिकाऱ्याचा राग कांहीसा सकारण तरी असतो——पण गैरसमजुतीवर आधारलेल्या नातेवाइकाच्या रागाचें निरसन कुणी सुद्धां करूं शकत नाही.

माझ्या एका नातेवाइकाच्या मुलाची मुंज होती. मला——आग्रहाचें नसलें तरी——आमंत्रण होतें. आणि त्याप्रमाणे मीं जायचें ठरवलें होतें देखील! पण ज्या दिवशीं मी निघणार त्याच्या आदल्या दिवशींच जिन्यावरून पायरी निसटून मी खालीं पडलों व माझा पाय मुडपला. त्यामुळे अर्थात् मला मुंजीला जाता आलें नाही. मुंज झाल्यावर तिसरेच दिवशीं मला पत्र आलं. त्यांत त्यानें लिहिलें होतें, "इतक्या आग्रहाचें निमंत्रण पाठवूनही तू आला नाहीस——फार मोठा झाला आहेस तू आतां. त्यामुळे आमची आठवण विसरणं साहजिक आहे," वगैरे वगैरे. मी त्याला माझ्या

न येण्याचें कारण सांगितलें--त्याची खात्री पटविण्यासाठीं डॉक्टरचें बिलहि पाठविलें. पण छे! अद्याप त्याचा विश्वास बसत नाहीं. "आजकाल डॉक्टरचं बिल कुणीहि मिळवूं शकतो." असं त्यानं चक्क लिहिलें मला!

शिवाय महिन्याचा शेवट असावा, खिशांत एक दिडकीहि असूं नये, एक तारखेपर्यंत चार-पांच दिवस कसे तरी ढकलण्याचा विचार करीत असावं--अन् अशा वेळीं पत्र-वाहकानें न दिलेल्या बिलाच्या आठवणीचीं पत्रं अन् विम्याच्या हप्त्याच्या नोटिसा आणून द्याव्यात! अशा वेळीं माणसानं त्या पत्रवाहकावर असलीं पत्रं आणल्याबद्दल चिडूं नये तर काय करावं?

किंवा घरांत पत्नी आजारी असावी, दोन्ही वेळेला घरांत खाणा-वळीचे डबे येत असावेत, बायकोच्या आजाराच्या खस्ता, मुलांची काळजी वगैरे करतां करतां आपला जीव अगदीं मेटाकुटीस आलेला असावा आणि अशा वेळीं "आम्ही तिघं-चौघं पांच-सहा दिवस कांही कामाकरिता तुमच्या गांवीं येत आहोंत, तुमच्याकडेच उतरूं." असं कुणा तरी दूरच्या नातेवाइकाचं पत्र यावं! माणूस मग संतापणार नाही तर काय करील?

किंवा आपण एखाद्या ठिकाणीं नोकरीचा अर्ज टाकलेला असावा--आपला इंटरव्ह्यू होऊन आपण त्या जागीं नेमले जाणार अशी आपली पक्की खात्री असावी, त्यांचं नेमणुकीचं पत्र केव्हां येतंय याचीच आपण वाट पाहत असावं, अशा वेळीं पत्रवाहकाने आपल्या हातांत त्या संस्थेचा शिक्का 'असलेलं पाकीट द्यावं--अन् आपण मोठ्या आशेनं तें उघडून आंत पाहावं तो "माफ करा, आमच्या संस्थेत आम्हांला आपली नेमणूक करतां येत नाही" असं त्यांनीं कळवलेलं असावं! अशा वेळीं त्या पत्रवाह-काचा कां राग येणार नाही?

किंवा मिय्या-बिबीनं कुठल्या तरी रम्य स्थळीं सात-आठ दिवसांची सफर काढण्याचा निश्चय केलेला असावा, त्या सफरीची गोड कल्पनाचित्रं

त्यांनीं चितारलेलीं असावींत, नाना प्रकारचे सुंदर कार्यक्रम त्यांनीं आंखलेले असावेत, निघण्याच्या दिवसाची ते दोघंहि मोठ्या उत्कंटेनें अन् अपेक्षेनें वाट पाहत असावेत इतक्यांत घरून त्याच्या किंवा तिच्या वडिलांकडून पत्र यावं, 'अतिशय महत्त्वाचं काम आहे—तावडतोब निघून या' म्हणून! अशा वेळीं तें पत्र आणून टाकून साऱ्या गोड कार्यक्रमाचा विचका करणाऱ्या त्या पत्रवाहकावर त्या जोडप्यानें कां चिडूं नये?

पण नको असलेलीं कितींहि पत्रं जरी पत्रवाहकानें आणून टाकलीं तरी संध्याकाळीं पांच वाजल्याबरोबर बाल्कनींत येऊन उजवीकडे दूरवर दृष्टि टाकण्याचा माझा कार्यक्रम मी सोडणार आहे थोडाच!

कारण मला माहीत आहे कीं, नको असलेलीं पत्रं जरी कितीहि तो देत असला तरी हवीं असलेलीं पत्रंसुद्धां किती तरी आणून देतो तो.

आणि या नको असलेल्या पत्रांच्या तुलनेनं हव्या असलेल्या पत्रांचं महत्त्व मला चांगलं पटतं——आणि त्या पत्रांतील अवीट गोडी पुन्हां पुन्हां चाखण्यांत माझा किती तरी वेळ आनंदांत जात असतो. असें जर आहे तर 'नको असलेलीं पत्रं' आणून देणाऱ्या पत्रवाहकावर मीं कां रागवावं?

———

# भिडस्त माणसाची ढाल

त्या दिवशीं मला अगदीं महत्त्वाच्या कार्यासाठीं वाडिया कॉलेज-मध्यें जावयाचें होतें. माझी स्वतःची सायकल माझ्या एका मित्रानें नेली होती, व 'बस' नें जायचें म्हटलें तर कमींत कमी एक–दीड तास सहज मोडला असता. कारण बोलूनचालून पुण्याच्या बसेस त्या ! नको असतील त्यावेळीं एकामागून एक रिकाम्या जातील, आणि हवी असेल त्यावेळीं तास न् तास थांबलें तरी त्या तोंड दाखवायच्या नाहीत––आणि दाखव-तील त्या 'अन्दर जगा नहीं' हें सांगण्यापुरत्याच !

ह्या बसचा अनुभव मला नित्याचा असल्यामुळे मीं माझ्या जवळच राहणाऱ्या एका ओळखीच्या गृहस्थाची सायकल घेण्याचें ठरविलें. सायकल, फाउंटन पेन वगैरेसारख्या गोष्टी मागून दुसऱ्याला विनाकारण संकटांत घालूं नये हें मला कळत होतें. पण दुर्दैवानें त्याच दिवशीं सोमवार आला होता—आजुबाजूचीं सायकलचीं सर्व दुकानें बंद होतीं व मला तर कॉलेजांत लवकर जाणें अगदीं जरूर होतें. शेवटीं मी जरा साशंक हृदयानेंच त्या गृहस्थाकडे गेलों. मला पाहतांच मोठ्या प्रेमानें त्यांनें उठून माझें आतिथ्य केलें व घरांत 'चहा'ची ऑर्डर सोडली.

"हें पहा दादासाहेब," मीं म्हटलें, "आतां चहाबिहा कांही नको. मला एका महत्त्वाच्या कामासाठी वाडिया कॉलेजमध्यें आत्तां जायचें आहे. तेव्हां तुमची सायकल देऊं शकाल का मला जरा ?"

"हो हो–वा–जरूर !" ते म्हणाले, "अहो, तुम्हाला सायकल नाही द्यायची तर कुणाला द्यायची ? पण त्याचं असं झालंय ! सायकलच्या मागच्या चाकाची वालट्यूब झाली आहे खराब–त्यामुळे सारखी हवा जाते त्यांतली."

"एवढंच ना ? मग मी पंप घेतों बरोबर." मी म्हटलें.

"अन् शिवाय मागच्या चाकाचा ब्रेक सैल झालाय–सायकल थांबत नाही ताबडतोब," ते सांगू लागले, "चेनहि सारखी निसटते..."

"तें असूं द्या हो. आज मी दहा वर्षे पुण्यांत सायकलीवर बसतोंय. अगदीं सांभाळून नेतों तुमची सायकल." मीं त्यांना आश्वासन दिलें, "तुम्ही कांही काळजी करूं नका."

"तशी कांही काळजी नाही म्हणा." दादासाहेब म्हणाले, "पण पांच वाजतां आमच्या मधूला ॲग्रिकल्चर कॉलेजवर जायचंय..."

"पांच वाजतां ना?––मग मी चारलाच तुमची सायकल परत आणून देतों. मग तर झालं ना?" मीं विचारलें.

"अन् अरे हो–विसरतच होतों मी!" दादासाहेब एकदम कांही तरी आठवल्यासारखे करून म्हणाले, "मला त्या आठवल्याकडे जायचं होतं आताच! मुद्दाम त्यांनीं मला आतां बोलावलं होतं. माफ करा हंऽ! तुम्ही सायकल मागायला यावं आणि मला ती देता येऊ नये याबद्दल वाईट वाटतं फार."

"जाऊं द्या हो." मीं एकंदरींत त्यांचा रोख ओळखून म्हटलें, "सायकल नाही तर बस् तरी आहे ना?" असें म्हणत त्यांच्या चहा घेण्याच्या आग्रहाला फारसें न जुमानता मी बाहेर पडलों.

कॉलेजांत जाताजाता मनांत मला त्या गृहस्थाच्या वृत्तीचें हंसूं येत होतें. त्या गृहस्थाला सायकल द्यायची नव्हती,–पण उघडपणें तसें सांगणें शिष्टाचाराच्या आड येत होतें. त्यामुळे त्यानें एकामागून एक हुडकून काढलेल्या सबबी तर मोठ्या छान होत्या. बिचाऱ्याची सायकल चांगली धडधाकट व कोरी दिसत होती. पण नवीन सबबी पुढें करण्यासाठी कितीतरी दोष त्याला नाहक तिच्या माथीं मारावे लागले. अन् इतक्या दोषांनीं युक्त असलेली ती सायकल दादासाहेब आठवल्यांकडे किंवा मधू ॲग्रिकल्चर कॉलेजवर कशी तावडणार होता तें एक दादासाहेबच जाणे.

सबबी सांगताना माणसाचा तोल कित्येक वेळां सुटतो तो असा. पण म्हणून सबबी वाईट असा मात्र कुणी ग्रह करून घेण्याचें कारण नाही. ‘ बरें सत्य बोला, यथातथ्य चाला ’ किंवा ‘ सत्य सदा बोलावें सांगे गुरु आणि आपुला बाप ’ हीं थोरांचीं वचनें लक्षांत ठेवूनहि आजच्या कलियुगांत माणसाला हरघडी सबबीचा उपयोग करावा लागतो. सबबीशिवाय माणसाचें या जगांत चालणार नाही. भिडस्त माणसाला सबब ही तर मोठी ढाल आहे. जगांत कित्येक प्रसंग माणसावर असे येतात कीं, त्या वेळीं दुसऱ्या माणसाला दुखविणें आपणाला जड वाटतें, पण त्याच्या इच्छेप्रमाणे वागणेंहि या ना त्या कारणानें शक्य नसतें. अशा वेळीं सबबच त्याला योग्य ती मदत करू शकत. शाळेंतील नेमून दिलेला अभ्यास न करता शाळेंत गेलेल्या आळशी मुलाला—ऑफिसमध्यें दहाबारा मिनिटांनीं उशीर करून आलेल्या कारकुनाला—पत्नीनें बजावून आणण्यास सांगितलेला एकादा जिन्नस विसरून घरीं येणाऱ्या पतीला सबबीशिवाय दुसेंर कुणाचें साहाय्य मिळणार ! त्या दृष्टीनें सबब ही सर्वसामान्य माणसाची मोठी मैत्रीण आहे असें जर म्हटलें तर फारशी अतिशयोक्ति होणार नाही.

‘ सर्वसामान्य ’ हा शब्द मी मुद्दामच वापरला. कारण ज्यांचें कांही चुकतें—ज्यांना सत्य थोडेंफार लपवून ठेवण्याची आवश्यकता वाटते अशाच माणसांना सबबीचें साहाय्य घ्यावें लागतें. पण कांही माणसें या सामान्य माणसांपेक्षां वरच्या पातळीचीं असतात—त्यांचें वर्तन इतकें चोख असतें कीं त्यांना सबबीचा आश्रय करण्याची जरूरच भासत नाही. त्यांच्या मनामध्यें आंत—बाहेर कांही नसतें. जें कांही हृदयांत असेल तें पटकन् जिभेवाटे बाहेर टाकतात असे लोक ! आणि असें करताना आपण कुणाचें मन दुखवीत आहोंत का कुणाला राग आणत आहोंत याची त्यांना पर्वा नसते. अर्थात् अशीं स्पष्ट व निर्भीड माणसें सामान्य माणसाच्या वरच्या पातळींतील जरी असली तरी व्यवहारी जगांत तीं तितकींच लोकप्रिय ठरतात असें नाही. उलट आपल्या वेळीं—अवेळीं केलेल्या सडेतोड भाषणानें

लोकांचा रोष मात्र ते ओढून घेत असतात. आणि अशा माणसांना कुठें काय बोलावें याचा पोंचही थोडा कमीच असतो.

माझ्या एका मावसभावाचें उदाहरण मला या बाबतींत आठवतें. तो स्वतःला स्पष्टवक्ता म्हणवून घ्यायचा. आपलीं प्रामाणिक मतें तो न भीतां लोकांना ऐकवायचा—पण तसं करताना योग्यायोग्य प्रसंगाचा तो विचारच करीत नसे. एकदां तो आपल्या एका मित्राच्या घरीं दुपारीं साडे-अकरा—बाराच्या सुमारास कांही कामासाठीं गेला. त्या मित्राच्या बायकोनें तो फार दिवसांनीं आलेला पाहून, परिश्रमपूर्वक उत्तम पोहे बनवले व त्याच्यापुढें ठेवले. ते पोहे पाहून तो त्या मित्राच्या पत्नीवरच उखडला. तो म्हणाला, "वहिनी, तुमचें इथें अगदीं चुकलें. ही वेळ आतां जेवणाची आहे—कशाला तुम्ही यावेळीं पोहे केलेत? आतां हे पोहे खाल्ले म्हणजे माझें जेवणहि नीट होणार नाही आणि या पोह्यानेंहि भूक पूर्ण भागणार नाही. तुमचे करण्याचे श्रम फुकटच नाही का गेले त्यामुळे? हो! मी आपला स्पष्ट बोलणारा आहें..." त्याचा तो स्पष्टवक्तेपणा ऐकून ती बिचारी बाई विरघळल्यासारखीच झाली. तिनें कोणत्या भावनेनें पोहे केले होते व त्याचा अर्थ या राजेश्रींनीं केला काय?

अशा या स्पष्टवादी माणसाला दुसऱ्याच्या भावनांची पर्वाच नसते. काळ कोणता, प्रसंग कोणता याची देखील जाणीव कित्येक वेळीं त्यांना राहात नाही. एक स्पष्टवक्ता माणूस आपल्या मित्राच्या पत्नीच्या स्मशान—यात्रेला गेला होता. त्यानें आपल्या मित्राला तिथेंच स्पष्टपणें सांगितलें, "पाह्यलंत रामभाऊ—मी अगोदरपासून तुम्हाला सांगत होतों कीं रोगाचीं लक्षणें ठीक दिसत नाहीत, तुम्ही मुंबईला चांगल्या डॉक्टरांना तिची प्रकृति दाखवा. त्यावेळीं तुम्ही पैशाकडे पाहिलेंत—आतां पाह्यलंत काय परिणाम भोगावा लागला तो!" त्याचा तो स्पष्टवक्तेपणा ऐकून इतरांनीं मात्र थक्क होऊन तोंडांत बोटें घातलीं असतील, इतकेंच नव्हे तर एकाद्याला आपलीं बोटें त्याच्या गालावर उमटविण्याचा मोह झाला असला तरी आश्चर्य वाटायला

नको. तिसऱ्या एका स्पष्टवादी माणसानें तर कळसच केला. माझ्या एका मित्राला मुलगा झाला होता, म्हणून त्यानें आपल्या सर्व मित्रमंडळीला एक मोठी मेजवानी दिली. त्यांत या स्पष्टवादी माणसालाहि निमंत्रण होतेंच. पण तो कांही त्या मेजवानीला आला नाही. दुसरे दिवशीं त्या मित्रानें त्या गृहस्थाला सहज त्याच्या गैरहजेरीचें कारण विचारलें. तो म्हणाला, "हें पहा मधुकर,—तुला मुलगा झाला म्हणजे काही जगाविरहित कांही झालं नाही—किंवा त्यांत तूं मोठा पराक्रमहि केलास असं नाही. त्यासाठीं मेज-वानी द्यायची व निरर्थक पैसे उधळायचे हें मला अगदीं पसंत नाही. आज बंगालमध्यें शेंकडों लोक दुष्काळानें प्राणास मुकत असतां तूं इथं मेजवान्या कराव्या व मिष्टान्नें झोडावींस हें खरोखर लांछनास्पद आहे, अन् याचा निषेध करण्यासाठीच मी मेजवानीला आलों नाही काल!" हें ऐकून माझ्या मित्रानें त्याला कोपरापासून नमस्कार केला व आपला रस्ता सुधारला. अन् यापुढें कोणत्याहि समारंभाला त्या गृहस्थाला बोलवायचें नाही अशी मनांतल्या मनांत शपथहि घेतली.

तेव्हां असे स्पष्टवक्ते लोक सोडले तर सामान्य लोकांना मात्र सब-बीचा वारंवार आश्रय घ्यावा लागतो. या सबबीनें दुसऱ्याला न दुखविता कितीतरी कार्यभाग साधता येतात. अप्रिय आमंत्रणें टाळता येतात—आपल्या हातून घडलेल्या चुकीवर पांघरूण घालता येतें—परिस्थितीच्या पेंचप्रसंगांतून आपली सुटका करून घेता येते—दुसऱ्याच्या इच्छेविरुद्ध त्याला न दुखविता एकादी गोष्ट साध्य करून घेता येते—एक ना दोन! याशिवाय सबबी हुडकण्यास कल्पनाशक्तीची मदत घ्यावी लागत असल्या-मुळे तिचा विकास होतो तो निराळाच!

निदान मला तरी या सबबींनीं चांगलाच हात दिला आहे. अगदीं साध्या गोष्टींतच पहा—कॉलेज सुटल्याबरोबर मी तावडतोब घरीं यावें अशी माझ्या पत्नीची इच्छा असते. ती त्या वेळीं चहाचें आधण ठेवून

सज्ज असते. पण मित्रांशीं गप्पा मारीत बसल्यानें किंवा वाचनालयांत वर्तमानपत्रें चाळण्यांत वेळ गेल्यानें मला दररोज घरीं यायला उशीर होतो. त्यामुळे घरीं येताना उशीर झाल्यामुळे चिडलेल्या पत्नीचें समाधान करण्यासाठीं मला दररोज नव्यानव्या सबबी हुडकून काढाव्या लागतात. कधीं मीटिंग—कधीं वादविवाद—कधीं व्याख्यान—अशा एक ना दोन शेंकडों सबबी मला निरनिराळ्या वेळेसाठीं तयार ठेवाव्या लागतात. त्यामुळे सबबी बनवून सांगण्यांत मी आतां अगदीं प्रवीण झालों आहें—आणि माझ्या पत्नीचेंहि समाधान त्या सबबीनें होत असल्यामुळें माझ्या सांसारिक आघाडीवर शांतता नांदत असते.

पण एकदां मात्र त्या शान्ततेचा स्फोट होण्याचा प्रसंग आला होता. मी आदल्या दिवशीं माझ्या एका मित्रानें मला घरीं ओढून नेल्याची सबब सांगितली होती व त्याच्या व माझ्या झालेल्या काल्पनिक वाद-विवादाचें वर्णनहि मोठें रंगवून केलें होतें. दुर्दैवानें तोच मित्र दुसरे दिवशीं सकाळीं माझ्याकडे आला. चहा देताना तिनें माझ्या मित्राला विचारलें, "काय हो—काल परस्परच यांना आपल्या घरीं नेलं होतं वाटतं? आणि लवकर तरी सोडायचं त्यांना? घरीं कुणीतरी वाट पहात असतं त्यांची?"

"मी याला घरीं नेलं होतं?" माझ्या मित्रानें आश्चर्यानें 'आ' करून विचारलें. मीं ओळखलें कीं आपण जर मधें पडलों नाहीं तर आपलं सगळं रहस्य बाहेर फुटणार. मी घाईघाईनें त्याला मध्येंच म्हटलें, "वा राजे—काल वाचनालयाजवळ नाही का तुझी—माझी गांठ पडली—अन् तूं मला परस्पर घरीं खेचून गुळचट चहाचं पाणी पाजलंस—R. S. S.—बद्दल आपला केवढा वादविवाद नाही का झाला काल?"

सुदैवानें माझ्या मित्रानें मला काय पाहिजे तें बरोबर ओळखलें अन् होऊ घातलेला स्फोट टळला. पण हें एक उदाहरण सोडलें तर माझ्या पत्नीला अद्यापपर्यंत माझ्या सबबीवर शंका आली नाही. सबबी हुडकून काढण्याच्या व त्या सांगण्याच्या माझ्या कौशल्याचें निदर्शकच आहे तें!—

आतां हा लेख तिच्या वाचनांत आला (आणि तो न येईल याची मी शक्य तों काळजी घेणार आहे) तर मात्र माझ्यावरील तिचा विश्वास पूर्ण-पणें उडून जाईल अशी मला भीति वाटूं लागली आहे. आणि तसा तो नाहीसा झाला तर मग मला कोणाचीच सबब उरणार नाही.

या सबबींनीं मला कित्येक प्रसंगीं मोटमोठ्या पेंचप्रसंगांतूनसुद्धां वांचवलें आहे. पुष्कळ वेळां लोक आपणावर कांहीतरी कामगिरी सोंपवि-तात—भिडस्तपणामुळे आपणाला तोंडावर 'नाही' म्हणणें शक्य नसतें—आणि ती कामगिरी तर आपणाला पार पाडणें अशक्य असतें.—अशा वेळीं योग्य सबबी माणसाचा चांगला बचाव करू शकतात. मात्र त्या सबबी पुढें मांडताना असें भासवलें पाहिजे कीं जणूं कांही याचें काम न करण्या-मध्यें आपली वैयक्तिकच हानि होते आहे. मी रत्नागिरीला जाणार असें पुण्यांतील माझ्या ओळखीच्या गृहस्थांस कळताच त्यांनीं ताबडतोब आपली बहीण, तिचीं तीन मुलें, व तिचा लहान दीर यांना रत्नागिरीला सासरीं पोचविण्याची कामगिरी माझ्या गळ्यांत बांधण्याचा चंग बांधला. मला त्याच्या या हेतूची कुणकुण अगोदरपासून लागली होती, म्हणून मी शक्य तों त्याला टाळण्याचा प्रयत्न करीत होतों; पण एकदां त्यानें मला, पाळत ठेवून, गांठलेच व हवापाण्याच्या मामुली प्रश्नानंतर, सुमारें पंधरावीस मिनि-टांनीं मुख्य मुद्यास हात घातला. मी त्याच्या बहिणीस न्यावयास एकदम कबूल झालों. माझ्यावर विश्वासानें व आपुलकीनें ही कामगिरी सोपविल्या-बद्दल मी त्याचे आभार मानले. पण शेवटीं म्हटलें, "पण एक अडचण आहे बुवा—रत्नागिरीला जाताना मला अगदीं महत्वाच्या कामासाठीं साताऱ्याला पांच—सहा दिवस मुक्काम करावा लागणार आहे—अन् साताऱ्याला तर हल्लीं कॉलऱ्यानें कहर चालविला आहे. तशांत तुमची हरकत नसेल तर पहा!" त्यानंतर त्या गृहस्थानें पुन्हां तोंड दाखवलें नाही हें सांगायला नको.

या रोगराईच्या सबबीचा आधार घेऊन मी दुसरा एक हल्ला असाच परतवला. माझ्या एका फार दूरच्या नातेवाइकाला माझी एकदम आठवण

झाली व माझ्यावरील त्याच्या प्रेमाची राजापुरी गंगा एकदम दुथडी भरून वाहूं लागली. वास्तविक त्याला मी पांच वर्षांपूर्वी एकदांच पाहिलें होतें व तेंही पांच मिनिटें—त्याचें माझें नातेंहि खूप दूरचें—म्हणजे माझ्या आते-भावाच्या चुलतबहिणीचा सख्खा दीर होता तो. त्याचें एकदम मला गुण-वर्णनपर व स्तुतिपर पत्र आलेलें पाहून मला आश्चर्याचा धक्काच बसला. या जगांत निर्हेतुक स्तुति कुणी कुणाची करीत नाही—तेव्हां या स्तुतीमागें कांही तरी डाव असला पाहिजे याची जाणीव मला झाली आणि ती खरीहि ठरली. त्यांच्या दुसऱ्याच पत्रांत त्यांनीं विचारलें, "आमची बगी आतां सोळा वर्षांची झाली आहे, तेव्हां पुण्याला तिच्याकरितां कांही स्थळें पहा-वयाचीं आहेत. तेव्हां मी बगीला, कुटुंबाला व लहान तीन मुलांना घेऊन पुण्याला येणार आहें. आपणाकडे आमची सोय होईलच!"—तें वाचूनच माझे डोळे पांढरे होण्याची वेळ आली. अगोदर आमच्या लहानलहान दोन खोल्या—आम्ही दोघेच कसेंबसें भागवत होतों त्यांत! त्यांत ही सात माणसं आलीं म्हणजे करणार काय—झोपणार कुठें—अन् रेशनिंग अन् महागाई या द्विविध कात्रींत सांपडल्यावर खाणार काय! पण मी ताबड-तोब त्यांना पत्र लिहिलें, "आपल्या पत्राप्रमाणे जरूर निघून या—पण येताना प्लेगचें इनॉक्युलेशन मात्र करून घ्या. कालच आमच्या वाड्यांत एक उंदीर पडला—व तो प्लेगचा असावा या शंकेनें घरांत सायनोगॅसिंग करण्याचें काम म्युनिसिपालिटीनें चालवलें आहे." या पत्राला मात्र त्यानें कांहीच उत्तर पाठविलें नाही. त्यांच्या बगीच्या लग्नाचें बहुधा त्यांनीं तिक-डेच पहावयाचें ठरविलें असावें.

चाळीच्या जीवनांत तर या सबबीनें केवढेंतरी कार्य केलें जातें. विशेषत: आपण भिडस्त असलों तर या सबबीच्या ढालीचा उपयोग आपणाला पावलोपावलीं करावा लागतो. प्रत्येकजण आपुलकीच्या हक्कानें कांही ना कांही तरी मागायला येतोच. अन् त्यांना नाही तर म्हणवत

नाही. कारण मागणाऱ्या माणसांनीं आपण भिडस्त आहोंत हें ओळखलेलें असतें. अशा वेळीं 'सायकलचा दिवा ना? वा! जरूर दिला असता! पण कालच परांजप्यांच्या मधूनें नेला तो आणून दिला कुठें?" "कणिक पाहिजे होय?—बाई बाई तुमची आमची एकच नडीची वेळ कशी आली पाहा—तरी मोलकरणीला कालपासून सांगतें आहें कीं घरांतील कणिक संपली आहे—गहूं दळून आण. पण मेलीचं लक्ष कामांत असेल तर ना?" अशासारख्या कितीतरी सबबी हक्कानें व नियमितपणें उसनवारी करणाऱ्या शेजाऱ्यापासून आपलं रक्षण करूं शकतात. मात्र ती सबब सांगतांना आपल्या चेहऱ्यावर मदत करण्याची तीव्र इच्छा असल्याचा भाव मात्र वठविला पाहिजे. माझ्या एका मित्राची बायको या कलेंत अगदीं प्रवीण आहे. कुणीहि कांहींहि मागायला तिच्याकडे जावो—कांहीतरी सबब सांगून तो जिन्नस देण्याचें ती टाळील, पण सांगताना तें ती अशा रीतीनें सांगेल कीं जणुं कांही ती गोष्ट त्या व्यक्तीला देतां येत नाही याबद्दल तिला खरोखर फार वाईट वाटत आहे. या अभिनयानें तिच्याकडून रिकामी जाणारी कोणतीहि स्त्री तिच्यावर रुष्ट होऊन जात नाही, तर उलट मनाशीं म्हणते, 'गरीब बिचारी! तिच्याजवळ नाही त्याला ती काय करणार? असतें तर तिनें तें नक्की दिलें असतें.' त्यामुळें कुणालाहि कोणतीहि गोष्ट उसनी न देता ती चाळींतील स्त्रीवर्गात अगदीं आवडती झाली आहे.

पण कांही झालें तरी सबबी फार प्रमाणांत उपयोगांत आणणें वाईटच! एक तर त्यामुळे लोकांचा तुमच्यावरील विश्वास नाहीसा होण्याचा संभव असतो आणि दुसरें म्हणजे हळूहळू त्या सबबींच खऱ्या मानण्याची प्रवृत्ति होत जाते व मनुष्य नकळत स्वतःलाच फसवू लागतो. एकादें कार्य करण्यासाठीं तो स्वतःच नंतर सबबी शोधू लागतो व एकदां त्याला अशी संवय लागली व स्वतःच्या सबबींवर स्वतःचा विश्वास बसू लागला कीं तो

निष्क्रीय होतो. दुसरें असें कीं, सबबी सांगताना तोंडाला येईल ती सबब सांगणें केव्हांहि इष्ट नसतें. त्यांच्या संभाव्य—असंभाव्यतेचा विचार करावा लागतो—जी सबब सांगितली ती सांगताना त्या सबबीची असत्यता कुणाला माहिती नाही अशी खात्री करून घ्यावी लागते—आणि तसा कुणी आरोपच ठेवला तर असत्य तें सत्य करून दाखविण्यासाठीं झगडावेंहि लागतें. अशी कितीतरी अवधानें या सबबी सांगताना संभाळावीं लागतात. त्यामुळे सबबी सांगणें व त्या लोकांच्या गळीं उतरविणें हें किती कठीण काम आहे व त्याला किती कौशल्य लागतें याची कल्पना सहज येईल.

आणि हें कौशल्य अंगीं नसेल तर सुरवातीला वर्णन केलेल्या दादासाहेबासारखी माणसाची स्थिति होते. दादासाहेबांनी चार सबबी सांगितल्या—पण त्या चारी सबबी परस्पराशीं इतक्या विसंगत वाटत होत्या कीं त्यांतून मला सायकल न देण्याचा त्यांचा हेतू स्पष्ट दिसत होता. आणि असा हेतू दिसणें म्हणजेच पर्यायानें आपल्या सबबी लंगड्या होत्या अशी कबुली देण्यासारखें आहे. शिवाय तीच तीच सबब पुन्हा पुन्हा सांगितली की तिच्या खरेपणाबद्दल लोकांना शंका येऊं लागते. माझ्या एका मित्राची स्थिती अशीच झाली. तो अतिशय चिकट होता. दुसऱ्या कुणीहि त्याला हॉटेलमध्ये नेलें तर त्याची यायची एका पायावर तयारी असे. पण स्वत: पैसे खर्च करण्याची वेळ आली की त्याचें पैशाचें पाकीट तरी घरीं विसरलेलें असे किंवा कोट तरी बदललेला असे. या त्याच्या सबबी सारख्या सारख्या ऐकून एका खप्पी मित्रानें त्याची झडती घेतली. आणि आंतल्या पाकिटांत त्याला पांच रुपयाची नोट सांपडली. पण यांवर बिलकूल शरमिंदे न होता माझ्या मित्रानें गंभीरपणें उत्तर दिलं, "छे छे! ते पैसे माझे नाहीत. माझ्या पत्नीचे आहेत.

माणसांनी सांगितलेल्या सबबीवरून त्यांच्या स्वभावाचीहि पुष्कळ वेळां परीक्षा होते. कांही कांही माणसें केवळ आपला मोठेपणा प्रस्थापित करण्याठींच सबबी सांगत असतात. 'असल्या गोष्टीकडे लक्ष द्यायला मला

वेळ नाही, यापेक्षां महत्वाचीं कामं मला करावयाचीं आहेत' अशी सबब चेहेऱ्यावर तुच्छतादर्शक भाव आणून सांगणारा माणूस दिसला की तो आळ्यतेखोर आहे हें खुशाल समजावें. कांही लोकांनीं सांगितलेल्या सबबींत त्यांचा हजरजबाबीपणा व प्रसंगावधान व्यक्त होतें तर कांहीच्या सबबींत त्यांच्या कल्पनाशक्तीची भरारी दिसते. कांही लोकांची बेडरवृत्ति त्यांनी सांगितलेल्या सबबींत प्रगट होते, तर कांही लोक आपली सबब इतक्या आर्जवीपणानें सांगतात की कुणाचीहि त्याबद्दल खात्री पटावी. खरोखर या बाबतींत 'व्यक्ति तितक्या प्रकृति' या म्हणीप्रमाणे 'व्यक्ति तितक्या सबबी' असें आपणांस खासच म्हणता येईल.

आणि खरोखरच या सबबींवरच जगाचा कारभार यथार्थतेनें चालला आहे असें म्हटलें तर फार अतिशयोक्ति होणार नाही. या सबबी जर जगांत नसत्या तर एकमेकाचें सत्य स्वरूप माणसाला दिसलें असतें— आणि जगांत माणसामाणसामध्यें असलेले प्रेमाचे बन्ध शिथिल झाले असते. शिवाय सबबी नसत्या तर अप्रिय गोष्टी मनाविरुद्ध करणें माणसाला भाग पडलें असतें. स्पष्ट शब्दांत खरें सांगून माणसाला दुखविणें किंवा आपल्या मनाविरुद्ध किंवा सदसद्विवेकबुद्धीविरुद्ध अप्रिय कार्य करावें लागणें या दोन्हींपैकी एक गोष्ट माणसाला करावी लागली असती. दोन्ही गोष्टी त्याला सारख्याच अप्रिय—त्यांतून या सबबीनें माणसांचा बचाव करण्याचें काम चांगलें केलें आहे.

म्हणूनच मी सबबींना 'अप्रिय गोष्टी चुकविण्याची ढाल' असें म्हणतो—किंबहुना 'भिडस्त माणसाची ढाल' हें नांव तिला चांगलें शोभेल. कारण प्रत्येक माणसाला दुसऱ्याच्या भिडेकरिता ज्या गोष्टी कराव्या लागल्या असत्या—त्या या ढालीआड राहून चुकविता येतात, दुसऱ्याच्या मर्जीविरुद्ध आपणाला पटणारें कृत्य करावयाचें असलें तरी या ढालीचा आश्रय करून तें करतां येतें—थोडक्यांत आपल्या मनाला व विचाराला पटणारी प्रत्येक गोष्ट दुसऱ्याच्या मर्जीविरुद्ध पण त्याचें मन न दुखविता करता येते—तेव्हां

'भिडस्त माणसाची ढाल' म्हणून या सबबींचें वर्णन केलें तर तें यथार्थ ठरेल यांत शंका नाहीं.

अशी ही 'भिडस्त माणसाची ढाल' व्यवहारांत उपयोगांत न आणणारे लोक कमीच! अगदीं 'सत्यप्रिय' व 'सडेतोडपणा'बद्दल शेखी मिरविणारे मुठभर लोक सोडून दिले तर प्रत्येकाला या ढालीचा केव्हां ना केव्हां तरी उपयोग करावाच लागतो. आणि अप्रिय सत्य सांगण्यापेक्षा सबबींच्या ढालीआड राहून लोकांचीं मनें शक्य तों न दुखविण्याची मानवी प्रवृत्ति जोंपर्यंत चालू राहील तोंपर्यंत या सबबी अबाधितपणें चालू रहाणारच. आज सबबी आहेत म्हणूनच पत्नीला न विचारता पतीला वाटेल तितका काळ अनिर्बंधित रीतीनें बाहेर हिंडता येतें, नेमुन दिलेला अभ्यास न करता विद्यार्थ्याला शाळेंत जाता येतें, परिक्षेंत नापास झाला असतानासुद्धां मुलाला वडिलांच्यापुढें उजळ माथ्यानें उभें राहता येतें, नको असलेलें निमंत्रण चुकविता येतें, पैसे खर्च करण्याचे प्रसंग टाळता येतात, दुसऱ्याला निष्कारण खर्चांत घालता येतें, जुळविलेलें लग्न मोडता येतें, न होऊं शकणारें लग्न घडवून आणता येतें–अशी एक ना दोन! किती तरी कार्यें आज या सबबींनीं साध्य करून घेता येतात. या 'कर्तुमकर्तुम्' सबबी-विरुद्ध सत्यनिष्ठ माणसांनीं कितीहि गवगवा केला तरी तिचें सामर्थ्य कमी होणार आहे थोडेंच! उलट 'सत्य हें सापेक्ष असतें. तुमच्या दृष्टीनें जें सत्य तीच आमच्या दृष्टीनें सबब आहे.' असें उत्तर तोंडावर फेंकून सत्यनिष्ठ माणसांचें तोंड बंद करण्यास सबबनिष्ठ लोक कमी करणार नाहीत आणि तोच सबबीचा मोठा विजय होय असें म्हटलें तर चुकेल कां फारसें?

---

# घासलेटच्या बारींत

त्या दिवशीं कल्पनाहि नसताना घासलेटच्या बारींत उभें राहण्याची आपत्ति एकाएकीं माझ्यावर कोसळली.

शाळा जरा लवकरच सुटली होती त्या दिवशीं. घरीं येऊन चहा वगैरे घेऊन पुस्तक मीं वाचायला उघडेंल इतक्यांत—" आज घरांत घासलेट नाहीं हं अजिबात. आज पुरुषांची बारी आहे. तेव्हां ही बाटली घेऊन घासलेट आणतां का ? " असा घरांतून विनंतीवजा हुकूम सुटला.

पण असे विनंतीवजा हुकूम ऐकून त्याकडे दुर्लक्ष करावयाची आम्हां पुरुषांना पूर्णपणानं संवय झालेलीच असते. पण आजचें वातावरण जरा निराळें होतें. युद्धमय वातावरणाची झळ घरांतही येऊन पोचली होती की काय कोण जाणे ! थोड्याच वेळांत माझ्यासमोर टेबलावर एक घासलेटची बाटली न फुटेल अशा बेतानें आपटली गेली आणि माझ्या हातांतील पुस्तक खसकन् ओढलें गेलें.

" आज घरांत अजिबात घासलेट नाही नी तुम्ही जर आत्तां घासलेट आणलं नाही तर संध्याकाळीं शेगडी पेटायची नाही हं ! दर खेपेला मीच बारींत उभं राहून घासलेट आणायचं हा न्याय कुठला ! तें कांही नाही ! आज तुम्ही बारींत उभं राहून घासलेट आणलंच पाहिजे. बारींत उभं राहण्याचा अनुभव तरी येऊ दे एकदा. "

" अग, पण किती वेळ जाईल या भानगडींत ! " मी नापसंती व्यक्त करण्याचा प्रयत्न केला.

" तुमच्या वेळेचं सांगू नका मला. " वेळेचाहि मुद्दा धुडकाऊन लावण्याच्या दृढ निश्चयानें ती म्हणाली, " सव्वापांचला शाळा सुटते आणि कित्येक दिवशीं सातसात वाजतात घरीं यायला ! तिथें वेळ गेलेला चालतो वाटतं ? "

" पण नोकरीचं बंधन असतं तिथं..."

" इथं संसाराचं बंधन आहे. चला उठा पाहूं आतां...घासलेट संपल्यावर का तुम्ही तिथं जाणार आहांत ? " या अखेरच्या फर्मानापुढं दुसरा कुणी पुरुष असता तरी काय करणार ? मुकाट्यानं खिशांतून तीन आणे काढले, बाटली उचलली व बाहेर पडलों.

शाळेंतून परत येताना स्त्रीपुरुषांच्या रांगाच्या रांगा मी दररोज पाहात असे आणि वाटत असे, काय घासलेटकरता हे लोक जिवाची आटापीट करतात! पण स्त्रियांना उद्योग तरी नसतो. बारीच्या निमित्तानं चारपांच बायका एकत्र येऊन रस्त्यावर गप्पांचा अड्डा करून करमणूक करून घेऊ शकतात. पण पुरुषांची या बारींत इतकी गर्दी कां व्हावी हें कोडं मला आतांपर्यंत सुटत नव्हतं. पण आज तें अनपेक्षितपणें सुटलं. सारे हुकुमाचे गुलाम बिचारे !

हातांतील बाटली शक्यतों कुणाला दिसू नये अशा रीतीनें धरीत मी दुकानापाशीं आलों. जवळजवळ एक फर्लांग रस्ता या बारीनें व्यापला होता. माझी छातीच दडपली. एकदां वाटलं—जावं परत. पण हातीं घेतलेलें कार्य तडीस नेल्याशिवाय परत कसं फिरायचं ? अखेर सत्तर माणसांचा एक पूल ओलांडून मी एकाहत्तरावा उभा राहिलों.

कां कुणाला ठाऊक, पण क्षणभर मला तिथं उभं राहतांना लाज वाटूं लागली. कदाचित् माझ्या अगोदरची सर्व मंडळी—त्यांच्या कपड्यांवरून तरी—हलक्या धंद्यांतील असावींत—त्यांच्या शेजारीं परटाचा स्वच्छ सदरा, शुभ्र धोतर नेसून उभं राहताना मला कससंच वाटलं ! पण दुसऱ्याचक्षणीं मला हंसू आलं. काय वेडं आहे मन ! वर्गांत शिकवताना समतेच्या कितीतरी गोष्टी मी विद्यार्थ्यांच्या मनावर ठसविल्या होत्या ! पण आज मला त्यांचे शेजारीं नुसतं उभं राहण्यांत देखील लाज वाटावी ! मनुष्य कल्पनेचा गुलाम आहे हें सत्य त्या वेळीं मला पटलं.

आपल्याला बारींत उभं राहिलेलं कुणी पाहील का, ही एक नवी-नच लाज माझ्या मनांत उत्पन्न झाली. वास्तविक घासलेटसाठीं बारींत उभं राहण्यांत लज्जास्पद काय होतं ? पण त्यांतहि माझ्या मनाला लाज वाटावी याचा अर्थ एकच—परिश्रमाच्या मोठेपणाची जाणीव मला पटली नव्हती हाच अर्थ ! बावरलेल्या दृष्टीनं मी इकडे तिकडे पाहात असतांनाच समोरून येणाऱ्या माझ्या एका मित्राची व माझी नजरानजर झाली व त्याच्या मिस्किल हास्यावरून मी ओळखलं कीं उद्या शाळेंत जाण्याची सोय नाही.

मन थोडंसं निर्ढावल्यावर जरा आजूबाजूला पाहूं लागलों. आमच्या पुढील पांच-सहाजण घासलेट घेऊन गेले होते व पांच सहांचं शेपूट मागं लागलं होतं. नुसता उभा राहून मी कंटाळलों. शेजारीं उभ्या असलेल्या एका मराठ्याशीं बोलणं सुरू करावं अशा विचारनं मी पुटपुटलों, “ किती वेळ आहे बुवा अद्याप ! ”

माझ्या पांढरपेशा वेषाला दबकत असलेल्या त्या मराठ्याला या पुटपुटण्यानं थोडं तोंड फुटलं, “ त्ये काअी इचारूं नका, रावसाब ! अव, तुमी तर आजच आलासां दिसतां. पन ह्यो परकार दररोज करावा लागतो ना आस्मानी ! ”

“ म्हणजे ? दररोज उभं राहतां तुम्ही बारींत ? ” मी जरा आश्चर्यानं विचारलं.

“ नाही तर कसं ? योक आन्याचं अक्षी घासलेट मिलनार नी त्ये आमाला योक रातबी पुरत न्हाअी ! पुरुषांच्या बारीच्या वेळीं आमी येतों, आवांच्या बारीच्या वेळीं आमच्या कारभारनी येतात ! ”

“ या युद्धामुळं तर जगणं अगदी नकोनकोसं केलंय् ! ” मागच्या बाजूला उभा असणारा एक माणूस म्हणाला.

" हंऽ! तें तर विचारूंच नका." कांहीतरी बोलायचं म्हणून मीं म्हटलं. आमचं संभाषण सुरू असतांनाच आमच्यांतील व आघाडीमधील अंतर झपाट्यानं कमी कमी होत होतं.

" आता ते लोक पाहा!" तो मागचाच मनुष्य घासलेट घेऊन चाललेल्या तीनचार मराठ्यांकडे बोट दाखवीत म्हणाला, " जवळजवळ साडेतीनपासून ते बारीत नंबर लावून बसले आहेत. साडेतीन ते सहा हा त्यांचा पैसा मिळण्याचा वेळ आज फुकट गेला, प्राप्ति बुडाली! बरं! न येऊन तरी काय करणार बिचारे! घरीं रॉकेलची एक चिमणी तरी मिण-मिण जळली पाहिजे ना?"

" अरे, तो पाहलात माणूस? मघेंच शिरला पाहा! सबंध भरून बाटली घेतली पाहा त्यानं दुकानदाराकडून!" माझ्या पाठीमागचा दुसरा नंबर ओरडला, " दर बारीच्या वेळीं मी याला पाहतों आहे. चांगला लाअीट आहे घरांत अन् याला आठवड्यांतून दोनदोन बाटल्या कशाला लागतात?"

" साठा करून ठेवीत असेल." मीं सुचवलं.

" अहो, असे लोक भरमसाट रॉकेल नेतात अन् मग गरिबांना रिकामी बाटली नेऊन अंधारांत बसावं लागतं! यांना पहिल्यांदा घासलेट देण्याचं बदं केलं पाहिजे." त्या माणसानं आपला सात्त्विक संताप व्यक्त केला.

हळूहळू आमचा नंबर वर येत चालला होता. माझ्या मनांत विचार चालले होते—'युद्धामुळं युरोपमध्यें प्रळय माजला असेल; पण हिंदुस्थानां-तहि त्यामुळं कमी डोंब उसळला नाही! जीवनाला आवश्यक जिनसा महाग झाल्यामुळं प्रत्येक हिंदवासीयाच्या जीवनांत केवढा मोठा डोंब उसळला आहे! कित्येक लोक अर्धपोटी रहात असतील, कित्येक अर्भकांना दूधहि मिळत नसेल, कित्येक बालकं सत्वहीन अन्नामुळं कोमेजून जात असतील!'

त्याच दिवशीं सकाळीं वर्तमानपत्रांत बंगालच्या दुष्काळाचं वाचलेलं हृदयद्रावक वर्णन माझ्या डोळ्यांसमोर उभं राहिलं.

या काळ्यकुट्ट विचारांना साथ करण्याकरिता की काय अचानक पावसाची जोराची सर आली. आमच्या हक्कांच्या प्रतिनिधि म्हणून रस्त्यांवर बाटल्यांची स्थापना करून आम्ही सर्वजण निवाऱ्याच्या जागेकरिता पळालों. रॉकेल देणंहि थोडावेळ बंद पडलं.

पाऊस थांबला व आम्ही आमच्या पूर्वीच्या जागा घेतल्या. घासलेट मिळालेले लोक आनंदी मुद्रेनें परतत होते. मला वाटलं, 'आपण सर्वच सुखाचा स्वीकार करण्याकरिता रांगेत उभे आहों. प्रत्येकाची पाळी आली म्हणजे त्याला तो सुखाचा वाटा मिळणार यांत शंका नाही. मग त्याकरिता बारीत वाट पाहात थांबावं लागलं तर त्याबद्दल आपण कुरकुर कां करावी !'

———

# कांही तरी जगावेगळं !

" इश्श ! कसल्या भडक रंगाचं पातळ नेसलीं आहे मुलगी ती ! " रस्त्यानें जाता जाता माझ्या पत्नीनें एका तरुणीकडे पाहून नाक मुरडलें, " तांबडा रंग काय अन् त्यावर पिवळे पट्टे काय ! अन् किती झिरझिरीत आहे तें ! सारं अंग दिसतंय् त्यांतून. "

मी सहज कुतूहलानें माझ्या पत्नीच्या टीकाविषय झालेल्या तरुणीकडे नजर वळवली. पातळ भडक रंगाचं होतं खरंच—थोडंसं तलमहि होतं. पण त्यांत मला गैर कांहीच वाटलं नाही. उलट त्या तरुणीच्या सडपातळ अन् गौर बांध्याला तें कांहीसं खुलूनच दिसत होतं !

" कांही वाईट नाही बरं कां तें ? " मी म्हटलें, " रंग थोडासा निराळा आहे—पण शोभून दिसतें आहे तिला तें ! तुझी आपली कांही तरीच टीका असते. "

पण माझं म्हणणं तिला पटल्यावर माझी पत्नी कसली ती ?

" अहो म्हणतां काय ? " ती जरा आश्चर्यचकित झाल्यासारखें दाखवून म्हणाली, " हें पातळ तिला शोभून दिसतें आहे ? कमाल आहे बाई तुमची आणि तुमच्या सौंदर्यविषयक कल्पनांची ! अहो सगळे लोक हसताहेत तें पातळ पाहून ! बाकी कांही तरी जगावेगळं करायची संवयच लागली आहे आजकालच्या मुलींना ! "

स्वतःला मोठी आजीबाई समजून तिनें उच्चारलेल्या त्या वाक्याची मला मोठी गंमत वाटली.

" कांही कां असेना ? " मी म्हटलें, " पण कांही तरी जगावेगळं करून तिनं कांही काळ आपलं लक्ष तर ओढून घेतलं ना ? तिनं जर साधाच पेहाख केला असता तर तिच्याकडे आपलं लक्ष तरी कशाला गेलं

असतं आणि तिच्यावर आपण चर्चा तरी कशाला केली असती! असं कांही तरी जगावेगळं केल्याशिवाय जगाचं लक्ष आपल्याकडे वेधलं जात नाही."

त्यावर आमच्या सौभाग्यवतीनें नुसती मान हलवली. जणूं तिला म्हणायचं होतं, "कांही तरी जगावेगळंच तुमचं बोलणं!"

कांहीसं जगावेगळंच माझं बोलणं होतं हें खरं आहे. सहजच मी तिला गप्प करण्यासाठीं तें वाक्य तिच्या तोंडावर फेकून दिलें होतें—पण नकळतच मी व्यवहारांतील केवढें तरी सत्य सांगितलें होतें! आजकाल सामान्य चालीनें चालणारा माणूस जगापुढें कधींच येत नाही. सर्वसाधारण लोकांप्रमाणे तुम्ही राहात असलांत—त्यांच्याप्रमाणेच वागत असलांत व तसलेंच सामान्य जीवन कंठत असलांत तर तुम्ही सागरांत पडलेल्या जलबिंदूप्रमाणे केव्हांच लुप्त होऊन जाल—जग तुमची वास्तपूसहि करणार नाही—पण कांही तरी जगावेगळं करावयास तुम्हीं सुरवात केलीत कीं ताबडतोब जगाचें लक्ष तुमच्याकडे वेधेल आणि तुमच्या कार्याच्या स्वरूपाप्रमाणे टीका—स्तुतींनीं तुमचा परामर्ष घ्यावयासहि तें कमी करणार नाही. जर तुम्ही कांही तरी जगावेगळं कार्य करण्यांत आपल्या बुद्धीचा प्रकर्ष दाखविलांत आणि जगाला अन्तिम कल्याणाचा वा ज्ञानाचा नवा मार्ग दाखवून दिला तर जग तुमच्या बुद्धीचें कौतुक करील. प्रसंगीं तुम्हांला डोक्यावर घेऊन नाचेल; पण जर केवळ लोकांना विरोध करावयाचा या कल्पनेनेंच तुम्ही जर जगावेगळं कांही करूं लागलांत तर अर्थात् तुमची संभावना अगदीं निराळ्या तऱ्हेनें होईल.

जगावेगळें कांही तरी करावं असं अंतःकरणांतून किती तरी लोकांना वाटत असतं आणि त्यांचे हेतू सुद्धां त्यांत किती निरनिराळे असतात! कांही लोक केवळ 'येन केन प्रकारेण' प्रसिद्धि मिळावी या उद्देशानें या मार्गाचा आश्रय करतात; कांही लोकांची असं वागण्यांत, लोकांनीं आपणाला तऱ्हेवाईक म्हणावं, अशी इच्छा असते; कांही लोक केवळ बुद्धीला

पटतें म्हणून तसं वागतात, त्यांना लोकांच्या स्तुतीची किंवा टीकेची पर्वा नसते; कांही लोक स्वतःच्या सुखसोयीसाठीं तसें वागतात; तर कांही लोक समाजाच्या व लोकांच्या अन्तिम कल्याणासाठीं तसें वागतात.

केवळ प्रसिद्धि मिळावी, आपलं नांव सगळया लोकांच्या तोंडीं व्हावं म्हणून केवळ 'जगावेगळे' वागणारे लोक बहुतेकांच्या उपहासाला पात्र होतात. पण त्यांना त्याची पर्वा नसते. आपण कांही तरी विलक्षण केलं, क्षणभर सर्वांना धक्का दिला या समाधानांतच ते दंग असतात. पुण्याच्या एका प्रसिद्ध कॉलेजमध्यें चार पांच कॉलेज विद्यार्थ्यांनीं तसा प्रयत्न केल्याचें मला आठवतें. साधारण अकरा वाजण्याची वेळ होती. कॉलेज सुरू व्हायला पंधरा मिनिटें अवकाश होता. सारे कॉलेजचे विद्यार्थी पटांगणांत इकडे तिकडे वावरत होते. विद्यार्थिनी उद्यानांत बागडत होत्या. अशा वेळीं एकदम जिकडे तिकडे खळबळ उडाली; जो तो एका विशिष्ट दिशेकडे पाहूं लागला. कॉलेजच्या गेटमधून एक उघडी बैलगाडी येत होती आणि त्या बैलगाडींत गंभीर चेहरा करून सूट, पॅंट, नेकटाय वगैरे अद्यावत् पोषाख केलेले चार कॉलेजचे तरुण बसले होते. आणि पांचवा तसाच पोषाख केलेला तरुण बैलांच्या शेपट्या पिळीत 'हैक–हैक' करीत गाडी चालवीत होता. बैलगाडी गेटपासून पोर्चपर्यंत येईपर्यंत साऱ्या कॉलेजच्या विद्यार्थ्यांची तें दृश्य पाहण्यासाठी रांग लागली होती. आणि 'बक् अप्' 'चिअर अप्'च्या आरोळयांनी तर सगळें कॉलेज दुमदुमून गेलें होतें. शेवटीं प्रिन्सिपॉलला ही भानगड काय आहे तें पहाण्यासाठी बाहेर यावें लागलें म्हणे. पुढें जवळजवळ एक महिना साऱ्या पुण्याच्या कॉलेजसृष्टींत याच प्रकारणाची चर्चा चालली होती.

शाळेच्या सृष्टींत सुद्धा एका विद्यार्थ्यानें असा प्रयत्न केला. सातवीच्या वर्गांतील विद्यार्थी होता तो. शाळा सुरू होऊन शिक्षक आपापल्या वर्गांत शिरले; सातवीच्या वर्गावर संस्कृतच्या शिक्षकाचा तास होता. त्यांनीं आपलें पुस्तक उघडलें आणि वाचायला सुरवात करणार इतक्यांत 'May I

come in Sir ?' असा प्रश्न व हास्याचा कल्लोळ त्यांना एकदमच ऐकूं आला. आश्चर्यानें त्यांनीं दाराकडे पाहिलें तों दरवाजांत त्याच वर्गातील एक विद्यार्थी पायांत जोडा, धोतराचा सोगा पुढें सोडलेला, वर काळा लांब कोट व त्यावर एक उपरणें आणि डोक्यावर लाल पगडी अशा पोषाखांत मोठ्या गंभीरपणानें उभा होता. क्षणभर ते शिक्षक आश्चर्यानें स्तिमितच झाले. पण ते मोठे प्रसंगावधानी होते. या वेळीं त्याच्याशीं वाद करण्यांत अर्थ नाही, हें त्यांनीं ओळखलें व त्यांनीं त्याला आंत येण्याची परवानगी देऊन आपला अभ्यास शांतपणें पुढें सुरू केला. मुलें सारखी त्या मुलाकडे पाहून हंसत होतीं; पण तिकडेही त्यांनीं दुर्लक्ष केलें. तासाच्या शेवटीं त्यांनीं त्या मुलाला उभे करून त्याला त्या विचित्र वेषासंबंधीं खुलासा विचारला.

"विचित्र वेष ?" त्या मुलानें आश्चर्य वाटल्यासारखें दाखवून विचारलें, "हा तर आमचा वाडवडिलांचा पोषाख आहे–त्यांत विचित्र काय आहे ? आपण आज आपली संस्कृति विसरत चाललों आहोंत–परकीयांचें अनुकरण करण्यांतच आपण सर्वस्वी समाधान मानतों. तेव्हां मी आपल्या आर्यसंस्कृतीचें पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न करणार आहे."

शिक्षकानें त्याचा 'आर्यसंस्कृतीच्या पुनरुज्जीवना'चा, मुद्दा बरोबर उचलला. त्यांनीं आर्यसंस्कृतीचें पुनरुज्जीवन करण्याच्या त्याच्या त्या प्रयत्नाबद्दल त्याचें अभिनंदन केलें आणि तोच मुद्दा पुढें चालवून त्याच्यावर प्रश्नोपप्रश्नांचा मारा सुरू केला. त्याला आर्यसंस्कृतीचें खरोखर पुनरुज्जीवन करावयाचें होतें काय ? आर्यसंस्कृतीचें पुनरुज्जीवन म्हणजे केवळ पोषाखाचें पुनरुज्जीवन असें त्याला वाटतें काय ? तसें नसल्यास आर्यसंस्कृतीचीं तत्त्वेंही त्यानें आचरणांत आणण्यास सुरवात केली आहे काय ?–पूर्वजांच्या पोषाखांप्रमाणे पूर्वजांच्या शिक्षणपद्धतीचें तो अनुकरण करणार आहे काय ? तसें असेल तर संस्कृत पाठशाळेंत जायचें सोडून तो इंग्रजी शाळेंत कां आला ?–'न वेदेत् यावनीं भाषां प्राणैः कण्टगतैरपि' हें तत्व त्याला माहीत नव्हतें काय ?... इत्यादी प्रश्नांचा मारा करून त्याला त्यांनीं अगदीं

शरमिंदा करून सोडलें व सर्व विद्यार्थ्यांच्या उपहासाचा विषय बनविलें. 'येन केन प्रकारेण' प्रसिद्धि मिळविण्याचा त्यानें प्रयत्न केला–पण त्या शिक्षकालाच त्याच्यामुळें प्रसिद्धि मिळाली व तो मात्र विद्यार्थ्यांच्या चेष्टेचा विषय होऊन बसला.

अशा या ना त्या प्रयत्नानें जगावेगळें कांही तरी करून प्रसिद्धि मिळविण्याच्या विदुषकी प्रयत्नाला कांहीच किंमत नसते–सर्कशींत विदुषक जसे उलट्यासुलट्या कोलांट्या उड्या मारून लोकांना हंसविण्याचे प्रयत्न करतात किंवा सिनेमा–नाटकांतील विनोदी पात्रें ज्याप्रमाणे कांही तरी विचित्र कृतींनीं लोकांचें मनोरंजन करतात तशीच कांहीशी यांची कृति असते. सुदैवच कीं लोकांचें लक्ष आपणाकडे जावें म्हणून भररस्यांत डोक्यावर उभे राहण्याचें किंवा हातावर चालण्याचे प्रयोग ते करीत नाहीत. बाकी वेड्याच्या इस्पितळाचें भय नसतें तर तेंहि करावयास त्यांनीं कमी केलें नसतें म्हणा.

कांही लोकांना केवळ आपणाला लोकांनीं तऱ्हेवाईक म्हणावं, म्हणून जगा वेगळं वागावंसं वाटतं! लोकांपेक्षा आपण कांही तरी निराळे आहोंत असं त्यांना दाखवायचं असतं–पण तसं करण्यांत त्या गोष्टी त्यांना पटलेल्याच असतात असं मात्र नाही. आपला म्हणून कांही निराळेपणा आहे असं ते वारंवार दाखविण्याचा प्रयत्न करतील. लोकांना ज्या गोष्टी आवडतात त्या त्यांना आवडायच्या नाहींत–आणि ज्या लोकांना आवडत नसतील त्याच गोष्टी यांना उत्कृष्ट वाटतील. विशेषत: हा आपला निराळे-पणा वेळीं अवेळीं संभाषणांच्या, वर्तनाच्या व लेखनाच्या द्वारें लोकांच्या नजरेस आणून देण्याचा ते कटाक्षानें प्रयत्न करतील. लोकापेक्षा वेगळीं मतं प्रतिपादन करण्यांत आपण आपला मोठेपणाच व्यक्त करतों अशीच यांची समजूत असते.

त्यामुळें सामान्य शिष्टाचाराचीं बंधनें ते पुष्कळ वेळां–कांही कारण नसतांना–झुगारून देतात. कोणी त्यांच्याकडे सहज गप्पा मारावयास गेला

तर चक्क 'रिकाम्या गप्पा मारण्यास मला वेळ नाही' असें ते त्याच्या तोंडावर सांगतील. एकादा चित्रपट सर्व लोकांस आवडला असला तर तो चित्रपट 'भिकार' आहे असं मत प्रतिपादन करतील, इतकेंच नव्हे तर त्याच्याहि पुढें जाऊन चित्रपट पहाणेंच वाईट आहे असेंहि सांगायला ते कमी करणार नाहीत. सामान्य लोकांना अतिशय आवडलेली ललितकृति यांना भिकार वाटेल व सामान्य जनतेस बोजड व ओबडधोबड वाटणारी ललितकृति डोक्यावर घेऊन ते तिचा गौरव करतील.

कुठें कसें वागावयाचें याचेंहि तारतम्य ते कधीं कधीं मुद्दामच ठेवीत नाहीत कीं काय कोण जाणें. एकदां एका कॉलेजच्या टीमनें नॉर्थकोट शील्ड मिळविलें होतें. म्हणून त्या टीमचा व त्या टीमच्या कप्तानाचा सन्मान करण्यासाठीं असेंब्ली हॉलमध्यें एक सभा भरली होती. पुष्कळांचीं कप्तानाच्या व खेळाडूंच्या गुणवर्णनपर भाषणें झालीं. शेवटीं एक विद्यार्थी उठला व त्यानें भाषण करावयास सुरवात केली. त्यानें प्रथमच एक विधान केलें, "मित्रहो, आपल्या क्रिकेटच्या संघाला ही ढाल केवळ योगायोगानें मिळाली आहे. खेळाडूंच्या खेळांतील नैपुण्याचा वांटा त्यांत फार कमी आहे." हें वाक्य बाहेर पडल्यावरच विद्यार्थ्यांनीं 'शेम, शेम' असा ओरडा करून भाषण बंद पाडण्याचा प्रयत्न केला. पण कप्तानाच्या विनंतीवरून सर्व विद्यार्थी शांत झाले व त्याचें भाषण पुढें सुरू झालें. त्या भाषणांत त्यानें टीमबद्दल व विजयाबद्दल कितीतरी अप्रिय गोष्टी सांगितल्या. त्याच्या मतें टीमची निवड करताना कप्तानानें घोडचुका केल्या होत्या—उत्कृष्ट गोलंदाजाचा समावेश टीममध्यें केला नाही—टीममध्यें सांघिक एकी नव्हती—विरुद्ध टीममधील दोन उत्कृष्ट खेळाडू आजारीपणामुळे येऊं शकले नाहीत व त्यांच्या खेळाच्या वेळेला पाऊस येऊन पिच ओलें झालें होतें म्हणून केवळ हा विजय त्यांना मिळू शकला इत्यादि. हें भाषण चालू असताना कितीदां तरी 'बसा खालीं' 'ओढा त्याला खालीं' अशा आरोळ्या विद्यार्थीवर्गांतून उठल्या. पण या बहाद्दरानें भाषण संपे-

पर्यंत आपली जागा सोडली नाही. या भाषणानें त्याची कीर्ति कॉलेज-मध्यें चांगलीच पसरली व 'चक्रम्' म्हणून विद्यार्थी त्याला ओळखूं लागले. पण आपण जगावेगळें कांही तरी केलें या आनंदांतच तो दंग होता.

अर्थात् अशा रीतीनें विनाकारणच जगावेगळें वागण्यांत या व्यक्तीचा फारसा स्वार्थहि साधत नाही किंवा परार्थहि साधत नाही. पण केवळ सामान्य जनतेच्या मताविरुद्ध मतं प्रतिपादन करावयाचीं या पलीकडे त्यांच्या वागण्याला कोणताच निकष नसतो. पण त्याच्या उलट एकादी गोष्ट बुद्धीला पटत नाही म्हणूनच केवळ कांही लोक जनतेच्या प्रचलित मतप्रणालीविरुद्ध जातात व जगावेगळें कांही तरी करतात. या त्यांच्या कृतीला बुद्धीचा, विचाराचा निकष असतो आणि त्यामुळे प्रथम जरी यांचीं मतें समाजाला धक्का देणारीं वाटलीं तरी तीं हळू हळू लोकांना पटूं लागतात. रूढीविरुद्ध बंड करणारे समाजसुधारक याच 'जगावेगळं कांहीं-तरी' करणाऱ्याच्या वर्गांत येतात. लोकहितवादींनीं आपल्या लिखाणांतून ज्या वेळीं ब्राह्मणांवर व रूढीवर शस्त्र उचललें त्यावेळीं समाजांत केवढी तरी खळबळ माजली असेल. आगरकरांनीं स्त्रियांना शिक्षण द्यावें, बालविधवांना पुनर्विवाह करावयाची मोकळीक असावी व आपल्या समाजांतील दुष्ट रूढी टाकून देऊन बुद्धीला पटतील अशा सुधारणा समाजांत कराव्या अशी मतप्रणाली पुढें मांडली, तेव्हां तर समाजानें आगरकरांना बंडखोर ठरवलं व त्यांची जिवंतपणीं स्मशानयात्रा काढली. पण त्यांनीं ज्या ज्या 'जगा-वेगळ्या' गोष्टींचा पुरस्कार केला त्यांत त्यांचा स्वार्थ नव्हता. त्यांची प्रसि-द्धीची हांव नव्हती किंवा त्यांचा तऱ्हेवाईकपणा नव्हता. त्यांनीं आपण प्रतिपादलेली प्रत्येक गोष्ट बुद्धि-प्रामाण्याच्या निकषावर घासून घेतली होती. आणि म्हणूनच आज आपण आगरकरांना मोठे सुधारक म्हणतों व त्यांचे स्मृतिदिन दरसाल साजरे करतों.

आज विसाव्या शतकांत सुद्धां बुद्धीला पटणाऱ्या किती तरी गोष्टी आचरणांत आणण्याचें सामर्थ्य आपणामध्यें नसतें. आपल्या धार्मिक

विधींपैकीं किती तरी विधि असे आहेत कीं त्यांचा आज सांगाडा राहिला आहे—त्यांतील सत्त्व केंव्हांच लोपलें आहे. उदाहरण म्हणून 'उपनयना'च्या विधीकडे बोट दाखविता येईल. उपनयनाची मूलभूत कल्पना केंव्हांच लोपली—तरी अद्याप आपणाकडे अर्थ नसलेलीं मातृभोजनें वगैरे चालूंच आहेत ना? विधवांनीं पुनर्विवाह करावा हें तत्त्व बुद्धीला पटतें—पण आज किती पुनर्विवाह होत आहेत? जातिभेद नाहीसा करावा हें सुद्धां आपणाला समजतें, तरी पण विवाह ठरवितांना आजहि गोत्र, प्रवर पाहिले जातात—मग जात पाहिली जात असेल यांत काय आश्चर्य? याचं खरं कारण एकच—बुद्धीला पटतें पण 'जगावेगळें' कांही तरी करून जनतेचा रोष पतकरण्याचें धैर्य सामान्य माणसाला नसतें—आणि म्हणून सुधारणा नेहमीं मुंगीच्या पावलानें प्रगति करीत असते.

बुद्धीला पटणाऱ्या पण लोकविरहित वर्तन करणाऱ्या लोकांना जनतेकडून 'विक्षिप्त' या विशेषणाचा आहेर करण्यांत येतो. माझा एक मित्र असाच 'विक्षिप्त' आहे. दसऱ्याच्या दिवशीं त्याच्याकडे कांही विद्यार्थी सोने घेऊन गेले. त्यानें तें सोनें घेतलें तर नाहीच, पण त्या सणाच्या निरर्थकतेविषयीं एक मोठें व्याख्यान मात्र त्यानें सर्वांना ऐकवलें. दिवाळींत नर्कचतुर्दशीच्या दिवशीं सर्व घरीं पहांटे स्नानाची, फटाक्याची वगैरे मोठी दंगल उडून जाते, त्यावेळीं हे राजेश्री सूर्योदयानंतर उठतात. दिवाळींत याच्या घरीं भाजीभाकरीशिवाय दुसरा बेत आढळणार नाही. आषाढी एकादशीच्या दिवशीं कांद्यांची भर्जी खाताना याला मोठा आनंद वाटतो. या सर्वाला तो बुद्धीला पटणारी कारणें देतो—पण लोकांच्या भावनेला तीं पटत नाहींत. म्हणूनच लोकांनीं त्याला 'विक्षिप्त' ठरविलं आहे. आणि त्या 'विक्षिप्ता'ला लग्नकार्याचें, मुंजीचें किंवा इतर कोणतेंही आमंत्रण द्यायला सहसा कोणी जात नाही. कारण आपल्या बुद्धिप्रामाण्याची धार आमंत्रण द्यावयास आलेल्या त्या गृहस्थावर चालवून त्या

माणसाला तो अगदीं खजील करून सोडतो. त्यामुळें 'कुठून या वेड्याकडे आलों' असें त्याला होऊन जातें!

राजकारणांत तर बुद्धिप्रामाण्याची ढाल वापरून लोकमान्य पुढाऱ्यांविरुद्ध जाणारा माणूस तर जनतेंत अधिकच अप्रिय ठरतो. सामान्य जनतेची त्या पुढाऱ्यावर अंधश्रद्धा असते आणि त्याच्या विरुद्ध कुणी ब्र काढला—मग तें कितीहि खरें कां असेना—तर तें त्यांना सहन होत नाही. अशा वेळीं गालिप्रदानापासून दगड धोंड्याच्या आहेरापर्यंत सर्व गोष्टी त्याला सहन कराव्या लागतात—किंबहुना कांही कांही वेळां अतिशय गंभीर प्रसंगांनाहि त्यांना तोंड द्यावें लागतें. हिटलरच्या कारकीर्दीत त्याची मतप्रणाली न स्वीकारलेल्या लोकांचा झालेला छळ अद्याप सर्वांच्या स्मरणांत ताजा आहे. महात्मा गांधींनीं कायदेभंगाची चळवळ ज्या वेळीं सुरू केली त्या वेळीं ती चळवळ बुद्धीला न पटलेले किती तरी लोक होते. आणि ज्यांनीं ज्यांनीं आपला प्रामाणिक मतभेद त्या वेळीं व्यक्त केला त्यांना जनतेचा रोष मात्र स्वीकारावा लागला. राजकारणांत बुद्धीवर भिस्त ठेवून 'जगावेगळं' वागण्यानें आपल्या सद्सद्विवेकबुद्धीचें समाधान होतें हें खरें आहे पण लोकांच्या रोषाचा जास्तींत जास्त अनुभव त्याला घ्यावा लागतो, आणि तो अनुभव फारसा स्पृहणीय खासच नसतो; गॅल्सवर्दीच्या मॉब नाटकांतील 'मॉर'चें स्वभावचित्र त्या दृष्टीनें अभ्यासनीय आहे. इंग्लंडसारख्या बलाढ्य राष्ट्रानें आफ्रिकेंतील एका रानटी व दुबळ अशा राष्ट्राविरुद्ध युद्ध पुकारावें हें त्याला पटलें नाही. त्यानें लोकविरोधाला न जुमानतां त्याविरुद्ध प्रचार करावयास सुरवात केली आणि त्याचा परिणाम असा झाला कीं, सर्व जनता त्याच्यावर उलटलीच—पण—खुद्द त्याची बायको व मुलं त्याला सोडून गेलीं—आणि आपल्या मतासाठीं एकटा झगडत तो लोकांच्या रोषाला बळी पडला.

'जगावेगळं कांही तरी' करून लोकांचा छळ सहन करूनही जगाला अंतिम कल्याणाचा मार्ग दाखविणारे किती तरी महात्मे

निरनिराळया राष्ट्रांत व निरनिराळ्या धर्मांत होऊन गेले. प्रत्येक धर्मसंस्थापकाला त्या वेळच्या जनतेचा रोष सहन करावा लागला आहे. 'ज्ञानेश्वरी' च्या रूपानें गीतेचें तत्त्वज्ञान मराठी भाषेंत प्रथम आणून आणि सामान्य जनतेला भक्तिमार्गाचें द्वार उघडें करून बंडाचा पहिला झेंडा उभारताना ज्ञानेश्वरांना काय कमी विरोध सहन करावा लागला! समतेचें तत्त्व आचरणांत आणून सर्व जातींना परमेश्वराची भक्ति करण्याचा सारखाच अधिकार आहे, असें अट्टाहासानें पटवून देणाऱ्या एकनाथ–तुकाराम वगैरे संतकवींना तरी काय कमी विरोधाशीं झगडावें लागलें ? त्यांचें स्वतःचें जीवन जगावेगळें होतें–पण त्या जगावेगळ्या जीवनांतून त्यांनीं समाजाला व जनतेला मार्ग दाखविला. महात्मा गांधींचें आजचें अहिंसेचें तत्त्व जगावेगळेंच नाही का? पण त्या अहिंसेच्या तत्त्वांतून जागतिक शान्ततेच्या व समतेच्या तत्त्वाचा केवढा मोठा संदेश त्यांनीं दिला आहे? आज त्यांचें तत्त्व लोकांना 'जगावेगळं' वाटत असलं तरी राष्ट्रांराष्ट्रांतून प्रेमाचे संबंध दृढ करण्यास व अखिल मानव-जातींत बंधुभाव निर्माण करण्यास त्यांच्या अहिंसेच्या तत्त्वाचाच आश्रय लोकांना शेवटीं घ्यावा लागेल.

शिवाय आपण ज्या गोष्टींना 'जगावेगळं' असं आज म्हणतों त्या उद्यां जगावेगळ्या राहतीलच असें थोडेंच सांगता येणार आहे? इतिहासाचा तरी दाखला तसा नाही. ज्या गोष्टी आपल्या पूर्वजांना 'जगावेगळ्या' वाटत होत्या त्या आपण आज नित्याच्या म्हणून पहातोंच कीं ! आगरकरांच्या काळांत एकादी मुलगी पुस्तकें घेऊन शाळेंत निघाली कीं लोकांना कोण आश्चर्य वाटे–तिच्यावर निंदेचे व टीकेचे किती प्रहार होत–पण तेच आपण आज मुलींच्या झुंडीच्या झुंडी शाळा-कॉलेजांत शिरताना पाहतोंच कीं ! पंचवीस वर्षांपूर्वी शेपटा घातलेली तरुणी म्हणजे आश्चर्य समजलें जात असे–आज त्याच्या उलट शेंपटा न घातलेली तरुणीच आश्चर्याचा विषय होऊन बसण्याइतकी वेळ बदलली आहे. पतिपत्नींनीं घरांतील दुसऱ्या

कोणाही मंडळीदेखत एकमेकांशीं बोलणें दूरच—पण एकमेकांकडे पाहून हंसणें—म्हणजे देखील विनयाचें अतिक्रमण समजलें जात असे. पण आज वडील माणसांच्या देखत हातांत हात घालून राजाराणी ऐटींत फिरावयास निघालेले आपण रस्तोरस्तीं पहातोंच कीं !

—आणि म्हणूनच आज 'भडक रंग' म्हणून माझ्या पत्नीनें ज्या तरुणीच्या पातळाकडे पाहून नाक मुरडलें होतें तें उद्यां बहुतेक तरुणींच्या अंगावर दिसूं लागलें तर मला आश्चर्य वाटणार नाही.

किंबहुना माझी पत्नीच तसलें पातळ आपणाला विकत घेऊन देण्याबद्दल केव्हां तरी हट्ट घेईल अशी माझी खात्री आहे.

असें जर आहे तर 'कांहीं तरी जगावेगळं' म्हणून त्या पातळाला हंसण्यांत अर्थ उरला कुठें ?

# तुमच्या मनाचे चोरकप्पे

दैव व मनुष्य यांच्यामध्यें नेहमीं लपंडावाचा खेळ चाललेला असतो. माझ्या वडिलांकडे त्या दिवशीं आलेल्या गृहस्थाच्या एकंदर बोलण्यावरून तरी मला तसें वाटलें. तो वडिलांना सांगत होता--

" काय सांगू तात्यासाहेब, माझ्या आयुष्यांत प्रत्येक वेळीं माझ्यापुढं वाढून आलेलं सोन्याचं ताट मीं उधळून लावलं आहे. बी. ए. झाल्याबरोबर मला चांगली शंभर रुपये पगाराची सरकारी नोकरी मिळाली होती; आज ती कायम टिकवली असती तर तीनशेंपर्यंत गेलों असतों मी. पण मध्येंच कायदेभंगाच्या चळवळींत उत्साहानं नोकरी सोडली; आणि त्या स्वार्थत्यागाचं आज फळ काय ? तर सत्तर रुपयांवर खर्डेघाशी ! तीच गोष्ट गोदीच्या लग्नाची. पहिल्यांदा देशपांड्यांच्या वसंताला ती चांगली पसंत पडली होती. आज त्याच्याशीं तिचं लग्न झालं असतं, तर खरोखर पोरगी मोटारींतून हिंडली असती. पण मी कुळकर्ण्यांच्या पोकळ डामडौलावर भाळलों आणि आज खरोखर पोरीला दोनवेळ धड जेवणहि मिळण्याची मुष्कील पडली आहे. असे विचार आले की वाटतं, काळाचा प्रवाह परत माग फिरून पूर्वीच्या चुका दुरुस्त करण्याची प्रत्येकाला पुन्हां संधि मिळाली तर ! "

त्याचे ते उद्गार खरोखर हृदयभेदक होते. पण त्यामुळे माझ्या विचारांना एक निराळीच दिशा मिळाली. प्रत्येकाच्या जीवनांत असे अनुतापाचे उद्गार काढावयास लावणारे प्रसंग कितीतरी असतील ! प्रत्येकजण असे प्रसंग मनाच्या चोरट्या कप्प्यांत दडवून ठेवतो हें खरें आहे; पण वरील गृहस्थाप्रमाणे कधीं ना कधींतरी भावनांचा भर असह्य झाल्यामुळे हे मनाचे चोरटे कप्पे उघडले, तर त्यांत दिसणाऱ्या विचारांचें स्वरूप बहुधा उद्वेगजनकच असेल यांत शंका नाही. ' वाया गेलेली संधि '

'फुकट दवडलेला काळ', 'जीवनप्रवाहांत केलेली अक्षम्य चूक', 'निराशा' आणि 'अतृप्त आकांक्षा' यांनींच हा मनाचा चोरटा कप्पा भरलेला असेल.

मानवी जीवनांत परिस्थितीशीं झुंजतां झुंजतां पुष्कळ प्रसंग असे येतात, कीं ज्या वेळीं मनुष्य किंकर्तव्यमूढ बनतो. आपण कोणत्या मार्गानें जावें हें त्याला निश्चितपणें कळत नाही. त्यामुळे त्या वेळीं बरा दिसेल तोच मार्ग त्याला स्वीकारावा लागतो. आणि अशा मार्गांनीं जाणाऱ्या दहांपैकीं सात लोकांना तो मार्ग बराच चालून गेल्यावर असें वाटूं लागतें, कीं आपण दुसऱ्या मार्गांनीं गेलों असतों तर अधिक बरें झालें असतें! स्वतःच्या मार्गांतील काटेकुटे त्याला तीव्रतेनें बोचूं लागतात व दुसऱ्या मार्गानें जाऊन भरभराट पावलेल्या व्यक्तींचें सुख त्याच्या डोळ्यांत खुपूं लागतें. पण काळाचा प्रवाह बदलता येत नाही व त्याला त्याच रस्त्यानें कुरकुरत कां होईना पण चालावें लागतें. आपण या मार्गानें आलों ही चूक केली, असें कबूल न करण्याचा तेजस्वीपणा जरी त्याच्यामध्यें असला तरी मनाच्या त्या चोरटया कप्प्यांत पश्चात्तापाची जाणीव दडलेली असते हें खास.

पण पुष्कळ वेळां अशा चुकांना मनुष्यापेक्षां दैवच जबाबदार असतें; पण मनुष्य मात्र त्याबद्दल स्वतःलाच दोष लावून घेत असतो. वास्तविक आपण केलेली एखादी गोष्ट चांगली का वाईट हें मनुष्य पुढील परिणामावरून ठरवीत असतो; पण ती गोष्ट करताना ते परिणाम आपणांपासून अज्ञात होते ही गोष्ट त्या वेळीं मात्र तो विसरतो. मघा-च्याच गृहस्थाच्या बाबतींत गोदूचें लग्न चांगल्या व्यक्तीशीं झालें कीं वाईट व्यक्तीशीं झालें हें त्यानें पुढील परिणामावरून ठरविलें. पण ते परि-णाम लग्नाच्या वेळीं त्याच्यापासून भविष्यकाळानें वा दैवानें झाकले होते. त्यामुळे त्याबद्दल तो स्वतःला कितीहि दोष लावून घेत असला तरी दैवापुढें तो अगतिक होता हें तितकेंच खरें. एखाद्या पित्यानें अनु

रूप वर पाहून आपली मुलगी त्याला दिली आणि लग्नानंतर दोनतीन महिन्यांतच ती विधवा झाली, तर त्या पित्यानें स्वतःपेक्षां मुलीच्या दुर्दैवालाच दोष देणें युक्त नाही का?

माझा एक मित्र आहे. लग्नापूर्वी दोन मुलींपैकीं कोणती पत्करावी हा त्याच्यापुढे पेच पडला होता. दोन्हीहि मुली सुरेख होत्या व सारख्याच शिकलेल्या होत्या. शेवटीं त्यानें जास्त हुंडा देणाऱ्या मुलीशीं लग्न केलें. पहिल्याच बाळंतपणांत त्या मुलीला बाळंतरोग जडला व ती ॲनिमिक बनली. पुढील चार वर्षांत त्या बायकोचीं आजारपणें काढताकाढता त्याचा जीव मेटाकुटीला आला. त्यामुळे मी ज्या ज्या वेळीं त्याच्याकडे जातों त्या त्या वेळीं तो चिडलेलाच असतो. आणि एखादे वेळीं भावनांचा आवेग असह्य झाला की तो म्हणतो, "खरोखर, या मुलीशीं लग्न करून फसलों मी! काडीचं सुख लागलं नाही मला या चार वर्षांत. त्यापेक्षां त्या दुसऱ्या मुलीशीं लग्न केलं असतं तर!"

अन् योगायोग म्हणजे त्या दुसऱ्या मुलीचें लग्न होऊन ती त्याच्या-समोरच राहावयास आली होती व तिचा संसार सुंदर चालला होता. त्यामुळे ज्या ज्या वेळीं त्याची नजर समोर वळे त्या त्या वेळी त्याच्या नजरेंत आपण केलेल्या अक्षम्य चुकीची जाणीव मला दिसे. वास्तविक हा त्याचा अनुताप व्यर्थच नव्हता का? मुलगी पसंत करताना आपल्या भवि-ष्यकालीन संसाराचे धिंडवडे त्याला थोडेच कळले होते!

मनुष्य कित्येक वेळां भावनेच्या भरांत परिणामाचा विचार न करता एखादें कृत्य करतो व नंतर पश्चात्तापाचे उसासे सोडीत आपलें सारें जीवन दुःखी करतो. अशा कितीतरी व्यक्ति आपणांस आपल्या सभोंवताली दिस-तील. माझ्या माहितींतील एका मुलीनें एका क्षुल्लक कारणावरून तावाता-वानें तिचें ज्याच्यावर प्रेम होतें त्या तरुणाशीं ठरलेलें लग्न मोडलें आणि

त्याचा सूड घेण्यासाठीं तावडतोब दुसऱ्या एकाशीं लग्न लावलें. त्यानंतर तीनच वर्षांनीं मला ती दिसली किती बदल झाला होता तिच्यांत! आपण केलेला अविचार तिच्या त्या करुण दृष्टींत पूर्णपणें प्रतीत होत होता. पण त्याबद्दल होणारा अनुताप ती कुणाजवळ व्यक्त करणार?

पण भावनेच्या भरांत आपण केलेली चूक कबूल करणारे प्रामाणिक लोक यांत फारच थोडे! आपल्या कृतीचें समर्थन करून आपल्या अविचारावर पांघरूण घालणाऱ्यांचीच संख्या जास्त असते. तरीपण त्यांच्या मनाच्या चोरट्या कप्प्यांत या पश्चात्तापाची आग नक्कीच धुमसत असत.

आळसांत घालवलेला वेळ व निरर्थक केलेला खर्च यांबद्दल तर उसासे सगळीकडेच ऐकू येतात. कॉलेजांत आपल्याबरोबर असलेले व परिश्रम करून आयुष्यांत यशस्वी झालेले लोक पाहून कॉलेज-जीवन आपण आळसांत घालवलें याबद्दल अनेकांना वाईट वाटत असतें; विशेषतः ज्यांनीं केवळ आळसामुळे आपलें शिक्षण अर्धवट सोडलें आहे अशा व्यक्तींना आपल्याबरोबरीचे जुने सहाध्यायी केवळ शिक्षणाच्या जोरावर पुढे जात आहेत हें पाहून अतिशय दुःख व्हावें यांत नवल नाही.

मनुष्याला दोन मनें आहेत किंवा नाहीत, अप्रत्यक्ष मनाची मीमांसा आज मानसशास्त्रज्ञांना मान्य आहे वा नाही, हे शास्त्रीय प्रश्न जरी आपण बाजूला ठेवले तरी आपणाला हें निश्चित सांगता येईल, की मनुष्याच्या मनांत खोलखोल कुठेतरी माणसाच्या अतृप्त आकांक्षा, जीवनांतील अक्षम्य प्रमादाबद्दलचा अनुताप आणि दुःख लपलेलें असतें. परिस्थितीमुळे पुष्कळ वेळां मनुष्याला आपल्या इच्छांना बांध घालावा लागतो आणि त्या अतृप्त इच्छा या चोरट्या कप्प्यांत येऊन दडतात. एखाद्या श्रीमंत व रूपवती तरुणीविषयीं अभिलाष बाळगणारा एखादा दरिद्री मनुष्य एखाद्या कुरूप पत्नीशीं संसार करीत असतांनासुद्धां आपल्या चोरट्या कप्प्यांत त्या सुंदर तरुणीविषयीची इच्छा दडवून ठेवत असतो.

एखादा मजूर मोटारगाडी उडविण्याचीं स्वप्नें मनांत बाळगीत असतो, तर एखादा सामान्य प्रतिभेचा मनुष्य जागतिक कीर्ति मिळविण्याचे गोड विचार मनांत बाळगत असतो. प्रत्येकाच्या जीवनांत अशा अतृप्त आकांक्षा व विरून गेलेलीं ध्येयें आपणाला पावलोपावलीं आढळतील.

पण या अतृप्त आकांक्षा परिस्थितीमुळे साध्य होत नसल्यानें मनुष्य त्याबद्दल इतका हळहळत नाही. जें आपणाला मिळणेंच अशक्य अशा गोष्टीबद्दल मनुष्य फार दुःख करीत नाही. पण आपण अमकी गोष्ट करण्याऐवजी अमकी गोष्ट केली व त्यामुळे आपल्या जीवनाचा ‘ सहारा ’ झाला ही जाणीव त्याला सदोदीत जाळीत असते. मग असे प्रमाद भावनेच्या भरांत झालें का अगतिक होऊन आपण तें केलें याचें भान त्याला राहात नाही. वाया घालवलेल्या संधीचें शल्य तर त्याच्या मनाला सारखें बोचत असतें. माझ्या स्वतःच्या मनाचें ज्या वेळीं मी पृथक्करण करूं लागतों त्या वेळीं असे किती तरी प्रमाद माझ्या मनाच्या चोरट्या कप्प्यांत दडलेले मला दिसतात. लहानपणीं व्यायाम केला नाही, सायन्स किंवा ॲग्रिकल्चरकडे जाण्याचें सोडून आर्ट्‌स्‌कडे आलों, किंवा मध्यंतरीं एक आयती आलेली चांगली नोकरी मी आपणहून हातची दवडली—असे अनेक चटके माझ्या मनाला अधूनमधून बसतात.

सभोवतालच्या माझ्या परिचितांकडे मी या नजरेनें पाहू लागलों तर त्यांच्याहि जीवनांतील हे खडे माझ्या नजरेला येतात. प्रत्येकाला हे खडे बोचतात; पण त्याबद्दल उघड तक्रार कुणीच करीत नाही. माझ्या एका दूरच्या नातेवाइकाला एक चांगली मुलगी केवळ पैशाकारितां नाकारली म्हणून पश्चात्ताप होतो. अर्थात् तो तें बोलून दाखवीत नाही; पण त्याच्या दृष्टींतील ती छटा मला ओळखू येते. दुसऱ्या एकाला आपण मुलाच्या आजारांत योग्य ती धावाधाव करून चांगल्या डॉक्टराचें साहाय्य केवळ अज्ञानामुळे न मिळविल्यानें दुःख होतें; तिसऱ्याला आपली आवडती

संगीतकला सोडून केवळ भावाच्या इच्छेसाठीं खडेंघाशी स्वीकारल्याबद्दल प्रश्चात्ताप होतो; चौथा कारकुनाऐवजी शिक्षक झालों असतों तर बरें झालें असतें असें म्हणतो, तर पांचवा शिक्षकापेक्षां कारकून झालों असतों तर अधिक बरें झालें असतें असे उद्गार काढतो ! या प्रत्येकाच्या जीवनांत असमाधानाचें व अनुतापाचें शल्य बोचत असल्याचें स्पष्ट दिसतें.

पण त्यांचेंच उदाहरण कशाला ? बहुधा आपणां सर्वांचेंच जीवन अशा तऱ्हेनें थोड्याफार प्रमादांनीं भरलेलें आपणाला दिसेल. कांहींच्या बाबतींत प्रमाद गंभीर स्वरूपाचे असतील, कांहींचे क्षुल्लक असतील. आणि त्यांतसुद्धां पुष्कळशा चुकांना मनुष्यापेक्षा दैवच कारणीभूत होत असतें. प्रत्येक मनुष्याला स्वतःचा भविष्यकाळ किंवा आपण करीत असलेल्या कार्यांचे परिणाम जर स्पष्ट दिसू लागले तर मनुष्याच्या हातून असे प्रमाद होणार नाहीत हें खरें ! पण तसा भविष्यकाळ प्रत्येकाला माहीत झाला, तर जीवन जगण्यांत तरी काय मौज राहणार ? भविष्यकाळांतील संकटें अगोदरच कळल्यानें मनुष्याचें जीवन कितपत सुखी होईल हा प्रश्न नाही का ? मनुष्य आशेवरच जगत असतो व ती आशा बहुधा भविष्यकालीन अज्ञानाच्या पोटींच जन्मत असते. दरिद्री माणसाला आपण जन्मभर दरिद्रीच राहणार हें कळलें, तर त्याला आपलें जीवन कितपत सुखावह वाटेल ?

पत्ते खेळताना प्रतिपक्ष्याच्या हातांतील सर्वच पत्ते आपणाला माहीत झाल्यास खेळण्यांत काय रंग चढणार आहे ? आपलें जीवन म्हणजे दैव व आपण या दोघांमधील पत्त्यांचा खेळच आहे. ज्याच्या हातीं चांगला डाव येईल तो जिंकणार हें उघड आहे. पुष्कळ वेळां मनुष्य दैवाच्या हातांतील बाहुलें बनतो. कित्येक वेळां मनुष्य जास्त प्रभावी ठरतो. आपण स्वीकारलेली नोकरी, आपण पत्करलेला मार्ग, आपण करीत असलेला विवाह इत्यादि आयुष्यांतील प्रत्येक प्रसंगीं मनुष्य अज्ञाताच्या पायरीवर

उभा असतो. त्या पायरीवरून खालीं टाकलेलें पाऊल आपणाला सुखाच्या मंदिराकडे नेईल कीं दुःखाच्या दरींत लोटेल याचा त्याला पत्ता नसतो. आणि या दृष्टीनें तो दैवाच्या हातांतील बाहुलेंच असतो असें म्हटलें तरी त्यांत काय चूक आहे ?

आणि म्हणूनच एका दृष्टीनें मला जीवन म्हणजे एक 'शर्यत' असल्यासारखें वाटतें. आपण ज्याच्यावर आपले सुखदुःख पणाला लावतो तो घोडा पहिला येईल कीं नाही याची आपणाला खात्री नसते. आपण निव्वळ अंदाज बांधतो. पुष्कळदां अंदाज खरे ठरतात; पुष्कळदा चुकतात. आणि आपले अंदाज चुकले तर आपणाला वाटतें "अरेरे, मी त्या दुसऱ्या घोड्यावर सर्वस्व लावलें असतें तर कितीं चांगलें झालें असतें !" पण शर्यत संपलेली असते व सुखदुःखापैकीं आपल्या वांट्याला आलेला भाग घेऊन आपणाला जीवनप्रवाहांत पुढें पुढें जावें लागतें. पण तसें जात असतांना मनाची वरकरणी पूर्ण समाधानी वृत्ति जरी आपण ठेवली, तरी मनाच्या चोरकप्प्यांत सारखें एक शल्य बोचून टोचणी देत असतें, कीं, " अरेरे ! मीं असें करण्याऐवजीं तसें केलें असतें तर ? "

---

# पुराणांतलीं वांगीं

एका पुराणिकाची अशी गोष्ट सांगतात कीं, चातुर्मासांत तो पुराण सांगताना लोकांना कळकळीनें उपदेश करी, " बाबांनो, कांदे, वांगीं वगैरे शास्त्रनिषिद्ध पदार्थ चातुर्मासांत खाऊं नका—तसें करणें पाप आहे. " वगैरे. एकदां घरीं गेल्यावर त्यानें आपल्या पत्नीला चमचमीत वांग्याचे काप करण्याची आज्ञा सोडली. पत्नी बिचारी होती भोळी ! तिनें आपल्या नवऱ्याचें पुराण नुकतेंच ऐकलें होतें. तेव्हां तिनें विचारलें, " अहो, तुम्हींच ना पुराणांत कांदे, वांगीं खाऊं नका म्हणून लोकांना उपदेश करतां ? " " मग ? त्यांत काय ? " पुराणिकबुवांनीं मोठ्या गंभीरपणानें म्हटलें. " अग, पुराणांतलीं वांगीं पुराणांत ! पुराण केव्हांच संपलं ! आतां काय त्याचें ? "

मला त्या दिवशीं ही गोष्ट आठविण्याचें कारण माझीहि स्थिति कांहीशी त्या पुराणिकासारखीच झाली होती. देवरूखच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्यें मला व्याख्यान देण्यासाठीं निमंत्रण आलें होतें. त्या वेळीं मीं विद्यार्थ्यांना, " मराठी भाषेचा अभिमान बाळगा, मराठी भाषेवर प्रभुत्व मिळवून तिचे पांग फेडा, दररोज मराठींतील उत्तम वाङ्मयापैकीं थोडेंफार वाचण्याची संवय ठेवा आणि मराठीमध्यें दररोज कांहीना कांही तरी लिहीत जा. " असा कितीतरी उपदेश मोठ्या आवेशानें केला. पण सभास्थानांतून बाहेर पडल्यावर माझें मलाच हंसू आलें. मी विद्यार्थ्यांना मोठ्या आवेशपूर्ण रीतीनें उपदेश केला होता खरा—पण त्यांपैकीं मी स्वत: आचरणांत किती आणत होतों ? मराठी भाषेचा मला अभिमान होता हें खरें असलें तरी दररोज मराठींतील उत्कृष्ट वाङ्मय वाचण्याचें किंवा दररोज मराठींत कांहीतरी लिहावयाचें काम मी कितपत पार पाडत होतों ? आळसामुळे माझ्या हातून घड पत्रेंसुद्धां वेळेवर लिहिलीं जात नव्हतीं—मग दररोज

कांहीतरी लिहिण्याची गोष्टच कशाला? आणि त्या दृष्टीनें माझे भाषण म्हणजे पुराणांतील वांगीं पुराणांत ठेवणाऱ्या त्या पुराणिकाप्रमाणेच झालें नव्हतें का ?

पण याचशा काय पण आणखी कितीतरी गोष्टींत आपणाला पुराणांतील वांगीं पुराणांतच ठेवावीं लागतात. मी स्वत: करीत नाही अशा कितीतरी गोष्टी करण्यासंबंधी उपदेश मी वेळप्रसगीं विद्यार्थ्यांना करीत असतों. परिक्षेसाठीं अभ्यास कसा करावा हें सांगताना मीं कितीतरी वेळां विद्यार्थ्यांना दररोज, थोडाथोडा एकतानतेनें अभ्यास करण्याविषयीं उपदेश केला असेल. पण तो उपदेश माझ्या विद्यार्थी-दशेंत मी कधींच आचरणांत आणलेला मला आठवत नाही. परिक्षेच्या अगोदर दोन महिने आमचे रात्रीचे दिवे जाळणें सुरू व्हावयाचें. आणि पूर्वीच्या परिक्षेच्या वेळीं शेवटींशेवटीं झालेल्या त्रासाच्या व दगदगीच्या अनुभवानें आम्ही पुढील परिक्षेच्या वेळीं कधींच शहाणे झालों नाही. पहाटें उठून दोन-दोन तीन-तीन मैल प्रभात-सहल करण्याचा उपदेश मी प्रत्येकाला करीत आलों आहें. पण तसा उपदेश करताना सूर्याच्या किरणांनी उठविल्याशिवाय मी मात्र कधींच जागा झालों नाही. अर्थात् असा उपदेश करताना आमच्यांतील या दोषाची जाणीव आम्हांला नसते असे नाही—पण आमच्या अनुभवाचा फायदा निदान नवीन पिढीला तरी घ्यावा हाच या उपदेशाचा थोडाफार उद्देश असतो. बाकी नवीन पिढी देखील त्यांतली 'अंदरकी बात' जाणूनच असते हें निराळें सांगायला नकोच. जुन्या पिढीच्या अनुभवाचा फायदा आज जर प्रत्येक नवीन पिढीनें घेतला असता तर जगाची आज किती तरी प्रगति झाली असती.

पण त्याहीपेक्षां पुराणांतील वांगीं पुराणांत ठेवणाऱ्या लोकांची एक निराळी जात असते. अशा लोकांना समाजांत आपलें महत्त्व वाढवावयाचें असतें आणि त्यामुळे वेळीं अवेळीं व्याख्यानांतून उच्च उदात्त तत्त्व

लोकांच्या तोंडावर ते फेंकीत असतात. त्यांच्या खासगी जीवनांत मात्र या तत्त्वांना पूर्णपणें हरताळ फासलेला असतो. माझ्या माहितीचे एक गृहस्थ एका शाळेंत शिक्षकांना व्याख्यान द्यावयास आले. त्यांनी व्याख्यानांत शिक्षकाचा दर्जा किती मोठा आहे, हें सांगितलें. नवीन पिढी तयार करण्याची केवढी मोठी जबाबदारी त्यांच्यावर आहे हें सांगितलें, शिक्षकांनी स्वार्थत्याग केला पाहिजे—आणि समाजानें शिक्षकाला वंद्य मानलं पाहिजे—अशा कितीतरी गोष्टी त्यांनी व्याख्यानांत सांगितल्या. पण त्याच गृहस्थाकडे एक शिक्षक कांहो कामासाठीं गेला असता त्यानें अत्यंत उर्मटपणाचें व अपमानास्पद उत्तर देऊन त्याची संभावना केली होती. शिक्षकाला त्याच्या घरीं त्याच्या मुलाला शिकविण्याचेंच नव्हे तर भाजीपाला आणण्याचें काम देखील करावें लागत होतें हेंहि पुष्कळांना माहीत होतें. तेव्हां त्यांचें व्याख्यान म्हणजे हवेंतील पोकळ फुगेच नव्हेत तर काय!

कोणत्याही चळवळीच्या वेळीं लोकांना स्वार्थत्याग करण्याचा, देशासाठीं जीवनाचाही त्याग करण्याचा उपदेश कांही कांही नकली पुढारी मोठ्या आवेशानें करीत असतात. सामान्य लोक भावनेच्या भरांत जास्तींत जास्त त्याग करतात, प्रसंगीं स्वतःच्या जीवनाची आहुतीहि देतात—पण उपदेश करणारे हे लोक मात्र मोटारींतून सुखैनैव हिंडत असतात व प्रसंगीं एकाद्या पक्षाची लोकप्रियता कमी होत असल्याचा संभव दिसतांच पगडी फिरवायलाही हे कमी करीत नाहीत.

'दारू पिऊं नका' असें हृदय पिळवटून दुसऱ्यास उपदेश करणारे किंवा व्याख्यानसमयीं लोकांच्या डोळयांतून अश्रु काढणारे लोक रात्रीं मदिरादेवीच्या तारेंत गुंग असतात हा अनुभव कुणाला नाही? एक बायको जिवंत असताना दुसरें लग्न केल्याबद्दल एकाद्या व्यक्तीचा निषेध करणारा माणूस, त्या निषेधाचे पडसाद विरतात न विरतात तोंच आपल्या गृहिणीला दुसरी सवत आणून मोकळा होतो व मानसिक

भुकेच्या कोरड्या थापा सांगून आपल्या कृतीचें समर्थन करतो याचें तरी दुसरें कारण कोणतें असणार? समाजांत जर आपण सूक्ष्म दृष्टीनें पाहूं लागलों तर असे पुराणांतील वांगीं पुराणांत ठेवणारे लोक कितीतरी सांपडतील!

त्याहिपेक्षां परवां एक मजा झाली. मी ऑम्लेट खातों असें माझ्या एका ओळखीच्या गृहस्थाला कळल्याबरोबर त्यांनीं माझ्यावर चांगलें तोंड-सुख घ्यायला सुरुवात केली. मी धर्म बुडविला, लोकांतून मी पार उठलों—वगैरे वगैरे शब्दांत त्यानें माझी बरीच संभावना केली. आणि गंमत म्हणजे चारच दिवसांनीं मी लकींत ऑम्लेट खावयास गेलों असतां ते गृहस्थ ऑम्लेटच काय–पण त्याहि पुढील पायरीचे पदार्थ खात असताना दिसले. मला पाहिल्याबरोबर त्यांनीं 'खरकन्' चेहेराच टाकला. मी ही सूडाची संधि वायां दवडणार थोडीच? मी हंसत हंसत त्यांच्याजवळ गेलों व विचारलें, "काय हो धर्ममार्तण्ड—अहो, आपला हिंदुधर्म आतां कुठें गेला?" तो इतका ओशाळला होता कीं, त्याचे तोंडून एक अक्षर बाहेर पडेना. पण शेवटीं हळूंच त्यानें सांगितलें, "डॉक्टरांनीं प्रकृति सुधारण्यासाठीं हें खाण्याचा सल्ला दिला—म्हणून तर!" तीन दिवसांत 'हें' खायला लागण्याइतकी त्यांची प्रकृति बिघडावी याचें मात्र मला कौतुक वाटलें.

पुराणांतील वांगीं पुराणांत ठेवणारे असे कितीतरी लोक आपल्या समाजांत सांपडतील, आणि अशा लोकांत मोठेपणाचा बुरखा घेतलेल्याच व्यक्ति आपणाला अधिक दिसतील. एका दृष्टीनें हे सारे लोक म्हणजे वरील गोष्टींतील पुराणिकाप्रमाणेंच नाहीत का?—पण छे! तो पुराणिक यांच्यापेक्षां कितीतरी श्रेष्ठ! तो निदान आपल्या कृतीचें समर्थन न करण्या-इतका प्रामाणिक तरी होता. 'पुराण संपलं—त्यांतील उपदेश त्याबरोबर संपला' असें स्पष्टपणें सांगण्याइतका निर्भिडपणा तरी त्यानें दाखविला—

एरवीं नाहींतर शास्त्रांतील दुसरें एक प्रतिवचन बनवून त्यानें आपल्या बायकोला सांगितलें असतें तर तिला काय कळलें असतें ? पण ती प्रामाणिकता आमच्यांत नाहीं. आम्हीं पुराणांतलीं वांगीं पुराणांत ठेवतोंच पण तसें केल्याबद्दल वर आणखी जोरजोरानें समर्थन करतों. केवळ लोकांच्याच डोळ्यांत त्यामुळें धूळ फेंकतों असें नाहीं तर स्वतःच्या मनाचीसुद्धां कित्येकदां वंचना करीत असतों.

मग आमच्यापेक्षां पुराणांतलीं वांगीं पुराणांत ठेवून त्याबद्दल तशी प्रामाणिक कबुली देणारा पुराणिक श्रेष्ठ नाहीं कां ठरणार ?

---

# म. ना. चे मनोगत

तेरा वर्षांपूर्वी 'संजीवनी' हा माझा लघुकथा व एकांकिका संग्रह ज्यावेळीं प्रसिद्ध झाला त्यावेळीं त्याच्या मलपृष्ठावर आगामी म्हणून 'लतामंडप' या लघुनिबंध संग्रहाची जाहिरात मीं केली होती. वास्तविक त्यावेळीं मीं एकहि लघुनिबंध लिहिला नव्हता. पण तरुण वयांत मनुष्याचा आशावाद मोठा जबर असतो. एका वर्षांत बारा लघुनिबंध लिहावयाचे व ते 'लतामंडपां'त समाविष्ट करावयाचे असा त्यावेळीं मीं मनाचा संकल्प केला होता. पण प्रत्यक्ष लिहिण्याची ज्यावेळीं वेळ आली त्यावेळीं मात्र हा प्रकार लिहिणें किती अवघड आहे याची कल्पना मला आली—एका लघु-निबंधाच्या वर मी प्रगति करूं शकलों नाहीं, आणि मनाचे संकल्प मनांतच विरले.

आणि त्यानंतर १९४३ सालीं मीं पुन्हां या प्रकाराकडे वळलों. साधारणपणें मी अगदी कूर्मगति लेखक आहे. वर्षांतून दोन किंवा तीन निबंध लिहिले म्हणजे मी स्वतःला कृतकृत्य समजत असें. त्यामुळें सदतीस सालीं केलेला संकल्प सिद्धीला जाण्यास मला ४७ साल उजाडलें. या संग्रहांत समाविष्ट केलेले सर्व लघुनिबंध सामान्यपणें याच कालखंडांतील आहेत. त्यामुळे त्या कालखंडांतील परिस्थितीचें प्रतिबिंब यामधील अनेक लघुनिबंधांत पडलेले दिसले तर आश्चर्य वाटावयास नको. गाडीला होणारी मनस्वी गर्दी, शिधावाटप पद्धति, रॉकेलसाठीं लावावी लागणारी रांग इत्यादि अनेक गोष्टींचें स्मरण अद्याप बहुतेकांना ताजे असेल.

या लेखनप्रकारांत मीं कितपत यश मिळविलें याविषयीं मी साशंक आहे. वाचकांनीं आतापर्यंत तें ठरविलें असेलच. टीकाकारहि तें ठरव-तील. पण जें कांही थोडे फार यश मी या लेखन प्रकारांत मिळविलें असेल तें मी कितपत टिकवूं शकेन—त्यांत प्रा. क्षीरसागरांसारख्या रसिक टीका-

कारांना दिसून आलेल्या थोड्या फार गुणांचा मी कितपत विकास करूं शकेन याविषयीं मात्र मला शंका आहे. कोणतीहि गोष्ट अर्धवट साध्य केल्यावर ती सोडून देण्याची वृत्ति मला याहि ठिकाणीं नडली तर मला आश्चर्य वाटणार नाहीं. माझ्या जीवनांत अनेक गोष्टी मी अशा अर्धवट सोडून दिल्या आहेत. 'संजीवनी' हा संग्रह ज्यावेळीं प्रसिद्ध झाला त्यावेळीं एकांकिका या वाङ्मयप्रकाराचा विशेष अभ्यास करून त्यांत नांव मिळवायचें असें मीं ठरविलें होतें. माझ्या त्यावेळीं लिहिलेल्या कांहीं एकांकिकांची अनेक टीकाकारांनीं स्तुतिहि केली होती. आचार्य अत्रे यांनींहि त्या बाबतींत मला प्रोत्साहन दिलें होतें. पण माझ्या या वृत्तीनें त्या सर्वांच्या अपेक्षा मी फोल ठरविल्या व या वाङ्मयप्रकारांत नांव मिळविण्याचा माझ्या मनाचा संकल्प मनांतच विरला. तेव्हां लघुनिबंधाच्या बाबतींतहि तसेंच घडून येणार नाहीं अशी ग्वाही मी आजच कशी देऊं ?

मला समाधान फक्त एकच वाटते. केवळ हौस म्हणून मी लेखनाकडे वळलों व जें जें कांहीं लिहिलें तें केवळ हौस म्हणूनच. वर्षांतून इतकें लेखन झालेंच पाहिजे असा अट्टाहास मीं कधीं केला नाहीं. आणि तसा केला तरी तें मला जमेल असेंहि वाटत नाहीं. माझ्या कूर्मगतीचा विचार करता वाचकांनीं, संपादकांनीं व टीकाकारांनींहि माझें त्या मानानें भरपूर कौतुक केलें आहे. त्या कौतुकपर शब्दांनीं मिळणारा आनंद हाच माझ्या लेखनापासून मला मिळणारा फार मोठा मोबदला असें मी समजतों. आणि त्याबद्दल त्यांचा मी सदैव ऋणी राहीन.

माझें हृद्गत जें मला व्यक्त करावयाचें तें हेंच. माझ्या लघुनिबंधांतून माझ्या व्यक्तिमत्वाची ओळख वाचकांना किती पटली असेल ती पटो. पण या हृद्गतावरून माझ्या आळशीपणाची ओळख त्यांना चांगली पटेल असें मला वाटतें. त्या दृष्टीनें श्री. भाऊ खरे यांनीं मलपृष्ठावरील चित्रांत इझिचेअरवर बसलेला जो मनुष्य चित्रित केला आहे त्यांत त्यांनीं

माझेंच चित्र रंगविलें आहे कीं काय असें राहून राहून मला वाटूं लागते. फक्त सिगारेटऐवजीं हातांत पुस्तक दिलें म्हणजे तें चित्र पूर्ण होईल.

आभार मानण्याचें शेवटचें कार्य करतानां मात्र मनाला संकोच वाटतो. कारण ज्यांचे ज्यांचे मला आभार मानावयाचे आहेत त्यांचे व माझे संबंध इतके जिव्हाळ्याचे झाले आहेत की त्यामुळे मी आभार मानलेले त्यांना आवडेल असें वाटत नाही. आज ललित वाङ्मयाच्या पुस्तकाचा खप घटला असतानाहि पुस्तक प्रकाशित करून माझे ‘ मनाचे संकल्प ’ वाचकांसमोर ठेवणारे श्री. दा. ना. मोघे, अल्पावधींत पुस्तक छापून देणारे श्री. प्र. ज. पाध्ये व श्री. मा. ज. पाध्ये, संग्रहाला विवेचक प्रस्तावना लिहून देणारे प्रा. श्री. के. क्षीरसागर, अत्यंत घाईगडबडींत असतानाहि माझे लघुनिबंध वाचून त्यावर आपलें मत व्यक्त करणारे श्री. भाऊसाहेब खांडेकर व प्रा. अनंत काणेकर, आकर्षक चित्रानें मुख-पृष्ठ सजविणारे श्री. भाऊ खेर, माझे लघुनिबंध वेळोवेळीं प्रकाशित करून मला उत्तेजन देणारे किर्लोस्कर, ध्रुव, वसंत, वाङ्मयशोभा इत्यादि मासि-कांचे संपादक व माझे कौतुक करणारा रसिक मराठी वाचकवर्ग या सर्वांच्या ऋणांतून आभार मानून मोकळें होणें मला जमणार नाही. यांतील बहुतेक सर्वजण माझे स्नेहीच आहेत. तेव्हां मित्रांनीं मित्रांचे कसले आभार मानावयाचे ?

‘ संजीवनी ’ प्रमाणें याहि संग्रहाचे वाचकवर्ग कौतुक करतील हीच आशा.

जळगांव
१३–५–५० —म. ना. अदवंत.

[ टीप—लघुनिबंधांचें शुद्धलेखन मुंबई विद्यापीठाच्या नियमाप्रमाणें ]

# आ गा मी

●●●

बाजुबंद

( लघुकथासंग्रह )

सौ. कमला फडके

आणि

ना. सी. फडके

●

मूर्ति

( नाटिका )

सौ. मालतीबाई दांडेकर

●

अत्तर–गुलाब

( लघुकथासंग्रह )

ना. सी. फडके

आणि

सौ. कमला फडके

●

अर्ध–वर्तुळ

( कथासंग्रह )

प्रभाकर पाध्ये

●●●


रा. ना. मोघे–प्रकाशन,

कोल्हापूर....व....पुणें.

# न वें सा हि त्य

**गुंजन**—सौ. उषा सुलाखे किं. १॥ रु.

" एका गृहिणीच्या जीवनांत गृहजीवनाच्या मर्यादेंत आलेल्या सुखदुःखांच्या अनुभवांचें हें सगळें, मार्पे 'गुंजन' आहे. पतिप्रेमाची ओढ, अपत्याविषयीं नितांत वात्सल्य, सांसारिक कर्तव्याविषयीं निष्ठा आणि समाधान, इत्यादि भावना अतिशय आकर्षक स्वरूपांत या कवितांतून व्यक्त होत आहेत. प्रणयिनी, पत्नी, माता, इत्यादि स्त्रीजीवनाच्या विविध अनुभूतींचीं रसपूर्ण चित्रें रेखाटणें हेंच या कवयित्रींचें खरें क्षेत्र आहे आणि त्यांत त्यांची कामगिरी प्रशंसनीय आहे, असें 'गुंजन'वरून म्हणावयास हरकत नाहीं."

—वाङ्मय शोभा

**रुखरुख**—वा. शि. आपटे एम्. ए. किं. २ रु.

प्रि. दोंदे प्रस्तावनेंत म्हणतात—'रुखरुख' ही कांहीं कादंबरी नाहीं. परंतु कादंबरीचे व त्यांतल्यात्यांत वास्तववादी कादंबरीचे बरेच गुण आढळून येतील, अशी एका प्राथमिक शिक्षकाची दैनंदिनी आहे.....प्रस्तुत दैनंदिनी अनेक दृष्टीनें प्रबोधक आहे. लेखकाच्या जिवाला रात्रंदिवस लागलेली रुखरुख हजारों नव्हे, लक्षावधि ज्ञात–अज्ञात शिक्षकांना लागून राहिलेली ही रुखरुख म्हणजेच Divine discontent आहे. हें उन्नतीचें लक्षण आहे. 'रुखरुखी'मधूनच नवचैतन्य उत्पन्न होईल. 'रुखरुख' हेंच नवशिक्षकाचें समाजाला आव्हान आहे...

**तरंग**—य. गो. जोशी किं. १। रु.

प्रा. वा. दा. गोखले प्रस्तावनेंत म्हणतात—'तरंग' या पुस्तकांत श्री. जोशी यांचीं सर्व वैशिष्ट्यें विपुलतेनें दाखविणाऱ्या अकरा लघुकथा आहेत. या अकराहि गोष्टी सरस असून त्यांतील घटनांची विविधता, पात्रांचे स्वभावविशेष, भाषेची सरसता वाचकांना आनंदविल्याविना राहाणार नाहीं...

**स्कूल व कॉलेज बुक स्टॉल, कोल्हापूर.**

# न वें बा...

**गीता-विजय**—गं. रा. साने, बी. ए., बी. टी.

गीतेंतील तत्त्वज्ञानावर नि त्याच कथानकावर आधार-लेलें हें एक नाटुकलें आहे. यांत श्रीकृष्णादि कांहीं प्रमुख पात्रांकडून गीता-तत्त्वज्ञान सांगितलें आहे. विद्यार्थ्यांना हें नाटुकलें समारंभ प्रसंगीं करायला उपयोगी पडण्यासारखें आहे. **किंमत ६ आणे**

**गॅलीलिओ**—पु. का. ओक, बी. एस्सी., बी. टी.

आजपर्यंत गॅलीलिओची लहानमोठीं चरित्रें प्रसिद्ध झालेलीं आहेत. पण हें छोटें पुस्तक म्हणजे गॅलीलिओच्या आयुष्यांतील घटनांची नुसती जंत्री नाहीं. त्यांत त्याच्या शास्त्रीय शोधांची माहिती देऊन त्यानें आपले शोध कसे लावले तें यांत सांगितलेलें आहे. मुलांना पुस्तक उपयुक्त आहे. **किंमत ८ आणे**

**सोशीक सुशीला**—प्रा. भा. म. गोरे, एम्. ए.

ही कथा इंग्रजी काव्याचा 'वाल्मिकी' चॉसर याच्या 'क्लॉर्कस टेल्' या आख्यानावरून लिहिली आहे. एका सुशील स्त्रीची सत्त्वपरीक्षा हा या कथेचा मुख्य भाग आहे. कष्टाळूपणा, सहनशीलता, प्रेमळपणा, निगर्वीपणा, निर्मत्सरी स्वभाव, वगैरे तिच्या गुणांमुळें तिचा पति राजा वल्लभदेव कसा दिपून गेला हें या कथेंत निरनिराळ्या प्रसंगांनीं दाखविलें आहे. **किंमत १० आणे**

**स्कूल व कॉलेज बुक स्टॉल, कोल्हापूर.**